सिंहासन
बत्तीसी

सिंहासन बत्तिशी



© केशव भिकाजी ढवळे

पहिली आवृत्ती
२ नोव्हेंबर १९८७

फोटोटाईपसेटिंग
अश्विनी फोटोटाईप सर्व्हिसेस
डॉ. भालेराव मार्ग
गिरगाव, मुंबई ४०० ००४

चित्रे : आनंद घैसास

मांडणी व रचना : प्रकाश ढवळे

प्रोसेसिंग
संदीप प्रोसेस
वडाळा, मुंबई ४०० ०३१

मुद्रक
प्र. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाव वाडी
गिरगाव, मुंबई ४०० ००४

प्रकाशक
धनंजय बाळकृष्ण ढवळे
केशव भिकाजी ढवळे
पहिली भटवाडी
गिरगाव, मुंबई ४०० ००४

राज्यकर्त्यांना राजधर्माचा उपदेश

विक्रमादित्य राजासंबंधी बत्तीस गोष्टी सांगणारे मूळ पुस्तक संस्कृतमध्ये असून 'सिंहासन द्वात्रिंशिका' या नावाने प्रसिद्ध आहे. त्यावरून मराठीत अनुवाद झालेले सिंहासन बत्तिशी. या संस्कृत पुस्तकाचे भारतातील जवळजवळ सर्वच भाषांत अनुवाद झालेले आहेत. इतकेच नव्हे तर भारताबाहेरही अनेक भाषांत भाषांतरित झालेले आहेत. विविध नावांनी ते प्रसिद्ध आहेत.

या पुस्तकाचा कर्ता कोण याबद्दल निश्चित माहिती नाही. कालिदास, नंदीश्वर, सिद्धसेन, वररुची अशी अनेक नावे सांगितली जातात. ही कृती तेराव्या शतकातील असावी असे विद्वानांचे मत आहे. कथासरित्सागरातील काही कथा थोड्याफार फरकाने सिंहासन बत्तिशीत आढळतात.

महालिंगदास, जगजीवन, ना. भा. गोपाळ यांनी फार पूर्वी मराठीत अनुवाद केलेले आहेत. सन १९५४ मध्ये स. आ. जोगळेकर यांनी मराठीतील आवृत्ती चांगली संपादन केलेली आहे. निरनिराळ्या आवृत्यांत निरनिराळ्या कथा विविध क्रमांनी आढळतात. मूळ कथा किंवा उगमाच्या कथांमध्येही भिन्नता आढळते.

भारतीय विद्या भवनाने १९६० मध्ये एक संशोधनपर ग्रंथ प्रसिद्ध केला असून त्यांत १२० विविध कथांचे एकत्रीकरण असल्याचे दाखवून दिलेले आहे.

हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने १९२६ मध्ये इंग्रजीत दोन खंडांत संशोधित माहिती प्रसिद्ध केली होती. ६४० हून अधिक पृष्ठे असलेल्या पुस्तकाच्या प्रथम खंडात मूळ संस्कृत कथा इंग्रजी टाइपात दिलेल्या आहेत व द्वितीय खंडात इंग्रजी अनुवाद दिलेला आहे. मि. फ्रॅंकलिन एडमार्टन हे या आवृत्तीचे संपादक असून या पुस्तकाइतका सूक्ष्म अभ्यास करून काढलेली दुसरी आवृत्ती अद्याप प्रसिद्ध झालेली नाही.

आदर्श राजा कसा असावा यासंबंधीचे उपदेश भारतीय वाङ्मयात प्राचीन काळापासून आढळतात. महाभारतात नारदांनी धर्मराजाला प्रश्नरूपाने राजधर्माचा

उपदेश केला आहे. शांतिपर्वात भीष्मांनी राजधर्माबद्दल खूप विस्तृत विवेचन केलेले आहे. आदर्श राजाचे गुण, त्याची कर्तव्ये ही मनावर ठसविताना प्राचीन वाङ्मयात कधी संवादाचा तर कधी गोष्टींचा उपयोग केला जातो. गोष्ट हा दृष्टान्त असतो. उदाहरण असते. कथेमुळे विषय व तत्त्वविचार चांगला लक्षात राहातो. चटकन आकलन होतो.

वरवर पाहाता हे पुस्तक कुमार वाङ्मयातील वाटत असले तरी त्यात खरा उपदेश राज्यकर्त्यांना आहे. हे पुस्तक थोडक्यात, सोप्या शब्दांत, मनोरंजक व बोधप्रद कथा आबालवृद्धांना रुचतील व समजतील अशा प्रकारे, प्रत्येक कथेला स्वतंत्र चित्र देऊन सादर केलेले आहे. सर्वांना आवडेल असे वाटते.

— श्री. भि. वेलणकर

पूर्वपीठिका

मध्ययुगीन भारतात राधानगरी येथे भोज नावाचा राजा राज्य करीत होता. ते शहर माळव्याची राजधानी. राजा प्रजेच्या हिताला फार जपत असे. उत्तम राज्यकारभार करण्यासाठी तो नेहमी प्रयत्न करीत असे.

त्या नगरीत एक श्रीमंत सावकार होता. त्याला दोन मुलगे होते. त्या मुलांना घोडेस्वारीचे वेड होते. एकेक घोडा एकेकाचा आवडता होता. सावकार मरण पावला तेव्हा त्याने मृत्युपत्र केले होते. आपल्या संपत्तीचा तिसरा भाग धर्मादाय म्हणून खर्च करावा, उरलेली संपत्ती दोन्ही मुलांत वाटून द्यावी आणि एक बहुमोल नीलमणी होता तो, दोन्ही मुलांची घोडेस्वारीची शर्यत लावून ज्याचा घोडा मागे राहील त्या घोड्याच्या मालकाला द्यावा, असे ते मृत्युपत्र होते. राजाला अखत्यार नेमले होते.

राजाने शर्यत लावली तेव्हा दोघे भाऊ घोडा उभा करून तिथे जागीच थांबले, कारण अटच विचित्र होती. तेव्हा नीलमणी तात्पुरता राजाच्या खजिन्यात ठेवला गेला. सावकाराच्या बाकीच्या संपत्तीची राजाने वाटणी केली.

काही दिवसांनी राजा शिकारीला गेला असता त्याला काही गुरख्याची मुले खेळताना दिसली. एका वृक्षाखाली उंचवट्यावर एक मुलगा बसला होता आणि तो इतर मुलांच्या प्रश्नांवर न्यायदान करीत होता. त्याचे न्यायचातुर्य पाहून राजाला नवल वाटले. तो पुढे झाला आणि त्याने मुलाला विचारले, "सावकाराच्या दोन मुलांपैकी नीलमणी कोणाला द्यावा या प्रश्नाचे उत्तर तुला देता येईल काय?" राजाने मुलाला मृत्युपत्रातील अटी समजावून सांगितल्या. ते एकून मुलगा म्हणाला, "महाराज, दोन्ही मुलांना स्वतःचा घोडा न देता भावाच्या घोड्यावर बसायला सांगा."

राजाला खूण पटली. मग त्याने मुलांजवळ चौकशी केली तेव्हा त्याला कळले की, त्या जागेवर जो बसतो तो मुलगा उत्तम न्यायदान करतो. राजा त्या जागेवर बसण्यास पुढे गेला तो त्याच्या पायाला चटके बसले.

पुढे या गोष्टीची चौकशी करण्याचे ठरवून राजा नगरात परत गेला. त्याने त्या दोन्ही मुलांच्या घोड्यांची अदलाबदल करून शर्यत लावली. तेव्हा दोन्ही घोडे उत्तम प्रकारे धावले. त्यातील जो घोडा मागे राहिला त्याच्या मालकाला म्हणजे पुढच्या घोडेस्वाराला राजाने नीलमणी दिला व न्यायाचे काम पार पाडले.

नंतर राजाने तो वृक्ष व त्या भोवतालची जागा विकत घेतली. काही नोकरांना कामाला लावून त्याने ती जागा खणून काढली. तेव्हा खाली एक सुंदर रत्नजडित सिंहासन सापडले. ते स्वच्छ केल्यावर त्याला बत्तीस पऱ्यांच्या सुवर्णमूर्ती जडविलेल्या आहेत आणि सिंहासन विलक्षण शोभिवंत आहे असे दिसून आले. राजाने ते सिंहासन वाजत गाजत राजप्रासादात आणले.

त्या सिंहासनावर बसावे असे राजाला फार वाटत होते. त्याने ज्योतिषी लोकांना चांगला मुहूर्त पाहाण्यास सांगितले आणि त्या मुहूर्तावर तो सिंहासनावर बसण्यासाठी त्याच्याजवळ गेला. त्याने कुतूहलाने सिंहासनाला स्पर्श केला तेव्हा अचानक बत्तीस सुवर्ण-मूर्तींपैकी एक मूर्ती अदृश्य झाली व तिथे राजासमोर एक सुंदर देवकन्या प्रगट झाली. त्याचवेळी अनेक स्त्रिया खदखदा हसत आहेत असा ध्वनी राजाच्या कानावर पडला. तो त्या देवकन्येला विचारू लागला, "तू कोण आहेस? हे काय घडले?"

ती देवकन्या म्हणाली, "हे भोजराजा, हे सम्राट विक्रमादित्याचे सिंहासन आहे. तू या सिंहासनावर बसू नको. तुझ्या अंगी खरे औदार्य असेल तरच तू बसू शकशील. माझे नाव जया आहे."

राजा म्हणाला, "मी खूप दानधर्म करतो. मी उदार आहे." असे म्हणून त्याने आपण केलेल्या दानधर्माचे वर्णन केले.

परी म्हणाली, "अरेरे ! स्वतःच्या तोंडाने स्वतःची स्तुती केलीस, फुकट गेली तुझी पुण्याई! कुठे विक्रमादित्य आणि कुठे तू! इंद्र जरी आत्मस्तुती करील तरी तो नीच ठरेल. म्हटलेच आहे–

परैः प्रोक्ता गुणा यस्य निर्गुणोऽपि गुणी भवेत् ।
इन्द्रोऽपि लघुतां याति स्वयं प्रख्यापितैर्गुणैः ॥

आपले गुण दुसऱ्याने वर्णन करावे हे सर्वांत उत्तम."

राजा म्हणाला, "खरेच माझी चूक झाली, पण विक्रमादित्याचे औदार्य कसे होते? ह्या विलक्षण दिव्य सिंहासनावर बसण्याची योग्यता असणाऱ्या त्या सम्राटाची मला माहिती सांगा."

परी म्हणाली, "ऐक –

कथा पहिली

भर्तृहरीची कथा – विक्रमाला सिंहासन कसे मिळाले

जया नावाची ती परी म्हणाली, "धर्मसेन नावाच्या राजाचा विक्रमादित्य हा क्षत्रिय-स्त्री पासून झालेला मुलगा. हे सिंहासन त्या विक्रमाचे आहे. शंखचूड, विक्रम आणि भर्तृहरी असे तिघे भाऊ-भाऊ होते.

शंखचूड हा मोठा मुलगा, धर्मसेनाच्या मृत्यूनंतर राजा झाला. विक्रम हा मोठा देवभक्त होता. हिमालयात जाऊन तो शंकराची उपासना करीत होता. पंडितांनी शंखचूडाला सांगितले, "विक्रम मोठा पराक्रमी आहे. तो तुला मारून राज्य घेऊ शकेल, तेव्हा तू त्याचा काटा काढ." शंखचूडाने कपटाने विक्रमाला मारण्याचा

प्रयत्न केला, पण विक्रमाने त्याचे कपट त्याच्यावरच उलटविले आणि त्याचा वध केला;मग विक्रम राज्य करू लागला.

हे सिंहासन विक्रमाला बाहुबल नावाच्या राजाकडून मिळालेले होते. एकदा विक्रम शिकारीसाठी अरण्यात गेला होता त्यावेळी त्याची वाट चुकली. तो एका उंच जागेवर चढला. त्याला दूर एक मोठे नगर दिसले. ते आपल्या सत्तेखाली यावे असे त्याला वाटले. तिथेच एका वृक्षावर एक कावळा बसला होता. त्याला विक्रमाचे विचार कळले. तो त्या नगरातील राजाचा प्रधान होता. त्याला सिद्धी होत्या. त्याने कावळ्याचे रूप घेतले होते. त्याने विक्रमाचा धिक्कार म्हणून त्याच्या अंगावर घाण टाकली. विक्रमाने त्याला पकडले. तेव्हा प्रधान प्रगट झाला आणि म्हणाला,

"राजा, तू जे नगर पाहिलेस ते 'बाहुबल' राजाचे आहे. मी त्याचा प्रधान आहे. तुला ते नगर मिळणे शक्य नाही. बाहुबल फार पराक्रमी आहे."

विक्रम म्हणाला, "मी त्या नगरीत येतो व त्याला भेटतो. त्याच्याशी माझी मैत्री होऊ शकते."

प्रधान विक्रमाला घेऊन त्या नगरात गेला. बाहुबल राजा व विक्रम मित्र झाले. चार-पाच दिवस विक्रमाचे आतिथ्य केल्यावर बाहुबलाने विक्रमाला आपल्या जवळील दिव्य सिंहासन दाखविले. इंद्राने शंकराच्या सांगण्यावरून ते सिंहासन स्वर्गातून बाहुबलासाठी पृथ्वीवर पाठविले होते. विक्रमाला निरोप देताना बाहुबलाने विक्रमाचा मोठा सन्मान केला आणि हे सिंहासन भेट म्हणून दिले.

राजा भोज, विक्रमाची गोष्ट ऐकण्यापूर्वी त्याचा भाऊ भर्तृहरी त्याची मी गोष्ट सांगते–

विक्रमाला कैलासावर जाऊन तपश्चर्या करावी असे वाटले म्हणून त्याने आपला भाऊ भर्तृहरी याला अवंतीचे राज्य दिले आणि तो निघून गेला.

भर्तृहरी राज्य करीत असता अशी गोष्ट घडली की, एका तपस्वी ब्राह्मणाने एक अमृतफळ आणून राजाला दिले. 'बदरिका' आश्रमात तो तप करीत असता देवाने प्रसन्न होऊन त्याला ते दिले होते. ते भक्षण करणारा माणूस अमर होईल असा वर होता. ब्राह्मण म्हणाला, "महाराज, हे फळ आपण खाल्लेत व अमर झालात तर प्रजेचे कल्याण होईल."

राजाने ते फळ घेतले. ब्राह्मणाला पुष्कळ द्रव्य दिले. नंतर राजाने ते फळ आपल्या लाडक्या राणीला दिले. राजाच्या नकळत तिने ते फळ तिच्या पूर्वीच्या प्रियकराला दिले. प्रियकराने ते एका वेश्येला दिले, कारण ती त्याची जास्त आवडती होती. पुढे असे झाले की, त्या फळाचा गुण समजल्यावर वेश्येला वाटले की, ते फळ आपण राजाला द्यावे. तिने राजाची गुप्तपणे भेट घेऊन ते फळ राजाला दिले.

फळ पाहाताच राजा चमकला, पण वेश्येवर न रागावता त्याने तिला द्रव्य देऊन वाटेला लावले.

राजाने ते फळ पुन्हा लाडक्या राणीला दाखविले. ती गोंधळली. मग राजाने पूर्ण चौकशी करून त्या राणीला व तिच्या प्रियकराला देहान्त शिक्षा दिली.

वरील घटनेमुळे भर्तृहरीच्या मनात अत्यंत विरक्ती उत्पन्न झाली आणि मदनाचा आणि सर्वांचा त्याने धिक्कार केला –

यां चिन्तयामि सततं मयि सा विरक्ता ।
सा चान्यमिच्छति जनं स जनोऽन्यसक्तः ।
अस्मत्कृते च परितुष्यति काचिदन्या ।
धिक्तां च तं च मदनं च इमां च मां च ॥

अर्थ :– मी जिचे सतत चिंतन करतो तिला मी आवडत नाही, तिला दुसराच माणूस आवडतो, त्यालाही आणखीच कोणाबद्दल आसक्ती वाटते आणि मजमुळे अन्य कोणी तरी स्त्री खुष होते! खरोखर त्या स्त्रीचा, त्या माणसाचा, मदनाचा, त्या गणिकेचा आणि माझाही धिक्कार असो.

असा विचार मनात येऊन भर्तृहरी विरक्त झाला. तो नगर सोडून गेला. प्रधानाला चिंता पडली. राजाशिवाय सिंहासन रिकामे पडले. तेवढ्यात एका वेताळाने राजवाड्यात प्रवेश केला. प्रधानाने एका योग्य तरुण माणसाला गादीवर बसविले, पण वेताळाने रात्री त्याला मारून टाकले !जो कोणी राजा होईल त्याला वेताळ रात्री मारून टाकू लागला.

विक्रमाला जेव्हा हे वृत्त कळले तेव्हा तो अवंतीस परत आला. प्रधानाने वेताळाची हकीगत सांगितली. विक्रम म्हणाला, "मी भर्तृहरीचे राज्य सांभाळतो. आज रात्री वेताळ येईल तो येऊ दे. त्याच्यासाठी भरपूर पक्वान्ने, मिठाई वगैरे माझ्या शयनगृहाजवळच आणून तयार ठेवा."

त्याप्रमाणे प्रधानाने तयारी केली. रात्री विक्रम जागा राहिला. वेताळ आला. भरपूर अन्न पाहून त्याने ते खाऊन टाकले व तो तृप्त झाला. मग विक्रम त्याच्या समोर गेला. विक्रमाने वेताळाला त्याचा पराक्रम केवढा ते विचारले.

वेताळ म्हणाला, "तू माझ्यासाठी एवढे अन्न ठेवलेस, मी तृप्त झालो. म्हणून तुला मी सांगतो. माझी भूक भागेल एवढे अन्न जर तू रोज माझ्यासाठी ठेवलेस तर मी तुला कशाला मारू? मला कोठेही जाता येते, लहान मोठे होता येते. अदृश्य होता येते. मी ब्रह्मा-विष्णू-महेश यांनाही भेटू शकतो, मी त्रिकालज्ञ आहे."

विक्रमाने विचारले, "माझे आयुष्य किती आहे? ते कमीजास्त करू शकतोस का?"

वेताळ म्हणाला, "मी कोणाचेही आयुष्य कमीजास्त करू शकत नाही–विष्णू व शंकरही ते करू शकत नाहीत. तुला पुष्कळ आयुष्य आहे. ते मी कमी करू शकत नाही."

विक्रमाने ताडकन् उठून वेताळाला खड्गयुद्धाचे आव्हान दिले आणि त्याला पराभूत केले. तो म्हणाला, "वेताळा, यापुढे तू माझ्या आज्ञेत वागले पाहिजेस. तू मला मारू शकत नाहीस."

वेताळ म्हणाला, "राजा, तू खरोखर पराक्रमी आहेस. मी गुप्तपणे तुझ्या समीप राहीन व वेळोवेळी तुला सहाय्य करीन, पण तू मला रोज भरपूर खायला घाल."

विक्रम म्हणाला, "तुझी कोणतीही अट मला मान्य नाही. यापुढे तू राजवाड्यात राहू नकोस. मात्र मी आठवण करताच तू येऊन मला मदत केली पाहिजेस."

वेताळाने ते कबूल केले व तो तिथून नाहीसा झाला.

जया भोजराजाला म्हणाली, "राजा, विक्रम असा पराक्रमी होता. आता त्याचे औदार्य श्रवण कर."

विक्रम राजा राज्य करीत असताना अनेक कलावंतांचा, कवींचा सत्कार करीत असे. सिद्धसेन नावाचा एक कवी एकदा त्याच्या सभेत आला. तो मार्मिक श्लोक रचना करीत असे. त्याने विक्रमाची प्रशंसा एका श्लोकाने केली.

अपूर्वेयं धनुर्विद्या भवता शिक्षिता कुतः?।
मार्गणौघस्तु त्वा ऽभ्येति गुणो याति दिगन्तरम्॥

अर्थ– ही विचित्र धनुर्विद्या आपण कुठे शिकलात? मार्गण (म्हणजे बाण) आपल्याकडे येतात आणि गुण (म्हणजे धनुष्याची दोरी) मात्र दिगंतात जातात। (खरा अर्थ–मार्गण म्हणजे पांथस्थ याचक व गुण म्हणजे कीर्ती.)

हा श्लोक ऐकताच मर्मज्ञ विक्रमाने खुष होऊन त्या कवीला एक गाव इनाम दिला. कवी म्हणाला, "महाराज, आपण दानशूर आहात असे म्हटले जाते, पण ते खोटे आहे काही लोकांना जे हवे असते ते आपण देत नाही."

सर्वदा सर्वदो ऽसीति मिथ्या त्वं कथ्यते बुधैः ।
नारयो लेभिरे पृष्ठं न वक्षः परयोषितः ॥

अर्थ– सर्वांना सर्वदा सर्व देतोस असे शहाणे लोक तुजबद्दल खोटेच म्हणतात. तू शत्रूला पाठ देत नाहीस व परस्त्रियांना तू सन्मुख होऊन स्वीकार करीत नाहीस.

विक्रमाला फार आनंद झाला. त्याने आणखी एक गाव कवीला इनाम दिला. तेव्हा कवीने आणखी एक श्लोक म्हटला–

अरयस्ते भयत्रस्ताः स्फुटिंता घटवद् हृदि ।
गलिताश्रुप्रपाताश्च राजन् चित्रमिदं महत् ॥
सरस्वती स्थिता कंठे लक्ष्मी करसरोरुहे ।
राजेन्द्र ! कुपिता कीर्तिस्तेन देशान्तरं गता ॥

राजाने हर्षाने वाहवा केली. श्लोकाचा अर्थ होता–"राजन्, तुझे शत्रू भयभीत होऊन त्यांचे हृदय मडक्यासारखे फुटते, आणि त्यातील शोकरूपी जल अश्रू होऊन बाहेर पडते. तुझ्या कंठात सरस्वती व करकमलांत लक्ष्मी राहाते, हे पाहून, कीर्तीला राग येतो व ती देशविदेशी जाते !"

गर्भित स्तुती पण वरवर निन्दा असणारे हे श्लोक ऐकून राजा प्रसन्न झाला! त्याने आपले राज्यच त्या कवीला देऊ केले ! आणि कवी एवढा निस्पृह की, त्याने ते राज्य घेतले नाही. तो म्हणाला, "राजन्, आपण रसिक आहात हीच माझी बिदागी. मला राज्य काय करायचे? आपण मला दोन गावे दिली आहेत तेवढी पुरेत."

एवढी गोष्ट सांगून जया म्हणाली, "भोजराजा! तू जर असा पराक्रमी व असा उदार असशील तर या सिंहासनावर बसण्याचा विचार कर, नाहीतर भस्म होऊन जाशील !"

राजा खिन्न झाला. राजाचा प्रामाणिकपणा पाहून जया संतुष्ट झाली. ती म्हणाली, "राजा, या बत्तीस मूर्ती म्हणजे माझ्या सख्याच आहेत. तुला त्या विक्रमाच्या कथा सांगतील. पण प्रतिदिनी एकच परी एकच कथा सांगेल." असे म्हणून परी अदृश्य झाली, मूर्तिरूप दिसू लागली, राजा आपल्या महालात परत गेला.

कथा दुसरी

नंदराजाची कथा – विक्रमाचे औदार्य

दुसऱ्या दिवशी भोज राजा सिंहासनावर बसण्याच्या आशेने सिंहासनाजवळ गेला व त्याने सिंहासनाला हात लावला. तेवढ्यात दुसऱ्या परीची मूर्ती सजीव झाली व म्हणाली, "राजा, विक्रमासारखे तुझे मन मोठे नाही;म्हणून तू यावर बसू नकोस."

राजा म्हणाला, "तुझे नाव काय? विक्रमाचे मन मोठे कसे होते?"

परी म्हणाली, "माझे नाव 'विजया'. विक्रमाची एक कथा मी तुला सांगते."

विक्रमाच्या सभेत येऊन एका ब्राह्मणाने एकदा एक श्लोक म्हटला –

संग्रहेण कुलीनानां राज्यं कुर्वन्ति पार्थिवाः ।
आदिमध्यावसानेषु न त्यजन्ति ते नृपान् ॥

अर्थ:– राजे राज्य करतात ते कुलीन लोकांना आश्रय देऊनच. कारण ते लोक सर्व काळी राजाला सोडीत नाहीत.

राजा म्हणाला, "विप्रवर्य, खरे आहे, पण यासंबंधी एखादी गोष्ट आपण सांगू शकता का?"

ब्राह्मण म्हणाला,"होय. विशाला नगरीत नंद राजा पूर्वी राज्य करीत होता, त्याची गोष्ट सांगतो. भानुमती नावाच्या त्याच्या लाडक्या राणीच्या सहवासात तो इतका गुंग असे की, त्याचे राज्यकारभाराकडे दुर्लक्ष होई. प्रधानाने त्याला पुष्कळ समजावले, पण राजा म्हणे, "मला तिच्याशिवाय चैनच पडत नाही. मी काय करावे?"

प्रधानाने सुचविले, "राणीचे हुबेहूब असे एक चित्र तयार करून आपल्या जवळ बाळगा. ते पाहून आपले मन रमेल व कार्यभारही सांभाळला जाईल."

राजाने ते ऐकले. एका चित्रकाराकडून उत्तम चित्र काढून घेतले. झिरझिरीत वस्त्रे परिधान केलेल्या राणीचे ते चित्र राजाने आपले गुरू शारदानंद यांना दाखविले. ते अंतर्ज्ञानी होते. ते म्हणाले, "चित्र तर यथारूप आहे, पण राणीच्या मांडीवरची जन्मखूण चित्रात दिसत नाही. एवढ्या तलम वस्त्रातून ती दिसायला हवी होती. चित्रकाराने कल्पनेने चित्र काढले आहे म्हणून असे असावे."

राजा विचारात पडला. "राणीच्या जन्मखुणेचे ज्ञान गुरूला कसे? याने एकांतात राणीची भेट घेतली असावी." शारदानंद अंतर्ज्ञानी आहेत ही गोष्ट तो विसरला. तो संतापला.

त्याने प्रधानाला बोलावून "शारदानंदांना रानात नेऊन ठार मारून टाका." अशी आज्ञा दिली. प्रधान चपापला, पण राजासमोर काहीच बोलला नाही. शारदानंदांना अटक करून तो निघून गेला. त्यांच्याकडून त्याला सत्य कळले. त्याने गुप्त स्थळी त्यांना लपवून ठेवले व राजाला 'आपल्या आज्ञेचे पालन झाले आहे' असे सांगितले. आततायी राजाची उतावीळ आज्ञा पाळून राजाची हानी करण्याची प्रधानाची इच्छा नव्हती.

त्यानंतर काही दिवसांनी युवराज विजयपाल शिकारीसाठी अरण्यात गेला. हरिणामागे धावता धावता त्याचा घोडा थकला आणि तोही थकला, तहानेने व्याकूळ झाला, रस्ताही चुकला. एका पाणवठ्याशी येताच तो घोड्यावरून खाली उतरला व पाणी पिऊ लागला. तेवढ्यात वाघाची गुर्रगुर्र ऐकू आली. तो दचकला. समोरच वाघ टपून बसला होता. युवराज घाबरून जवळच्याच झाडावर चढला. त्याचा घोडा केव्हाच पळून गेला होता!

झाडावर पाहातो तो त्याला एक अस्वल तिथे दिसले. तो जास्तच घाबरला.

पण अस्वल मानवी वाणीने त्याला म्हणाले, "मी व तू एकाच संकटात सापडलो आहोत. मी तुला मारणार नाही, घाबरू नकोस. युवराजाला नवल वाटले. जरा धैर्यही आले. तो तिथे बसून राहिला. मनुष्य व अस्वल यातले जे भक्ष्य मिळेल ते चालेल म्हणून वाघ टपून बसला होता. जरा वेळाने युवराजाला झोप येऊ लागली.

अस्वल म्हणाले, "तू झोप. मी तुला पडू देणार नाही. मी जागा राहून पाहारा करतो." युवराज त्याच्यावर विश्वास ठेवून झाडाच्या दोन फांद्यांमध्ये झोपला.

तेव्हा वाघ अस्वलाला म्हणाला, "तू व मी वनचर प्राणी. मानव आपला शत्रू. तू त्याला खाली लोट. मी त्याला खाऊन निघून जाईन."

पण अस्वलाने विश्वासघात केला नाही. तो बधला नाही. वाघाचा निरुपाय झाला.

उत्तररात्री युवराज जागा झाला. मग त्याने अस्वलाला डुलकी घेण्यास सांगितले व तो स्वतः जागा राहिला.

वाघाने पुन्हा प्रयत्न केला. तो म्हणाला, "अरे, मानवा, तीक्ष्ण नखे असलेले, शिंगे असलेले प्राणी यांचा विश्वास धरू नये. स्त्रिया, राजे व सशस्त्र लोक यांचाही विश्वास

धरू नये. नदीचाही भरंवसा नसतो. नदीनां च नखीनां च शृंगीनां शस्त्रपाणिनाम् विश्वासो नैव कर्तव्यः स्त्रीषु राजकुलेषु च।" हे अस्वल सकाळी तुझा घात करणार! आत्ताच तू त्याला ढकल. मी त्याला मारीन, खाईन व निघून जाईन."

वाघाने अस्वलाला नखे असतात म्हणून त्याचा विश्वास धरू नकोस असे युवराजाला सांगितले, पण वाघालाही नखे असतात, त्याचाही विश्वास धरू नये हे काही युवराजाच्या लक्षात आले नाही. तो अस्वलाला ढकलून देण्याच्या बेतात होता. तोच अस्वल जागे झाले!

अस्वल म्हणाले, "राजाचा विश्वास धरू नये." असे वाघ म्हणाला हे मी ऐकले! तू राजकुळातलाच असावास! अरे कृतघ्ना! तुला मी मगाशीच ठार नसते का मारले? पण जा. तुला दुबळा म्हणून जीवदान दिले आहे. तुला वेड लागेल. 'ससेमिरा' हा शब्द तू सारखा घोकत हिंडशील. जो कोणी 'ससेमिरा' चे कोडे उलगडील आणि तुला ते ऐकवील तोच तुला बरे करील. असा शाप मी तुला देतो."

सकाळ झाली. वाघ कंटाळून निघून गेला. अस्वल आणि युवराज झाडावरून खाली उतरले. युवराजाला सोडून अस्वल निघून गेले. युवराजाला वेड लागले. 'ससेमिरा' हा शब्द मोठमोठ्याने ओरडत तो रानात भटकू लागला.

त्याचा घोडा विशाल नगरीत गेला. राजा चिंता करीत होता. एकटा घोडा आलेला पाहाताच सारे घाबरले. काही सैनिक घेऊन राजा मुलाच्या शोधासाठी रानात गेला. धुंडाळता धुंडाळता ससेमिरा, ससेमिरा असे ओरडत, भटकत असलेला राजपुत्र एकदाचा सापडला! सर्वांना फार वाईट वाटले. त्याला घेऊन सारेजण नगरात परत आले.

आपल्या गुरूंची यावेळी राजाला फार आठवण झाली. पण!राजाने प्रधानाला दवंडी पिटविण्याची आज्ञा केली, "नगरातील जो कोणी राजपुत्राचे वेड दूर करील त्याला मोठे बक्षीस देण्यात येईल."

प्रधानाने दवंडी पिटविली. गुप्त जागी लपवून ठेवलेल्या शारदानंदांना प्रधानाने हा सारा प्रकार सांगितला. शारदानंदांनी दिव्यदृष्टीने रानातील सर्व प्रसंग पाहिला. 'ससेमिरा' चे कोडेही त्यांना सुटले. प्रधानाला विश्वासात घेऊन त्यांनी सांगितले, "हे पाहा, तुझी मुलगी पडद्याआड बसून राजपुत्राचे वेड नाहीसे करील, पण तिला कोणीही पाहू नये. असे तू राजाला सांग. मीच वेषांतर करून तिथे बसेन."

प्रधान राजाकडे गेला. त्याने तसे सांगितले. राजाला नवल वाटले, पण त्याने पडद्याची व्यवस्था केली. कोणालाही नकळत शारदानन्द स्त्रीवेष धारण करून पलीकडे बसले. पडद्यासमोर युवराजाला बसविले.

तेव्हा शारदानंदांनी स, से, मि, रा या अक्षरांनी सुरुवात होणारे चार श्लोक हळूहळू पडद्याआडून युवराजाला ऐकविले –

सद्‌भाव प्रतिपन्नानां वंचने का विदग्धता ।
अङ्‌कमारुह्य सुप्तानां हन्तुः किं नाम पौरुषम् ॥१॥
सेतुं गत्वा समुद्रस्य गङ्‌गासागर-सङ्‌गमम् ।
ब्रह्मघ्नोऽपि विमुच्येत मित्रद्रोही न मुच्यते ॥२॥
मित्रद्रोही कृतघ्नश्च तथा विश्वासघातकः ।
त्रयस्ते नरकं यान्ति यावच्चन्द्रदिवाकरौ ॥३॥
राद्धान्तः सर्व शास्त्राणामयं न कलुषं परम् ।
विश्वासघातात्पुण्यं च न परोपकृतेः परम् ॥४॥

हे श्लोक ऐकता ऐकता युवराजाचे वेड कमी होत गेले. पहिला श्लोक ऐकल्यावर तो फक्त 'सेमिरा' म्हणू लागला, दुसऱ्या श्लोकानंतर 'मिरा' एवढेच म्हणू लागला,

तिसऱ्या श्लोकानंतर 'रा' एवढेच म्हणू लागला व चौथा श्लोक म्हटल्यानंतर त्याचे वेड नाहीसे झाले. या श्लोकांचा अर्थ रानांतील प्रसंगाला अनुसरून होता.

अर्थ :– सरळ मनाने आश्रयास आलेल्यांना फसविण्यात काय चांगुलपणा आहे? मांडीवर निजलेल्याला मारण्यात कसला पुरुषार्थ? (१) रामेश्वरास किंवा गंगेच्या मुखाशीं सागरस्नान करून ब्रह्महत्यारा सुद्धा पापमुक्त होईल. पण मित्रद्रोही मुक्त होणार नाही. (२) मित्रद्रोही, कृतघ्न व विश्वासघात करणारा या तिघांना कायम नरकात पडावे लागते. (३). सर्व शास्त्रांचे सार हेच की, विश्वासघाताइतके पाप नाही व परोपकाराइतके पुण्य नाही. (४)

युवराज राजाच्या पाया पडला. अरण्यात घडलेला प्रसंग त्याने सर्वांना सांगितला.

राजा फार आनंदला. त्याला नवल वाटत होते. त्याने पडद्याआडच्या 'मुलीला' उद्देशून प्रश्न विचारला, "हे श्लोक तुला कसे कळले?" 'मुलीने' उत्तर दिले, "ज्या दृष्टीने राणीच्या मांडीवरील जन्मखूण कळली त्याच दृष्टीने श्लोक कळले."

राजा चमकला. त्याला शारदानंदांचे स्मरण होऊन वाईट वाटले. त्याने पडदा बाजूस केला तेव्हा शारदानंद प्रगट होऊन म्हणाले, "राजा आततायी असला व युवराज वन्य प्राण्याचाही विश्वासघात करणारा असला तरी प्रधान शहाणा व गुरु ज्ञानी असला तर सारे निभावून जाते."

राजाने गुरूंना वारंवार वंदन करून त्यांची क्षमा मागितली. गुरू म्हणाले, "राजा, गुरू शिष्यावर कधी रागावत नसतो. तुला क्षमा केलीच आहे. राजपुत्राला बरे करण्याबद्दल जे बक्षीस देणार आहेस ते या प्रधानाला दे."

राजाने सारे काही तसेच केले. नगरात मोठा उत्सव केला.

एवढी गोष्ट सांगून विप्र विक्रमाला म्हणाला, "यावरूनच मी आपल्याला पहिला श्लोक म्हणून दाखविला. कुलीन प्रधानामुळेच अनर्थ टळला.

विक्रमाने अगोदर विप्राला एक लक्ष सोन्याची नाणी दिली होती. आता आणखी तेवढेच द्रव्य दिले व प्रसन्न होऊन तो आशीर्वाद देऊन निघून गेला.

विजया परी भोजराजाला म्हणाली, "एवढे औदार्य तुझ्या अंगीं आहे का?"

राजा निरुत्तर होऊन महालात परत गेला. विजया पुन्हा मूर्तिरूप झाली.

कथा तिसरी

विक्रमाचे मनोधैर्य

भोजराजाला चैन पडेना. दुसऱ्या दिवशी तो पुन्हा सिंहासनाजवळ आला. सिंहासनावर बसायचा त्याचा बेत होता तोच आवाज झाला, "थांब! राजा थांब! विक्रम-राजा सारखे धैर्य तुझ्या अंगी आहे काय?"

तिसरी मूर्ती सजीव झाली आणि बोलू लागली, "माझे नाव जयंती. विक्रमाच्या धैर्याविषयी एक गोष्ट मी सांगते ती ऐक –

विक्रमराजाचे हेर ठिकठिकाणी हिंडून बातम्या काढीत असत आणि त्या विक्रमाच्या कानावर घालीत असत. चित्रकूट पर्वतावर एकदा एक हेर गेला होता. तो येऊन विक्रमाला सांगू लागला, "महाराज, चित्रकूट पर्वतावर मी एक आश्चर्य पाहिले. तिथे एक जगदंबेचे मंदिर आहे. मंदिराजवळच एक नदी आहे. पुण्यवंताने त्या नदीत स्नान केले तर त्या नदीचे पाणी अधिक स्वच्छ होते आणि पापी माणसाने स्नान केले तर पाणी एकदम गढूळ होऊन जाते. देवीच्या मंदिरात एक ब्राह्मण अनेक वर्षे तप करीत आहे तरी देवी त्याच्यावर कृपा करीत नाही हेही एक आश्चर्यच आहे, "महाराज, आपण हा प्रकार पाहाल तर आपल्यालाही आश्चर्य वाटेल."

राजाचे कुतूहल जागृत झाले. हेराला निरोप देऊन व राज्याची व्यवस्था लावून तो एकटाच चित्रकूट पर्वतावर हेराने सांगितलेल्या माहितीप्रमाणे गेला. तेथील नदी व मंदिर पाहून त्याला फार प्रसन्न वाटले. तो नदीत स्नानाला उतरला तेव्हा नदीचे पाणी स्फटिकासमान झाले. आपण पवित्र आहोत हे समजून त्याला आनंद झाला. स्नान केल्यावर तो मंदिरात गेला. देवीचे दर्शन घेऊन त्याने तिथे जप करीत असलेल्या विप्राला विचारले, "विप्रवर्य, आपण किती काळ तप करीत आहांत?" ब्राह्मण म्हणाला, "महाराज, माझ्या लहानपणापासून मी इथे येऊन नित्य तप करतो. देवीची स्तोत्रे म्हणतो. कंदमुळे खाऊन राहातो. तीन तपांवर काळ लोटला असेल; अजून मला देवी प्रसन्न होत नाही."

विक्रम म्हणाला, "मी पण तुझ्यासाठी जप करतो. आपण दोघे मिळून देवीला आळवू या." तो मंदिरात बसला आणि 'जगदंब, जगदंब!' असा जप करू लागला.

दोन-तीन दिवस गेले. राजाच्या मनात विचार येऊ लागला–हा नश्वर देह या विप्राच्या तपाचे फळ त्याला मिळण्यासाठी मी देवीच्या पायांशी अर्पण करतो.

तो हळूच उठला आणि मूर्तीच्याजवळ जाऊन म्हणाला, "जगन्माते, या विप्रावर दया कर. त्यासाठी मी माझे बलिदान द्यायला तयार आहे." त्याने खड्ग उपसले मूर्तीसमोर गुडघे टेकून तो बसला आणि खड्गाचा घाव आपल्या मानेवर घालण्यास त्याने खड्ग परजले.

हे पाहाताच देवी प्रगट झाली. तिने विक्रमाला थांबविले, त्याला अभय दिले आणि म्हटले, "राजा, तू या ब्राह्मणासाठी प्राण का अर्पण करतोस ? मी त्याला दर्शन दिले नाही कारण त्याच्या ठिकाणी उत्कट, अनन्य भक्ती नाही." राजा देवीला म्हणाला, "माझी अशी प्रार्थना आहे की, तू ह्या ब्राह्मणाला दर्शन देऊन त्याची मनोकामना पूर्ण कर. तुझ्या दर्शनाने त्याचे मन सात्त्विक होवो."

देवी म्हणाली, "तथास्तू! मी त्याला दर्शन देते पण हे लक्षात ठेव –

न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे न मृण्मये ।
भावे हि विद्यते देवस्तस्माद्भावो हि कारणम् ॥

अर्थः– देव हा लाकूड, दगड, माती यांत नसतो, मूर्तीत नसतो. देव जसा भाव असेल तसा आणि तिथे असतो म्हणून देव प्रसन्न होण्यास सद्भाव हाच कारण आहे."

तिकडे तो विप्र डोळे मिटून जप करीत होता तोच त्याला देवीचे दर्शन घडले. तो एकदम देवीच्या पाया पडला. देवीने त्याला "तुझी इच्छा पूर्ण होईल." असा वर दिला. विक्रमाला धन्यवाद देऊन देवी अंतर्धान पावली. त्या विप्राने विक्रमाची प्रशंसा केली, पण राजा म्हणाला, "लोकांची अडलेली कामे पुरी करण्यात मला धन्यता वाटते."

जयंती परी भोजराजाला म्हणाली, "राजा, तुझ्या अंगी जर विक्रमासारखे धैर्य असेल तर तू या सिंहासनावर बैस." राजा शरमिंदा झाला आणि तिथून निघून गेला. जयंती पुन्हा मूर्तिरूप झाली.

कथा चौथी

चार रत्नांची गोष्ट

विक्रमादित्याच्या अद्‌भुत कथा ऐकण्याची भोजराजाला उत्कंठा लागली होती. दुसऱ्या दिवशी तो पुन्हा सिंहासनाजवळ गेला. सिंहासनाच्या चौथ्या परीच्या हाताला त्याने स्पर्श केला. तत्काळ ती मूर्ती जिवंत होऊन देवी सारखी दिसू लागली.

ती राजाला म्हणाली, "जमिनीत पुरलेले हे सिंहासन तू कशासाठी आणले आहेस ?" त्यावर बसण्याची तुझी इच्छा असेल तर व्यर्थ होय. विक्रमासारखा तुझा पराक्रम आहे का ? त्याच्याएवढा तू उदार तरी आहेस का ? पुन्हा विचार कर."

उद्यमं साहसं धैर्यं बलं बुद्धिः पराक्रमः ।
षडेते यत्र तिष्ठन्ति तत्र शक्रो ऽपि शंकते ॥

अर्थः– दीर्घोद्योग, धाडस, धैर्य, शक्ती, बुद्धिमत्ता आणि पराक्रम हे सहा गुण ज्याच्या अंगात असतात त्याला इंद्रही घाबरतो.

विक्रमाच्या अंगी असे गुण होते. एकदा काय झाले, विक्रमराजाला आपण मोठा यज्ञ करावा असे वाटले. यज्ञाची सिद्धता फार मोठ्या प्रमाणावर केली गेली. विक्रमाने एका विप्राला सांगितले, "या यज्ञाला समुद्राने हजर राहावे असे मला वाटते. माझ्या वतीने बोलावणे करण्यास तू जा." गंधाक्षता घेऊन ब्राह्मण समुद्राच्या तीरी गेला. आपोदेवतेचे मंत्र म्हणून त्याने समुद्राला अर्घ्य दिले. गंधाक्षता अर्पण करून विनंती केली, "हे सागरा,

रत्नाकरा, शेषशायी विष्णूला तू आश्रय देतोस, असंख्य जलचरांना जीवन देतोस, विक्रमराजाची एवढी प्रार्थना ऐक. त्याने एक यज्ञ आरंभिला आहे, त्यासाठी तू उपस्थित राहावेस असे त्याचे आग्रहाचे निमंत्रण आहे."

एवढे बोलून ब्राह्मणाने विशाल सागराचे ध्यान केले तेव्हा त्याच्यासमोर मनुष्यरूपाने सागर प्रगट झाला. त्याचा मुगुट तेजस्वी रत्नानी झळकत होता. त्याच्या अंगावरील वस्त्रे रजत व नील वर्णाची होती. विविध जलचरांच्या आकृतींची भूषणे त्याने धारण केली होती. विप्राला अभय देऊन तो म्हणाला, "विक्रमाच्या यज्ञास येणे हे माझे भाग्य आहे, पण मला माझी मर्यादा ओलांडता येत नाही. मी चार रत्ने देतो ती घेऊन जा आणि विक्रमाला दे. त्याला असे सांग की, या रत्नापैकी पिवळे रत्न द्रव्य देईल, पाचू अन्न देईल, माणिक सैन्य उत्पन्न करील आणि नीलमणी भूषणे देईल. फक्त या रत्नांची पूजा केली म्हणजे झाले."

सागराने ब्राह्मणाला व विक्रमाला आशीर्वाद दिला. ब्राह्मण परत आला. राजाजवळ त्याने रत्ने दिली. सागराचा निरोप सांगितला. विक्रमाने सांगितलेली आणखी काही निमंत्रणे त्याला करायची होती म्हणून तो निघून जाऊ लागला. विक्रमाने रत्ने पाहिली. ब्राह्मणाच्या मुद्रेकडे पाहिले. या रत्नांबद्दल ब्राह्मणाच्या मनात काही इच्छा असली तर

पुरी करावी म्हणून तो म्हणाला, " विप्रवर्य, जरा थांबा! आपण माझे चांगले कार्य केलेत. मी आपल्याला एक रत्न देईन म्हणतो. आपल्याला कोणते रत्न हवे ? "

ब्राह्मणाला काहीच ठरविता येईना. त्याला आपली पत्नी, मुलगी, मुलगा व सून यांची आठवण झाली. तो म्हणाला, " महाराज, मी घरी विचारून येतो. " राजाने अनुज्ञा दिली. ब्राह्मण घरी गेला पण कोणते रत्न घ्यावे याबद्दल बरेच मतभेद झाले. पत्नीला पाचू हवा होता तर मुलाला माणिक;मुलीला पुष्कराज तर सुनेला नीलमणी. रत्ने मिळाली नसताना सुद्धा चौघे आपसांत भांडू लागले. ब्राह्मणाला वाटले, त्या रत्नामुळे घरात सुखाऐवजी दु:खच होईल. त्यापेक्षा रत्न न आणलेले बरे. तो राजाकडे परत गेला आणि राजाला म्हणाला, " मला एकही रत्न नको. "

विक्रम म्हणाला, " असे कां ? काय झाले ? "

विप्र म्हणाला, " माझ्या घरातील प्रत्येकाला वेगवेगळे रत्न हवे आहे. मी काय करू ? "

राजा म्हणाला, " एवढेच ना ? मग चारी रत्ने तूच घेऊन जा " ब्राह्मण थक्क झाला. राजा पुढे म्हणाला, " तुझ्या घरातील सर्वांच्या इच्छा पूर्ण होऊ देत " ब्राह्मणाने आदराने राजाला नमस्कार करण्याचा प्रयत्न केला; पण त्याआधी विक्रमाने त्याचे हात धरले आणि त्याच्या हातात चारही रत्ने ठेवली.

ती अपराजिता नावाची परी भोजराजाला म्हणाली, " पाहा! विक्रमाचे औदार्य पाहा! सागराला यज्ञाला बोलविण्याचा पराक्रम तुझ्या अंगी आहे का? आणि समुद्र प्रगट होईल का ? आणि अशी चारही रत्ने तू देऊन टाकशील का ? बोल! तुझ्या मनाला विचार आणि मगच या सिंहासनावर बैस. "

पाहाता पाहाता ती परी पुन्हा मूर्तिरूप झाली. भोजराजा आपल्या महालात परत गेला.

कथा पाचवी

पुत्रशोक सहन करणारा विक्रम

भोज राजाला दुसऱ्या दिवशी आणखी अद्‌भुत गोष्ट ऐकण्याची उत्कंठा लागली आणि सिंहासनाजवळ जाऊन त्याने पाचव्या परीच्या मूर्तीला स्पर्श केला. ती सजीव झाली व त्याच्यासमोर प्रगट होऊन म्हणाली, " राजा, तू जर विक्रमासारखा कृतज्ञ असशील तरच या सिंहासनावर बसण्याची मनीषा धर."

राजा म्हणाला, " मला जर राजा विक्रमादित्याच्या कृतज्ञपणाची गोष्ट सांगितलीस तर मी तो गुण अंगी आणण्याचा प्रयत्न करीन; पण मी कृतघ्न नाही एवढे मात्र खरे."

परी म्हणाली, " माझे नाव ' जयघोषा ' आहे. विक्रमाच्या कीर्तीचे वर्णन करावे तेवढे थोडेच. मी कथा सांगते ती ऐक –

विक्रमाच्या अवंती नगरीत देवदत्त नावाचा एक विप्र राहात असे. तो यज्ञासाठी समिधा आणायला मधून मधून वनात जात असे व तिथे पर्णकुटीत विश्रांती घेत असे. असाच तो एकदा वनात गेला असताना, शिकारीला आलेला व दमलेला आणि वाट चुकलेला राजा विक्रम त्याला इकडेतिकडे मार्ग शोधीत असलेला दिसला. देवदत्ताने त्याला रानातीलच आपल्या पर्णकुटीत नेले;त्याचा यथाशक्ती पाहुणचार केला. फळे व पाणी दिले, विश्रांती घेण्याची सोय केली. राजाला फार बरे वाटले. राजाला नगरात परत जायचे होते, तेव्हा तो विप्र त्याला मार्ग दाखविण्यासाठी नगरापर्यंत आला. आपल्या हातून आपल्या पुण्यश्लोक राजाची सेवा घडली याची त्याला धन्यता वाटली. विक्रमाने त्याला प्रधानाकरवी पुष्कळ द्रव्य दान दिले आणि म्हटले –

" विप्रवर्य, आपले माझ्यावर फार उपकार झाले आहेत, मी तुमचा उतराई कसा होऊं ? मी हे उपकार कधीच विसरणार नाही "

विप्र द्रव्य घेऊन मोठ्या आनंदाने घरी गेला. राजाने म्हटलेले त्याच्या लक्षात होते. तो नंतर कधीकधी राजाच्या दरबारात येत असे. राजाची कसोटी घ्यावी असे एकदा त्याच्या मनात आले. दरबारात व राजपरिवारातही त्या विप्राचा सर्वांना चांगला परिचय झाला होता एकदा काय झाले, राजपुत्र चार वर्षांचा होता विप्र त्याच्या चांगला ओळखीचा

होता. तो त्याच्याजवळ येत असे, खेळत असे. त्याला त्या विप्राने आपल्या बरोबर घेतले. राजपुत्राच्या अंगावर मूल्यवान भूषणे होती. ब्राह्मणाने सर्वांचा डोळा चुकवून त्या मुलाला रानात आपल्या पर्णकुटीत नेले. कोणालाही कळले नाही. राजपुत्रही आनंदाने गेला.

इकडे विक्रमाला शोक झाला. राजपुत्र हरवला म्हणून नगरात वार्ता पसरली. शोधाशोध सुरू झाली. सैनिक सर्वत्र तपास करू लागले. हेर फिरू लागले. देवदत्ताने राजपुत्राचा एक दागिना जवळच राहाणाऱ्या गुराख्याला दिला आणि नगरात जाऊन विकून पैसे आणायला सांगितले.

गुराखी ज्या व्यापाऱ्याकडे गेला त्याने दागिना राजपुत्राचा आहे हे ओळखले. त्याने गुराख्याला विचारले, तेव्हा गुराख्याने देवदत्ताचा पत्ता सांगितला. व्यापाऱ्याने गुराख्याला अडकवून ठेवले आणि देवदत्त ब्राह्मणाला पकडून विक्रमाच्या सभेत आणले व विक्रमाला सारा प्रकार सांगून दागिना त्याच्यासमोर ठेवला.

राजाने प्रथम आज्ञा दिली, " या देवदत्तांना बांधले आहे त्यांना मोकळे सोडा." त्याला सोडताच राजाने त्याला बसायला आसन दिले व विचारले, " विप्रवर्य, आपल्याला हे भूषण कोठे सापडले ? हे राजपुत्राचे आहे. तो आपल्याला कोठे दिसला का ? तो सुखरूप आहे ना ? "

ब्राह्मण खोटेच म्हणाला, " महाराज, तुमच्या मुलाला मी पळविले आणि त्याचे दागिने काढून घेऊन त्याला रानात मारून टाकले. हा दागिना विकून द्रव्य आणण्यासाठी मीच या गुराख्याला पाठविले आहे. "

ब्राह्मणाचा कबुलीजबाब ऐकून दरबारात एकदम हाहाकार माजला. ब्राह्मणाची सर्व चौकशी करून त्याला मृत्युदंड द्यावा असे लोक म्हणू लागले.

राजा विक्रम एकदम गंभीर झाला. त्याने आपले दुःख बाहेर दिसू दिले नव्हते. तो म्हणाला, "देवदत्ता! मला पुत्रशोक झालेला आहे. आपण केलेल्या कृत्याबद्दल आपल्याला शिक्षा केली पाहिजे, पण आपण एके काळी माझ्यावर मोठे उपकार केले आहेत ते मी लक्षात ठेवले आहेत. मी आपल्याला मुक्त करीत आहे!"

दरबार तटस्थ! लोक चकित झाले! ब्राह्मण थक्क झाला! विक्रम पुढे म्हणाला, " प्रधानजी, आपण या विप्रवर्यांना भरपूर संपत्ती द्या म्हणजे हे संतुष्ट होतील. पुन्हा द्रव्यासाठी कोणाचे अपहरण व घात करणार नाहीत. "

ब्राह्मण रडू लागला. तो म्हणाला, " महाराज, तुमची मी परीक्षा पाहिली. तुमचा मुलगा सुखरूप आहे. तुमची कृतज्ञता तिन्ही लोकांत अद्वितीय आहे. मला द्रव्य मुळीच नको. " ब्राह्मणाचे हे दुसरे बोलणे ऐकून सभेतील लोकांना आणखी एक धक्का बसला! सर्वांच्या तोंडून हर्षोद्‌गार निघाले.

ब्राह्मणाने राजपुत्राला आणून राजाजवळ हजर केले. सर्वत्र आनंदीआनंद झाला. विक्रमाचे धैर्य, त्याची कृतज्ञता व विवेक यांची देवही प्रशंसा करू लागले!

' जयघोषा ' भोजराजाला म्हणाली, " राजा, एवढे दुःख सहन करून दुसऱ्याला क्षमा करण्याचे सामर्थ्य तुझ्यात आहे का ? तरच तू या सिंहासनाचा लोभ धर!"

राजा म्हणाला, " नाही, मला माझ्याविषयी खात्री नाही. " परी पुन्हा मूर्तिरूप झाली व राजा आपल्या महालात परत गेला.

कथा सहावी

जवाहिऱ्याच्या प्रामाणिकपणाचे बक्षीस

राजपुत्राच्या मृत्यूचाही शोक न करणाऱ्या विक्रमाच्या अंगी आणखी कोणते गुण होते ते जाणून घेण्याची उत्कंठा भोज राजाला लागली. म्हणून तो त्यानंतरच्या दिवशी सिंहासनाजवळ गेला आणि त्याने आणखी एका मूर्तीला स्पर्श केला. 'लीलावती' नावाची परी त्यावेळी प्रगट झाली आणि म्हणाली, " भोजराज, विक्रम राजा गुणग्राहक होता तसा तू आहेस का ? विक्रम किती गुणज्ञ होता त्याची कथा ऐक म्हणजे तुला तुझ्या स्वतःच्या गुणांची ओळख पटेल."

"विक्रम राजाच्या कितीही गोष्टी सांगितल्यात तरी मला कंटाळा येणार नाही." भोजराजा म्हणाला.

लीलावती म्हणाली, "एकदा विक्रमाच्या सभेत एक जवाहिऱ्या आल्या. त्याने पुष्कळ रत्ने राजासाठी आणली होती. त्यातले एक रत्न फारच मोठे, सुंदर व चमकदार होते. पाहाताच डोळे दिपावेत असे ते रत्न फार मौल्यवान् होते.

राजाच्या सराफांनी त्या रत्नाचे मूल्य एक सहस्र सुवर्णमुद्रा एवढे केले ;पण रत्न राजाला फारच आवडले होते. त्याने एक सहस्र सुवर्णमुद्रा देऊन ते रत्न त्या जवाहिऱ्याकडून खरेदी केले. राजा त्याला म्हणाला,

"याच आकाराची व हीच चमक असणारी आणखी दहा रत्ने तू एक महिन्याच्या आत इथे आणून दे. मी ती विकत घेईन, पण उशीर केलास तर काहीही घेणार नाही."

जवाहिऱ्या फार आनंदित झाला. विक्रमाचे औदार्य पाहून त्याला आश्चर्य वाटले. तो स्वदेशी गेला. त्याने त्याच नमुन्याची दहा रत्ने घेतली आणि तो परत यायला निघाला.

पावसाळ्याचे दिवस असल्याने वाटेत एका नदीला पूर आला होता. त्याला पुढे जाता येईना. त्याला अलीकडच्या एका गावी नदीचा पूर ओसरेपर्यंत थांबावे लागले. त्याची राहाण्याची सोय रामदास नावाच्या एका सराफाकडे झाली. त्याला एक महिन्याच्या आत विक्रमाकडे जायचे होते. रामदासाकडे रात्री बोलताना आपल्या पुढील बेताची माहिती त्याने रामदासाला सांगितली. तो म्हणाला, "नदीचा पूर कधी ओसरेल हे काही सांगता

येत नाही; वेळेवर अवंतीला पोहोचलो नाही तर माझ्याजवळची रत्ने राजा घेणार नाही. या पुरात नौका तरी कोण चालवणार? काही करून मला पुढे जायलाच हवे. तुम्ही काही सोय करू शकता काय?"

हा मनुष्य चांगला अडलेला आहे हे पाहून सराफ त्याला म्हणाला, "माझ्या ओळखीचा एक नावाडी आहे. तो धाडसी आहे. तुझ्याजवळ जी दहा रत्ने आहेत ती सगळीच राजाला देणे भाग आहे का? त्यातील पाच रत्ने मला दे आणि 'पाचच रत्ने मला आणता आली', असे राजाला सांग, म्हणजे राजा एवढा रागावणार नाही."

जवाहिऱ्या म्हणाला, "पाच रत्ने फार होतात, पण मला राजाज्ञेचे महत्त्व फार वाटते म्हणून मी तुला ती देतो." त्याने पाच रत्ने काढून सराफाला दिली. सराफाने दुसऱ्या दिवशी सकाळी एका भक्कम नावेची सोय करून जवाहिऱ्यास पैलतीरास पोचविले.

मजल दर मजल करीत जवाहिऱ्या अवंती नगरीत परत पोहोचला. राजाला त्याने वाटेत काय घडले ते सांगून दहा रत्नांऐवजी पाचच रत्ने दिली व क्षमा मागितली. जवाहिऱ्याची चाल-चलणूक राजाला प्रामाणिकपणाची वाटली. राजाज्ञा मोडण्यात भय असते यासंबंधी त्याला एक श्लोक आठवला.

आज्ञाभंगो नरेंद्राणा विप्राणा मानखंडनम् ।।
पृथक् शय्या च नारीणामशस्त्रवध उच्यते ।।

अर्थ:– राजे लोकांची आज्ञा भंग करणे, विप्राचा अपमान करणे आणि स्वतःच्या स्त्रीला विनाकारण एकटे अलग झोपण्यास सांगणे या गोष्टीमुळे त्यांचा शस्त्राशिवाय घात केल्यासारखे होते असे म्हणतात.

राजा जवाहिऱ्याला म्हणाला, "शेटजी, वाटेल ती किंमत देऊन तुम्ही माझी आज्ञा पाळलीत, यात आपले तारतम्य, सौजन्य, तत्परता दिसून आली. तुम्ही प्रामाणिक आहात मी तुम्हाला दहा रत्नांचे मूल्य देणार आहे आणि आपण आणलेली पाच रत्नेही माझ्यातर्फे तुम्हाला बक्षीस देत आहे!" असे म्हणून राजाने पाचही रत्ने व दहा रत्नांची किंमत जवाहिऱ्याला दिली.

जवाहिऱ्या थक्क झाला. त्याने राजाला वारंवार प्रणाम केला आणि तो निघून गेला.

लीलावती भोजराजाला म्हणाली, "प्रामाणिकपणाचा गुण जवाहिऱ्याच्या अंगी आहे हे पाहून विक्रमाने त्याला एवढे बक्षीस दिले! तू इतका उदार आहेस का?"

भोजराजा म्हणाला, "मी इतका उदार नाही, पण विक्रमाच्या कथा ऐकाव्यात म्हणून इथे रोज येऊन तुम्हाला विचारणार आहे."

लीलावतीची पुन्हा जडमूर्ती झाली आणि राजा परत गेला.

कथा सातवी

विक्रम साधूची इच्छा पूर्ण करतो

भोजराजाने दुसऱ्या दिवशी जेव्हा सिंहासनाला स्पर्श केला तेव्हा सातव्या परीची मूर्ती सजीव झाली आणि राजाला म्हणाली, " भोजराज! विक्रमादित्य राजाचे गुण तुझ्या अंगी आहेत का? तो दुसऱ्यांच्या अपुऱ्या इच्छा पूर्ण करून त्यांना संतुष्ट करीत असे. मी 'मंजुघोषा' आहे. तुला माझ्या सख्यांनी आजपर्यंत सहा कथा सांगितल्या. विक्रमादित्याचा हा गुण सांगणारी ही कथा आता ऐक –

वसंतऋतू असताना विक्रमादित्य एकदा चंपकवनात गेला होता. तेथे एक कमळांचे तळे होते, त्यांत हंस होते. सर्वत्र नाना प्रकारची फुले फुलली होती. विक्रमाला ते शांत स्थान पसंत असल्यामुळे त्याने तिथे राहाण्यासाठी एक सुंदर पुष्करिणीसह महाल बांधला होता. त्याच्या स्त्रियांसह तो तिथे मधूनमधून विहार करण्यासाठी येत असे. तसाच आताही तो आला होता आणि त्या तलावात स्त्रियांसह जलविहार करीत होता.

त्या चंपकवनातच एक तपस्वी राहात असे. विक्रमाचे राजवैभव व त्याची स्त्रियांसह चाललेली जलक्रीडा त्याने पाहिली. त्याचे मन त्यामुळे विचलित झाले. त्याच्या मनात आले –

'ज्या स्वर्गसुखासाठी मी तप करीत आहे त्यापेक्षा जास्त वैभव तर हा राजा इथेच भोगत आहे. मग मी कशाला व्यर्थ जप करू ? कशाला तपस्या करू ? आता जर राजाजवळ आपली इच्छा सांगितली तर तो ती पूर्ण करील.'

साधू त्या विचारासरशी जागेवरून उठला आणि राजाजवळ आला. राजाने आपली जलक्रीडा आटोपली होती व तो महालात बसला होता. त्याने साधूचे आदराने स्वागत केले. त्याची इच्छा काय आहे असे विचारले.

साधू म्हणाला, " महाराज, मला देवी प्रसन्न झाली. तिने वर दिला. तिची आज्ञा आहे की, मी विवाह करून संसारसुख भोगावे. माझा विवाह करून द्यावा अशी विनंती मी आपल्याला करावी असे देवीने सांगितले आहे."

आपले वैभव व विलास पाहून साधूला तशी इच्छा झाली आहे हे जाणून राजाने त्याची विनंती मान्य केली व साधू विवाहयोग्य आहे असे पाहून काही तरुणी त्याला दाखविल्या. त्या पाहून साधूला एकीपेक्षा अधिक तरुणी आवडल्या. राजाने सुंदर आणि सद्गुणी अशा सहा तरुणींशी त्याचा विवाह लावून दिला. त्याला चरितार्थाचे साधन दिले. भरपूर वस्त्रेभूषणे, सोने, नाणे, धान्य व वस्तू दिल्या त्याला काही कमी पडू नये असे पाहिले व चंपकवनाचा राजा केले.

साधू संसारात सुखी झाला. त्याने चंपकवनाची व्यवस्था उत्तम ठेवली. तो विक्रमादित्याला धन्यवाद देत आयुष्यभर आनंदाने राहिला.

मंजुघोषा एवढी गोष्ट सांगून भोजराजाला म्हणाली, " राजा, तुझ्या ठिकाणी स्वतःचे विहारस्थान देऊन टाकण्याचे औदार्य आहे का ? नसेल तर सिंहासनावर बसू नकोस."

राजा म्हणाला, " मला विक्रमादित्याचे गुण वारंवार ऐकावेसे वाटतात. मी आज परत जातो. उद्या पुन्हा येईन."

ती परी पुन्हा मूर्तिरूप झाली आणि राजा आश्चर्य करीत आपल्या महालात गेला. राणीला रोज तो विक्रमाची कथा ऐकवीत असे त्यामुळे तिलाही फार नवल वाटत असे.

कथा आठवी

लोकांसाठी विक्रमादित्य प्राण देण्यास सज्ज!

दुसऱ्या दिवशी भोजराजा मोठ्या उत्सुकतेने विक्रमादित्याच्या त्या अद्भुत सिंहासनाजवळ गेला. त्याने आठव्या मूर्तीच्या चरणांना स्पर्श केला. ती परी स्त्रीरूप धारण करून जागृत झाली आणि म्हणाली, "राजा, माझे नाव जयसेना आहे. विक्रमाच्या साहसीपणाची कथा मी तुला सांगते. त्यावरून तू बोध घेशील. तुझ्या अंगी असे साहस आहे का याचा विचार कर! लोभाने या सिंहासनावर बसण्याची इच्छा करू नको."

विक्रमाच्या राज्यात धनश्रेष्ठ नावाचा एक सावकार आपला व्यवसाय सांभाळून असता एकदा फार रोगजर्जर झाला. त्याच्या मनात आपल्या धनलोभाबद्दल पश्चात्ताप उत्पन्न होऊन, आपण ह्या धनाचा परोपकारासाठी उपयोग करावा असे त्याने ठरविले. त्याने रोगमुक्त झाल्यावर आपले पुष्कळसे द्रव्य दानधर्मात खर्च केले. तो तीर्थयात्रेला निघाला.

तीर्थयात्रा करीत असता त्याने पुष्कळ प्रवास केला, अनेक पवित्र स्थाने व पुण्यक्षेत्रे पाहिली. असाच तो जात असता एका दिवशी, समुद्रतीरावर, एका अवघड जागी असलेल्या देवीच्या पुरातन मंदिरात गेला.

ते दगडी मंदिर भयाण असून, त्यांत पुष्कळसा अंधार आहे व तेथे फारसे कोणी फिरकत नसावे असे त्याला दिसून आले. देवीची मूर्ती सिंहावर बसलेली, अष्टभुजा असून तिजकडे पाहाण्याचे धैर्य होत नव्हते. त्याने घंटा वाजविली. देवीला नमस्कार केला, "जय जगदंबे!" म्हणून पुकारले आणि जिज्ञासेने सभामंडपात नजर टाकली.

तो एकदम दचकला. जिकडेतिकडे कितीतरी प्रेते पडली होती. त्यांची मस्तके तोडलेली होती. मूर्तीच्या दोन्ही बाजूसही प्रेते पडलेली होती. काही तर नुकतेच मृत झालेले असावेत असे दिसत होते. सावकार फारच घाबरला. आपणही मरून पडू, कोणीतरी आपले डोके उडवील असे भय त्याला वाटू लागले. "हे मंदिर वाममार्गीयांचे

असावे. आपण सर्वत्र फिरलो पण हा प्रकार दिसला नाही. पण या प्रेतांची दुर्गंधी कशी येत नाही? आणि देवीसमोर कोणीतरी दीप कसा लावलेला आहे?" तो असा विचार करीत असताना, त्याचे लक्ष भिंतींकडे गेले. एका भिंतीवर अक्षरे खोदलेली दिसली –

वीरश्चिच्छन्द्यान्निजं शीर्षं प्रतिमापुरतः स्वयम् ।
तर्हि सर्वेऽपि शौर्येण जीविताः सन्ति नान्यथा ॥

अर्थः– जर कोणी साहसी वीर या ठिकाणी आपण स्वतः आनंदाने आपला शिरच्छेद करील, तर त्याच्यामुळे हे सर्व लोक पुन्हा जिवंत होऊन उठतील, अन्यथा नाही.

सावकार चकित झाला. तो लवकरच अवंती नगरीस परत आला. विक्रम राजाला देवीच्या त्या मंदिरातील प्रकार सांगण्यासाठी तो राजमहालात गेला.

रिक्तपाणिर्न पश्येत राजानं देवतां गुरुम् ।
दैवज्ञं भिषजं मित्रं फलेन फलमादिशेत् ॥

असा श्लोक आहे. राजा, देवता, गुरू, ज्योतिषी, वैद्य व मित्र यांच्या दर्शनाला किंवा भेटीला जाताना रिकाम्या हाताने जाऊ नये, आपण फळ वगैरे तरी न्यावे आणि मगच कसल्याही गोष्टीची अपेक्षा करावी."

याप्रमाणे तो सावकार, काही भेटवस्तू घेऊन विक्रमाकडे गेला. तीर्थयात्रेतील अनेक आश्चर्ये वर्णन करून त्याने देवीच्या मंदिरातील तो भयंकर प्रकारही राजाला सांगितला.

राजाचे कुतूहल जागृत झाले. तो धनश्रेष्ठाबरोबर प्रवास करून देवीच्या मंदिरात गेला. तेथे त्याला सर्व प्रेते दिसली. त्याला भिंतीवर लिहिलेलेही सर्व दिसले. राजाला त्या सर्वांची दया आली. तो देवीच्या मूर्तीसमोर उभा राहिला. धनश्रेष्ठ त्याकडे पाहातच राहिला! राजा देवीला म्हणाला, "देवी, जगदंबे! तुझी माया अपरिमेय आहे. या लोकांना जर माझ्या बलिदानाने पुनः जिवंत होऊन सुखाने जगता येत असेल तर मी आनंदाने माझे मस्तक तुझ्या चरणी अर्पण करतो."

आणि खरोखरच राजाने खड्ग उपसले. तो आपल्या मानेवर वार करणार एवढ्यात त्याचा हात वरच्यावर पकडून देवीने त्याला थांबविले.

मंदिर प्रकाशाने न्हाऊन निघाले. धनश्रेष्ठालाही राजाबरोबर देवीचे दर्शन घडले! सत्संग व सत्कर्म यांचे फल होते ते. देवी राजाला म्हणाली.

३

"विक्रमा! तू धन्य आहेस. इतरांच्या सुखासाठी तू प्राणार्पण करायला तयार झालास! तुझे हे पुण्यकृत्य या सर्वांना पुनश्च जिवंत करण्यास पुरेसे आहे. या लोकांचे प्राण गेले ते धनलोभामुळे, वैरभावामुळे! तुझ्या इच्छेने तू त्यांना सन्मार्गाला लावशील."

विक्रमाच्या मस्तकावर आपला आशीर्वादाचा हात ठेवून देवी अंतर्धान पावली. विक्रमाला थोडा वेळ कशाचेही भान नव्हते. जरा वेळाने विक्रमाने भानावर येऊन आसपास पाहिले.

सभामंडपात अनेक स्त्रीपुरुष देवीचा व विक्रमाचा जयजयकार करीत होते. धनश्रेष्ठ जवळच हात जोडून उभा होता. सर्व मृत लोक जिवंत झाले होते.

विक्रमादित्याने त्या मंदिराची पुनर्रचना केली. त्या सर्व लोकांना शुद्ध भक्तिमार्गाला लावले. योग्य माणसाला देवीचा पुजारी नेमले. देवालयाची उत्तम व्यवस्था ठेवली. धनश्रेष्ठाला त्यापुढे विक्रमाचा घनिष्ठ मित्र म्हणून मोठा मान मिळाला.

जयसेना म्हणाली, "राजा, असे साहस व त्याग तुझ्या अंगी आहे का?" राजा म्हणाला, "नाही! माझ्या अंगी एवढे गुण नाहीत."

जयसेना पुन्हा मूर्तिरूप झाली. राजा परत गेला. राजधर्म किती कठीण असतो याचा त्याला जास्त जास्त बोध होत होता.

कथा नववी

तलावास पाणी यावे म्हणून विक्रमाचे साहस!

जयसेनेने सांगितलेली गोष्ट ऐकून भोजराजा त्या दिवशी विचारमग्न झाला. दुसऱ्या दिवशी तो सिंहासनाजवळ गेला. सिंहासनाच्या दुसऱ्या बाजूच्या एका मूर्तीला त्याने स्पर्श केला.

ती मूर्ती सजीव झाली आणि राजाला म्हणाली, "राजा, विक्रमाच्या अंगी विलक्षण धैर्य व त्याग हे गुण होते. तुझ्या अंगी तसे गुण असतील तर तू या सिंहासनाची अभिलाषा धर-नाहीतर तुझे भस्म होऊन जाईल. माझे नाव 'मदनसेना' आहे. मी तुला एक गोष्ट सांगते ती ऐक –

राजाजवळ अतिशय धूर्त व निष्ठावंत हेरांची फार आवश्यकता असते. विक्रमाचे हेर राज्यात सर्वत्र हिंडून बातम्या काढीत असत –

गावः पश्यन्ति गन्धेन वेदैः पश्यन्ति वाडवाः ।
चारैः पश्यन्ति राजानश्चक्षुर्भ्यामितरे जनाः ॥

असा एक श्लोकच या संबंधात आहे.

- पशूंना वासाने कळते, ब्राह्मणांना वेदांतून ज्ञान मिळते, राजांना हेरांकडून कळते व इतर लोकांना डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहून कळते, असा त्याचा अर्थ आहे.

विक्रम राजाचा एक हेर काश्मीरात गेला होता. त्याने तिकडील एक विचित्र बातमी आणली होती.

"महाराज, काश्मीर देशात एक गाव आहे. त्याला निर्जलपूर असेच नाव पडले आहे, कारण तिथे एक मोठा तलाव असूनही त्या गावात पाण्याची फारच टंचाई आहे. एका सावकाराने तलाव बांधला, कालवे काढून शेतीसाठी पाण्याची सोय केली, गावाला पिण्याचे पाणीही मिळू लागले. हरिदास हे त्या सावकाराचे नाव. शेते चांगली पिकू लागली. सावकाराने आपली कित्येक शेते विप्रांना दान दिली होती. सारे सुखी होते, पण त्या तलावात एक दुष्ट देवता येऊन राहिली. तिने तळ्याचे पाणी आटवून टाकले, ती सावकाराच्या स्वप्नात आली आणि म्हणाली, "तू तळे बांधलेस, सर्वांना पाणी दिलेस, पण बळी दिला नाहीस म्हणून मला राग आला आहे. मीच तळ्याचे पाणी आटविले आहे." सावकार म्हणाला, "देवी, काय केले की तुझा राग जाईल?" देवी म्हणाली, "बत्तीस लक्षणी पुरुषाचा जर मला तू बळी दिलास तर माझे समाधान होईल. मग तलाव पुन्हा पाण्याने भरुन जाईल."

सावकार जागा झाला. त्याला स्वप्न आठवले. त्याने एक युक्ती केली. त्याने एक सोन्याचा मनुष्याकृती पुतळा घडवून घेतला आणि तळ्यात उभा केला. त्याच्या भोवती मजबूत पिंजरा तयार केला. देवीचा दृष्टान्त त्याने लोकांना सांगितला आणि घोषणा केली, "जो बत्तीस लक्षणी वीर स्वतःचे देवीसाठी बलिदान करील त्याच्या नातेवाइकांना हा सोन्याचा पुतळा बक्षीस देण्यात येईल."

विक्रमाने ही सर्व बातमी ऐकली आणि तो हेराला म्हणाला, "आपण त्या निर्जलपूर गावी जाऊ या." हेराबरोबर विक्रम त्या गावी जाऊन साध्या वेषात एका गरीब विप्राच्या घरी उतरला आणि देवीच्या शापाची माहिती खरी आहे हे जाणून घेतले. राजा त्या

ब्राह्मणाला म्हणाला, "ज्या सावकाराने पुतळा देऊ केला आहे त्याच्याकडे तू जा. पुतळ्याशिवाय तो आणखी काहीतरी बक्षीस देईल असे मला वाटते. तो काय काय देणार आहे ते सर्व लिहून घे. मी राजा विक्रम आहे, पण हे तू कोणाला सांगू नकोस."

राजाच्या सांगण्याप्रमाणे ब्राह्मण हरिदास सावकाराकडे गेला आणि सावकाराला म्हणाला, "शेठ! बळी जाणाऱ्या माणसाच्या नातलगांना आपण तळ्यातील सोन्याचा पुतळा देणार आहात, त्याशिवाय आणखी काही बक्षीस आहे का?"

सावकार म्हणाला, "होय, मी आणखी पन्नास सहस्त्र रजत-मुद्रा देणार आहे." ब्राह्मण म्हणाला, "मला आपण तसे लिहून द्याल का?"



सावकाराने ब्राह्मणाजवळ स्वतःची सही करून तसे पत्र लिहून दिले. ते घेऊन तो ब्राह्मण घरी आला आणि विक्रम राजाजवळ त्याने ते पत्र दिले. तेव्हा विक्रमाने आणखी एक पत्र लिहून त्याला जोडले. त्या पत्रात विक्रमाने लिहिले होते, "मी अवंतीचा राजा विक्रम, स्वतःच्या इच्छेने तळ्यातील देवीला आत्मार्पण करीत आहे. निर्जलपूर येथे मी हे पत्र धारण करणाऱ्या ब्राह्मणाकडे नातलग म्हणून राहिलो असून माझ्या बलिदानाने मिळणारा सोन्याचा पुतळा व मुद्रा या ब्राह्मणाला मिळाव्यात."

ब्राह्मणाच्या हातात त्याने दोन्ही पत्रे दिली आणि तो एकटाच तळ्यावर गेला. अदृश्य देवीला वंदन करून तो म्हणाला, "हे देवी! अवंतीचा राजा विक्रम, या तळ्याला पाणी येऊन लोकांचे कल्याण व्हावे म्हणून आज तुझ्या चरणी आपले शिरकमल वाहात आहे. माझ्या या बलिदानाने तू प्रसन्न हो व लोकांवर कृपा कर."

विक्रमाने खड्ग उपसले आणि तळ्याच्या काठावर उभा राहून आपला शिरच्छेद करण्यास तो तयार झाला; तोच तळ्यातून देवता प्रगट झाली आणि विक्रमाला अडवून म्हणाली, "थांब, आत्मघात करू नकोस. तू बळी जायला तयार झालास यांतच सर्वकाही आले. तुझी काय इच्छा आहे बोल." राजा पुन्हा वंदन करून म्हणाला, "सावकाराने लोकांवर उपकार करण्यासाठी तलाव बांधला. आता तळ्याला पहिल्यासारखे पाणी येऊ दे आणि या गावातील लोकांवर तुझी कृपादृष्टी असू दे." "तथास्तु" म्हणून देवी अंतर्धान पावली. तळ्याच्या कोरड्या मध्य भागातून भराभर पाणी भरू लागले ते विक्रम उभा होता त्या काठापर्यंत आले. कालव्यातून पाणी सगळीकडे जाऊ लागले. पाणी आले म्हणून लोक तळ्याकडे धावू लागले!

विक्रम लगेच ब्राह्मणाकडे गेला व त्याला घेऊन त्याने सावकाराला गाठले. त्याने सावकाराला सर्व वृत्तान्त सांगितला आणि म्हटले, "हरिदास! आपण लिहून दिल्याप्रमाणे व माझ्या इच्छेप्रमाणे या ब्राह्मणाला तू बक्षीस दे." सावकाराला ते पटले. तो माणसे घेऊन तळ्याकडे निघाला. बंदोबस्ताने पिंजऱ्यात ठेवलेला तो सोन्याचा पुतळा त्याने काढविला. अनेक लोकांनी तो पुतळा उचलून ब्राह्मणाच्या घरी आणून दिला. शिवाय पन्नास सहस्त्र रजत मुद्रा सावकाराने ब्राह्मणास दिल्या.

विक्रमाचे काम झाले होते. तो अवंतीला परत आला.

मदनसेना राजाला म्हणाली, "राजा भोज! असा त्याग आणि असे धैर्य तुझ्या ठिकाणी आहे का?" राजा निरुत्तर झाला. मदनसेना पुन्हा जडमूर्ती झाली आणि राजा महालात परत गेला.

कथा दहावी

कमलाकर आणि नरमोहिनी

दहावी मूर्ती काय सांगते ते ऐकण्यासाठी राजा दुसऱ्या दिवशी सिंहासनाजवळ आला. त्याने स्पर्श करताच दहावी मूर्ती सजीव झाली व म्हणाली, "माझे नाव मदनमंजिरी आहे. राजा भोज, तुला विक्रमाच्या कथा ऐकायच्या आहेत ना? दुसऱ्याच्या हिताची काळजी करणारा विक्रम किती पराक्रमी होता ते आता मी तुला सांगते."

विक्रमादित्याच्या आश्रयास अनेक पंडित, पुरोहित व उपाध्याय राहात होते. त्यांत एक शंकर शर्मा नावाचा उपाध्याय होता. त्याला कमलाकर नावाचा एक पुत्र होता, पण त्याचे विद्याभ्यास करण्यात लक्ष नव्हते. शंकर शर्मा त्याला अनेक प्रकारे उपदेश करी, पण मुलगा मुळीच ऐकत नसे. होता होता कमलाकराचे शिकण्याचे वय उलटून गेले. तो तरुण झाला. त्याला कोणीही मान देत नसत. त्याच्या बरोबरीच्या ब्राह्मण मुलांना राजसभेत मान मिळे. भरपूर दक्षिणा मिळे. शंकर शर्मा त्याला कळकळीने सांगे –

विद्यावित्तविहीनेन किं कुलीनेन देहिना ।
अकुलीनोऽपि यो विद्वान् दैवतैरपि पूज्यते ॥

अर्थः– विद्या आणि पैसा नसलेला मनुष्य कितीही कुलीन असला तरी त्याचा काय उपयोग? उलट विद्वान् मनुष्य जरी साध्या कुळातील असला तरी त्याला मान मिळतो.

मुलाला हे पटू लागले होते. पण आता स्वदेशात राहून शिकण्यापेक्षा दुसऱ्या देशात शिकलेले बरे असा त्याने विचार केला. वडिलांची आज्ञा घेऊन तो काश्मीरला गेला.

तेथे विश्वंभरभट्ट नावाचा एक मोठा पंडित होता. कमलाकर त्याच्याकडे राहिला आणि त्याने त्याची बारा वर्षे सेवा केली. त्याच्या कृपेने कमलाकराला सर्व विद्या येऊ लागल्या. यासंबंधी एक श्लोक आहे तो असा –

> गुरूशुश्रूषया विद्या विपुलेन धनेन वा ।
> अथवा विद्यया विद्या चतुर्थी नोपलभ्यते ॥

अर्थ :– गुरूची सेवा केल्याने, विद्या मिळवण्यासाठी पुष्कळ दक्षिणा दिल्याने किंवा एक विद्या आपण दुसऱ्याला शिकवून त्याच्या बदल्यात आपण एखादी विद्या शिकल्याने मनुष्य विद्या प्राप्त करू शकतो. दुसऱ्या कोणत्याही प्रकारे विद्या मिळत नाही.

विश्वंभर पंडिताकडून विद्या प्राप्त करून कमलाकर अवंती नगरास परत येत होता. वाटेत तो कांतिपूर या शहरात राहिला. योगायोगाने तेथील एका कलाभिज्ञ गणिकेची व त्याची गाठ पडली. नाइलाजाने तिला तो धंदा करावा लागत होता. या गणिकेवर एक संकट कायम असे. तिच्याकडे जाणाऱ्या माणसांना एक राक्षस मारून टाकीत असे.

कमलाकर आणि ही गणिका यांचे एकमेकांशी एकदम पटले. त्या गणिकेचे नाव 'नरमोहिनी' असे होते. कमलाकराला जेव्हा कळले की, राक्षस तिथे जाणाऱ्या माणसांना ठार मारतो तेव्हा तो दु:खी झाला. तो पुढे अवंती नगरास आला. त्याने आपल्या वडिलांना भेटून आपण कोणकोणत्या विद्या शिकलो ते सांगितले. शंकर शर्मा म्हणाला, "तू राजाला भेट. त्याप्रमाणे तो विक्रमाच्या दरबारात गेला. राजाने त्याचे सर्व वृत्त ऐकून घेतले.

त्या वृत्तांतात 'नरमोहिनी' गणिकेचे वर्णनही कमलाकराने केले. राजाने कमलाकराची मुद्रा व सांगण्याची पद्धती यांवरून ओळखले की, 'नरमोहिनी' च्या मोहात हा गुंतला आहे. राजाने कमलाकराला योग्य ते बक्षीस देऊन निरोप दिला.

नंतर राजा कांतिपुरास गेला. 'नरमोहिनी' च्या महालात जाऊन त्याने राक्षसाला आव्हान केले. राक्षस तत्काळ प्रगटला. राजाला वेताळ वश होताच. वेताळाच्या साहाय्याने विक्रमाने त्या राक्षसाशी युद्ध केले व त्याला ठार मारले.

नरमोहिनीला राजा म्हणाला, "तुझ्यावरील संकट मी दूर केले आहे. मी अवंतीचा राजा विक्रम आहे. तू कमलाकर नावाच्या तरुण पंडिताला ओळखतेस ना? त्याच्या बाबतीत माझे एक काम तू कर, तुला त्याबद्दल भरपूर बक्षीस देईन."

नरमोहिनी म्हणाली, "महाराज, त्या तरुणावर माझेही मन जडले आहे. तरीही मी आपल्या आज्ञेप्रमाणे वागेन."

विक्रम म्हणाला, "तो विद्वान पंडित तुझ्या मोहात पडून आपल्या जीवनाची वाताहत करील. तुझ्याबद्दल त्याला तिटकारा वाटेल असे रूप तू धारण कर."

नरमोहिनीला राजाने सर्व अलंकार काढून, मळकी वस्त्रे नेसून व केस मोकळे सोडून, अस्ताव्यस्त, गबाळ राहायला सांगितले. मग त्याने कमलाकराला नरमोहिनीकडे नेले. तिचे ओंगळ रूप पाहून त्याला तिच्याबद्दल घृणा उत्पन्न झाली. मग विक्रमाने त्याला स्त्रिया व धन यांपासून दूर राहावे असा उपदेश केला. तो श्लोक असा –

विधिना भ्रामितं चक्रं कान्तासु कनकेषु च ।
तासु तेष्वप्यनासक्तः साक्षाद्भर्गो नराकृतिः ॥

अर्थः– विधात्याने स्त्रियांच्या व सुवर्णाच्या ठिकाणी भ्रांतीचे दोन मोठे भोवरे निर्माण केलेले आहेत. जो त्या स्त्रियांत व सुवर्णात आसक्त होत नाही तो नररूपधारी शिवच म्हणावा.

नरमोहिनीने राजाचे कार्य केले म्हणून राजाने तिला योग्य बक्षीस दिले आणि तो कमलाकराला घेऊन अवंतीस परत आला. कमलाकराचे मन आता स्थिर झाले होते. तो पुढे मोठा पंडित झाला.

परी म्हणाली, "भोजराजा, तुझ्या ठिकाणी अशी दुसऱ्याच्या हिताची काळजी आहे का?"

राजा म्हणाला, "मी किती स्वार्थी आहे ते मला दिवसेंदिवस जास्त जास्त कळत आहे. मी परत जातो."

मदनमंजिरी परीही पुन्हा मूर्तिरूप झाली.

कथा अकरावी

विक्रम अमृतफळ रोग्याला देऊन टाकतो

अकराव्या दिवशी 'शृंगारकलिका' नावाची परी मूर्तीतून भोजराजाच्या स्पर्शाने जिवंत झाली आणि म्हणाली, "राजा, तू विक्रमासारखा दयाळू असशील तर सिंहासनावर बसण्याचा विचार कर."

राजा म्हणाला, "तो विचार मी करीत नाही, पण विक्रमादित्य किती दयाळू होता ते मला ऐकावेसे वाटते."

परी म्हणाली, "ती एक कथाच आहे. मी सांगते, ऐक –

नर्मदेच्या तीरावर एक महायोगी योगसाधना करीत होता. विक्रमाच्या हेरांनी त्याची राजाजवळ प्रशंसा केली. असा योगी जर अवंतीस येईल तर आपण धन्य होऊ, आपल्या नागरिकांचेही भाग्य उजळेल, असा विचार करून विक्रमाने एका श्रेष्ठ दूताबरोबर विनंतीपत्र व पालखी पाठवून त्या महायोग्याला अवंतीस येण्याचे निमंत्रण दिले; पण उत्तरादाखल त्या योगीपुरुषाने निरोप पाठविला– "विक्रमादित्या! तुझे धर्माचरण व सद्‌गुण मला विदित आहेत. माझा तुला आशीर्वाद आहे, पण मला ऐहिक गोष्टींची वासना नाही; नगरांत राहाण्याचीही आमची रीत नाही. मी अवंतीस येऊ शकत नाही. मला कसलीही आशा नाही."

आशाया ये दासास्ते दासाः सर्वलोकस्य ।
आशा येषां दासी तेषां दासायते विश्वम् ॥

अर्थः– अर्थात् जे आशेचे दास असतात ते सर्व लोकांचे दास बनतात, पण आशा ज्यांची दासी असते त्यांचे सारे विश्वच दास होते. आणि –

लोभमूलानि पापानि व्याधयो रसमूलकाः ।
स्नेहमूलानि दुःखानि त्रयं त्यक्त्वा सुखी भवेत् ॥

अर्थः– लोभ हेच सर्व पापांचे मूळ असते, दुखणी येण्याचे मूळ अति-रसिकतेने खाण्यात असते व आसक्ती हे सर्व दुःखांचे मूळ कारण आहे म्हणून लोभ, रस व आसक्ती या तिन्हींचा त्याग करून सुखी व्हावे.

योगी पुरुषाने पाठविलेला निरोप दूताने आणला. तो कळताच राजाने ओळखले की, या विभूतीकडे स्वतःलाच जावे लागेल. त्याने आपल्या राज्याची व्यवस्था प्रधानावर सोपविली आणि स्वतः तो त्या योग्याच्या आश्रमात गेला. तेथे त्याने त्या योग्याची अनेक दिवस शुश्रूषा केली. त्याच्या सेवेने प्रसन्न होऊन त्या योग्याने एक दिवस एक अमृतफळ राजाला दिले व सांगितले, "राजा, हे फळ भक्षण करणाऱ्यास कोणतीही व्याधी होणार नाही. आता तू अवंतीस जाऊन राज्यकारभार कर."

ते फळ घेऊन राजा परत येण्यास निघाला. वाटते त्याला एक कुष्ठरोगी दिसला. त्याची दुर्दशा पाहून राजाला त्याची दया आली. त्याने ते दिव्य फळ, रोग नष्ट व्हावा म्हणून त्या रोग्याला खायला घातले! त्यामुळे तो माणूस रोगमुक्त झाला! त्याने उठून राजाच्या पायांवर लोटांगण घातले. राजाने त्याला "नर्मदाकांठच्या महान् योग्याच्या कृपेने तू बरा झाला आहेस, मी काहीच केले नाही." असे सांगितले. नंतर तो अवंतीस परत आला.

परी म्हणाली, "विक्रम राजा एवढा दयाळू होता. तू इतका दयाळू आहेस का?"

असे म्हणून परी राजाच्या देखत पुन्हा जडमूर्ती झाली. भोजराजा नवल करीत महालात परत गेला.

कथा बारावी
विक्रमाने राक्षसाचे वर्तन सुधारले

भोजराजा आपल्या पट्टराणीला रोज या विक्रमाच्या कथा सांगत असे. अकराव्या **दिवशी** जेव्हा तो सिंहासनाजवळ आला आणि एका मूर्तीला त्याने स्पर्श केला तेव्हा 'नरमोहिनी' नावाची परी प्रगट झाली आणि विक्रमाच्या परोपकारी वृत्तीचे वर्णन करून राजाला म्हणाली, "जो राजा विक्रमासारखा परोपकारी असेल त्यानेच या दिव्य सिंहासनाचा लोभ मनात धरावा."

राजा भोज म्हणाला, "मला विक्रमाच्या परोपकराची कथा ऐकावीशी वाटते. तुझे नावही कळायला हवे आहे."

परी म्हणाली, "मी कथाच सांगते. त्यावरून तुला माझे म्हणणे पटेल. माझे नाव 'नरमोहिनी' आहे."

विक्रम राजा राजधानीत सहा महिने राहात असे आणि सहा महिने प्रवास करून राज्यातील सर्व लोकांच्या स्थितीचे निरीक्षण करीत असे; विक्रम राजा नेहमी मानवी जीवनातील काही महत्त्वाची तत्त्वे लक्षात ठेवीत असे.

मातासमं नास्ति शरीरपोषणम् । भार्यासमं नास्ति शरीरतोषणम् ।
विद्यासमं नास्ति शरीरभूषणम् । चिंतासमं नास्ति शरीरशोषणम् ॥ १॥
अर्थातुराणां न पिता न बन्धुः । कामातुराणां न भयं न लज्जा ।
क्षुधातुराणां न बलं न तेज – श्चिंतातुराणां न सुखं न निद्रा ॥ २॥

अर्थ :– आईसारखे शरीराचे पोषण कोणीही करीत नाही, भार्येसारखे सुख कोणीही देत नाही, विद्येसारखे भूषण काहीही नाही आणि चिंतेसारखे शरीराला शोषून टाकणारे काहीही नाही. १. पैशासाठी जे वेडे असतात त्यांना बाप, भाऊ वगैरे नाती महत्त्वाची वाटत नाहीत, कामवासनेने वेडे झालेल्यांना कोणाचेही भय व लाज वाटत नाही, भुकेने त्रास झालेल्यांच्या अंगी तेज व बळ नसते आणि चिंताग्रस्त लोकांना सुख लागत नाही व झोपही लागत नाही. २.

अर्थात् चिंता दूर झाली तर प्रजानन सुखी होतील. माणसाला चिंता असते आईवडिलांची, पत्नीची, विद्येची, धनाची, इच्छापूर्तीची आणि अन्न मिळण्याची. या गोष्टी व्यवस्थित असतील तर माणसांना चिंता लागणार नाही. राजाचा विचार असा की, प्रजाननांचे या बाबतीत जे न्यून असेल ते पूर्ण करावे.

एकदा तो एका शंकराच्या मंदिरात दर्शनासाठी जात होता. ते एक ज्योतिर्लिङ्ग होते. मार्गातच रात्र झाली तेव्हा विक्रम एका वृक्षाखाली विश्रांतीसाठी थांबला. त्या वृक्षावर अनेक पक्षी येऊन बसले. ते आपसात बोलू लागले. त्यांची भाषा विक्रमाला कळत होती!

एक पक्षी दुसऱ्या पक्ष्याला सांगत होता, "मी सेवल देशात गेलो होतो. तिथे उमरबेट नावाच्या एका नगरात मी असे पाहिले की, एक राक्षस तेथील लोकांना मारून खातो. मी तिथे काही दिवस राहिलो तेव्हा एक घटना घडली. पुष्कळसे धीट लोक त्या राक्षसाकडे गेले आणि त्याला म्हणाले, "आम्ही तुझ्याकडे रोज एक माणूस पाठवतो तू त्याला खा, पण एका दिवशी जास्त माणसे मारू नकोस. नाहीतर सारी माणसे संपून जातील आणि तू उपाशी मरशील." राक्षसाला ते पटले. त्यानंतर मी पाहिले की, नागरिकांनी रोज एक-एक माणूस राक्षसाकडे पाठविण्यास सुरुवात केली. ज्या घरचा माणूस राक्षसाकडे जायचा असेल त्या घरात त्या दिवशी शोकाने सर्व हवालदिल होतात. मी आताच तेथून उडत येथे आलो. त्या नगरात एक वृद्ध फकीर राहातो तो अनेक पक्ष्यांना धान्य खायला

देतो. त्याचे पक्ष्यांवर फार प्रेम आहे आणि राक्षसाला बळी जायची पाळी उद्या त्याच्यावर आहे. तो जर बळी जाईल तर आपला उपकारकर्ता नष्ट होईल. मला फार वाईट वाटते पण आपण राक्षसाविरुद्ध काय करणार?"

विक्रम ऐकत होता. त्याला चैन पडेना. तो भररात्री आपला मूळ मार्ग सोडून उमरबेट नगरात गेला. तोपर्यंत सकाळी झाली. त्याने त्या फकीराचे घर शोधून काढले. राजाने वेषांतर केलेले होते. तो फकीराला म्हणाला, "मी एक कोणतेही सत्कार्य न केलेला साधा माणूस आहे. राक्षसाकडे जायची आज तुझी पाळी आहे ना? मी असे ऐकले आहे की, तू पक्ष्यांवर प्रेम करतोस. तू जर मरण पावलास तर पक्षीवर्ग फार दुःखी होईल."

फकीर म्हणाला, "थांब! पुढचे काही बोलू नकोस. हे सारे तुला कसे कळले? तू इथला माणूस दिसत नाहीस. तू सत्कार्य करीत नाहीस हे खोटे आहे. तू पुण्यवान् माणसांसारखा दिसतोस." – असे म्हणून फकीराने क्षणभर ध्यान केले. त्याने ओळखले की, हा अवंतीचा राजा विक्रम आहे. तसे प्रगट न करता तो म्हणाला, "हं, बोल."

राजा म्हणाला, "तुझ्या ऐवजी मी आज राक्षसाकडे बळी म्हणून जाऊ का?" प्रश्न विचारता विचारता राजा फकीराच्या झोपडीच्या बाहेर जाऊ लागला.

फकीर म्हणाला, "नको, मी तुला जाऊ देणार नाही." तो असे म्हणत आहे तोच राजा दूर गेला आणि धूम पळत सुटला. फकीर वृद्ध असल्यामुळे राजाला गाठू शकला नाही. राजा धावत धावत राक्षस ज्या अरण्यात राहात होता तिकडे गेला. तोपर्यंत सूर्य चांगलाच वर आला होता. राजा थेट अरण्यात शिरला तोच राक्षसाने त्याला गाठले.

विक्रम राक्षसाच्या अगदी जवळ जाताच राक्षसाने त्याला जेव्हा पाहिले तेव्हा त्याच्या मनातील हिंसा करण्याची इच्छाच नष्ट झाली. राक्षसाने विचारले, "तू कोण आहेस? आज माझ्याकडे फकीर येणार होता; तू कसा आलास?"

राजा म्हणाला, "तुला एक माणूस बळी मिळाला की झाले. इतर चौकशा तुला कशाला?"

राक्षस म्हणाला, "तुला पाहाताच माझे मन एकदम बदलले. तुला मारावेसे वाटत नाही. तू दुसऱ्यासाठी आपले प्राण का देतोस? तुझे धैर्य काही आगळेच आहे. तुला मी काय हवे ते देतो."

विक्रम खदखदा हसला. "अरे तू मला काय देणार? देणारच असलास तर असे वाचन दे की, यापुढे तू माणसांना मारणार नाहीस."

राक्षसाने ते कबूल केले. तोपर्यंत फकीर मागोमाग आला होता. राक्षस अरण्यात परत निघून जात आहे हे त्याने पाहिले. त्याला आनंद झाला. राजा आणि तो नगराकडे परत यायला निघाले तेव्हा फकीर म्हणाला, "महाराज, आपण देवासारखे आलात. माझ्यावरील व गावावरील संकट दूर केलेत."

राजा म्हणाला, "मला तू ओळखलेस?"

फकीर म्हणाला, " अवंतीचे विक्रमादित्य आपणच. आपली कीर्ती सर्व देशात पसरली आहे."

फकीराने राजाला नगरात नेले आणि सर्व वृत्तान्त लोकांना सांगितला. नगरातील लोकांनी व तेथील राजाने विक्रमादित्याचा मोठा मान केला. राजा अवंतीनगरीस परत आला आणि पुन्हा ज्योतिर्लिंगांच्या यात्रेस निघाला.

नरमोहिनी परी भोजराजाला म्हणाली, "राजा तू एवढा परोपकारी असलास तर या सिंहासनावर बैस."

राजा काय बोलणार? ती परी पुन्हा जडमूर्तिरूप दिसू लागली. राजा आपल्या महालात परत गेला.

कथा तेरावी

विक्रमाने भुताटकी नाहीशी केली

तेराव्या दिवशी 'भोगनिधी' नावाच्या परीने भोज राजाला आणखी एक गोष्ट सांगितली. विक्रमाच्या साहसीपणाची व शौर्याची ती कथा होती. परी म्हणाली –

अवंती नगरीत भद्रसेन नावाचा एक सावकार होता. तो खूप श्रीमंत, धर्मशील व दानशूर होता. वृद्धापकाळाने तो मरण पावला तेव्हा त्याचा मुलगा पुरंदर याने सावकारी हातात घेतली. त्याचा देवाधर्माकडे ओढा फारच होता. त्याने आपल्या जरूरीपुरते द्रव्य जवळ ठेवून इतर संपत्ती दान करून टाकली आणि तो तीर्थयात्रा करू लागला. त्याला सर्व तृणवत् वाटत होते. यासंबंधीचा एक श्लोक ऐक –

उदारस्य तृणं वित्तं शूरस्य मरणं तृणम् ।
विरक्तस्य तृणं भार्या निस्पृहस्य तृणं जगत् ॥

अर्थ :– उदार मनुष्याला द्रव्याचे काहीच वाटत नाही. शूराला मरणाची भीती वाटत नाही. विरक्त माणसाला स्त्रीची आसक्ती वाटत नाही आणि निरिच्छ माणसाला साऱ्या जगाचीच किंमत वाटत नाही.

पुरंदर यात्रेसाठी हिंडत असता एकदा एका नगराच्या जवळच शिवमंदिरात उतरला. देवळाच्या पाठीमागेच अरण्य होते. त्या मंदिराचे नाव 'भद्रेश्वर मंदिर' असे होते. रात्री जवळच्या अरण्यातून एका बाईच्या आर्त किंकाळ्या ऐकू आल्या. त्याने लगेच उठून मंदिराजवळील काही घरांत चौकशी केली. तेव्हा लोक म्हणाले, "अहो, हा रोजचाच प्रकार आहे, पण रात्री रानात कोण जाणार? काही भुताटकी आहे खास. कारण एरव्ही रोज रात्री अशा किंकाळ्या कशा ऐकू येतील?" पुरंदराने विचारले, "एवढे धैर्य तुम्हाला कोणालाच नाही का?" लोक म्हणाले, "छे! छे! आम्हाला भुतांची फार भीती वाटते. आम्ही रानात जाणार नाही!"

यात्रा करून पुरंदर घरी आला. त्याने विक्रम राजाला भद्रेश्वर मंदिरातील आपला अनुभव सांगितला. तेव्हा विक्रम स्वतः त्या मंदिरात जाऊन राहिला. रात्री बाईच्या

रडण्याचा आवाज आला तेव्हा लगेच तो रानात शिरला. खूप आत शिरल्यावर त्याला असे दृश्य दिसले की, एका बाईला एक राक्षस मारीत आहे. ते पाहून विक्रम एकदम राक्षसावर धावून गेला आणि त्याने त्याला खड्गाने ठार मारले. मग त्याने त्या बाईची विचारपूस केली. तेव्हा ती म्हणाली, "हे वीर-पुरुषा, तू मजवर फार मोठे उपकार केलेस. हा राक्षस पूर्वजन्मी माझा पती होता. मी त्याचे ऐकत नसे म्हणून तेव्हाही मला तो शिक्षा करीत असे. तो लवकर मरण पावला आणि त्याला राक्षसयोनी प्राप्त झाली. पहिल्या रागावर तो अजूनही मला रात्री मारतो." असे म्हणून ती बाई पुढे म्हणाली, "येथून पुढे जवळच एक ओसाड घर आहे. पूर्वी तिथे वस्ती होती, पण आता तिथे वस्ती नाही. तू शूर आहेस. तू तेथे चल. तिथे माझी खूप संपत्ती आहे. ती मी तुला देते. तिचा विनियोग कर."

राजा त्या स्त्रीच्या मागोमाग गेला. ती एका जुन्या वास्तूत शिरली. तेथे रांजणातून व हंड्यातून पुष्कळ द्रव्य ठेवलेले होते. तिने राजाला ते नेण्यास सांगितले व म्हणाली, "तुझ्या या शूर कृत्यामुळे माझीही फार दीर्घकालीन दु:खातून सुटका झाली आहे!"

असे म्हणून राजाला प्रणाम करून ती स्त्री दिसेनाशी झाली. राजा पुन्हा मंदिरात आला. त्याने गावातील लोकांना बोलाविले आणि सांगितले, "आता भुताटकीचे भय राहिलेले नाही. माझ्याबरोबर काही धडधाकट तरुण द्या. मी या गावातील गरिबांना द्रव्यदान देणार आहे."

विक्रमराजाने ती संपत्ती दुबळ्या लोकांना वाटून टाकली.

'भोगनिधी' परी म्हणाली, "राजा, विक्रमासारखे शौर्य तुझ्या अंगी आहे का?" राजाने नकारार्थी मान हलविली व तो परत गेला. ती परी पुन्हा जडमूर्ती झाली.

कथा चौदावी

राक्षसाला पुण्य दान केले!

चौदावी मूर्ती चौदाव्या दिवशी भोजराजाने स्पर्श करताच सजीव झाली. ती राजाला म्हणाली, "विक्रमादित्यासारखा तू जर दानशूर असशील तरच या सिंहासनावर बसण्याचे धाडस कर. मी 'रतिप्रिया' नावाची परी आहे. तुला विक्रमाची कथा सांगते.

एकदा विक्रमादित्य तीर्थयात्रा करायला गेला होता. कृष्णा नदीच्या तीरावर काही श्रोते बसले होते. तिथे तो गेला. तिथे एका पुराणिकाने एक आख्यान लावले होते. त्यात परोपकाराची थोरवी सांगितली जात होती. लोक ऐकण्यात मग्न होते. पुराणिकाने एक श्लोक म्हटला –

परोपकाराय फलन्ति वृक्षाः । परोपकाराय वहन्ति नद्यः ॥
परोपकाराय दुहन्ति गावः । परोपकारार्थमिदं शरीरम् ॥

अर्थ :– वृक्ष फळे देतात, ती दुसऱ्यासाठी, नद्या वाहात जातात, त्या परोपकार करतात. गायी दूध देतात त्यातही परोपकार असतो आणि हे शरीरही परोपकारासाठीच उपयोगात आणायचे असते.

अशा प्रकारे त्या श्लोकाचा अर्थ पुराणिक सांगत होता.

विक्रमाला पुराणिकाचे सांगणे चांगले वाटले. एवढ्या अवधीत काय झाले, त्या नदीपलीकडून एक माणूस आपल्या पत्नीसह पात्रातून हळूहळू चालत येत होता. नदीला पाणी फारसे नव्हते. माहीतगार नदीतून येतजात होते, पण त्या माणसाचा पाय चुकून खोल पाण्यात गेला आणि तो बुडू लागला. त्याची पत्नीही बुडू लागली. लोक आरडाओरडा करू लागले, पण दुरूनच! त्यांना बाहेर काढायला कोणी पाण्यात उडी

मारीना. सभेतील लोक उठले. काठावर गर्दी करून ओरडू लागले, तेव्हा एकटा विक्रम लोकांना बाजूस सारून पुढे झाला. त्याने प्रवाहात उडी टाकली व त्या जोडप्याला बाहेर काढले. बाहेर आल्यावर तो माणूस विक्रमाला म्हणाला, "आपण मला व माझ्या पत्नीला वाचवलेत. मी तुमचा कसा बरे उतराई होऊ? मी निर्धन ब्राह्मण आहे. मी दोन वर्षे जे तप केलेले आहे त्याचे पुण्य मी तुमच्या हातावर सोडतो."

परोपकाराचे 'आख्यान' ऐकणारे सारेजण हे पाहात होते! त्या ब्राह्मणाने ओलेत्यानेच विक्रमाच्या हातावर तपाचे पुण्य म्हणून अर्घ्यजल सोडले.

विक्रम तेथून पुढे निघाला. वाटेत विक्रमाची एका अरण्यात एका राक्षसाशी गाठ पडली. विक्रमाला त्याने अडविले. त्याने विक्रमाकडे पाहाताच त्याला "महापुरुषा!" म्हणून हाक मारली. विक्रमाला तो म्हणाला, "या नीच योनीत राहाण्याचा मला कंटाळा आला आहे. तू मला यातून सोडवू शकशील. मजवर दया कर!"

विक्रम म्हणाला, "मी तुझा उद्धार कसा करू? मला तूच सांग."

राक्षस म्हणाला, "कोणीतरी मला पुण्यदान केले तर मला मुक्ती मिळेल."

विक्रमाला ब्राह्मणाने पुण्यदान केले होते. तेच पुण्य त्याने राक्षसाच्या हातावर सोडले. त्याबरोबर तो राक्षस अदृश्य झाला आणि त्याच्या जागी एक दिव्य देव उभा राहिला. विक्रमाला आश्चर्य वाटले, तोच त्या देवाला नेण्यासाठी आकाशातून दिव्य विमान खाली उतरले व तो त्या विमानात बसला. जाताना त्याने विक्रमाला म्हटले, "मी तुझ्यामुळेच शापातून व अशुभ योनीतून आज मुक्त झालो–तुझे जीवन असेच परोपकारात जावो!" विक्रम समाधानाने अवंती नगरास परत आला.

अशी गोष्ट सांगून ती रतिप्रिया नावाची परी राजाला म्हणाली, "राजा, इतक्या सहज आपले प्राण धोक्यात घालून तू दुसऱ्याला वाचवशील का? आणि आपल्याला मिळालेले पुण्य राक्षसासारख्या वाईट लोकांचा उद्धार करण्यासाठी सुद्धा तू तत्काळ देऊ शकतोस का?"

भोजराजा म्हणाला, "रतिप्रिये, मी आता ज्या गोष्टी ऐकत आहे त्यामुळे माझ्या जीवनात परिवर्तन घडून येत आहे. मला ह्या सिंहासनावर बसण्यापेक्षा आत्मज्ञान व सद्‌गुणवर्धन यांचीच जास्त आवड निर्माण झाली आहे."

ती परी जडरूप झाली आणि भोजराजा आपल्या महालात परत गेला.

कथा पंधरावी

जो राज्य देईल तोच रक्षण करील!

पंधराव्या दिवशी भोजराजा पुन्हा सिंहासनाजवळ गेला. पंधराव्या मूर्तीला त्याने हात लावला. तेव्हा ती मूर्ती सजीव झाली आणि राजाला म्हणाली, "भोज राजा! तुझी जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी मी तुला विक्रम राजाची आणखी एक कथा सांगते –

विक्रम राजा जरी पराक्रमी होता तरी परमेश्वरावर त्याची फार मोठी श्रद्धा होती. विक्रम राजा एकदा औंढ्या नागनाथ मंदिरात एका साधू योग्याच्या दर्शनासाठी गेला होता. साधूने त्याला ओळखून विचारले, "राजा, आपले राज्य सोडून तू इकडे कशाला आलास?"

राजा म्हणाला, "मी आपल्या दर्शनाला आलो आहे."

साधू म्हणाला, "तू इकडे असताना तुझ्या राज्यावर शत्रूंनी हल्ला केला तर काय होईल? रक्षण कोण करील?"

राजा म्हणाला, "मी कशाला चिंता करू? ज्याने मला राज्य चालवायला दिले, त्या ईश्वराचीच खरी सत्ता आहे. तो राखील किंवा नाश करील. सर्वशक्तिमान असा तोच आहे."

साधू म्हणाला, "तरी आपण स्वपराक्रम केलाच पाहिजे. सगळी श्रद्धा देवावर ठेवणे उपयोगाचे नाही."

राजा म्हणाला, "साधुमहाराज, ईश्वराला सर्वांची काळजी असते. यासंबंधी मी एक कथा आपल्याला सांगतो –

जयखंड नावाचे एक नगर होते. तेथे 'जयशंकर' नावाचा राजा राज्य करीत होता. तो स्वभावाने फार सज्जन होता, दिलदार होता; पण त्याचे नातलग कपटी होते. त्यांनी कपटाने राज्य आपल्या ताब्यात घेतले व राजाराणीला घालवून दिले.

निष्कांचन झालेला राजा व त्याची पत्नी भटकू लागले. अनेक नगरे व गावे फिरत फिरत भीक मागू लागले. होता होता भद्रावती नगराजवळ ते जोडपे एका वटवृक्षाखाली विश्रांती घेऊ लागले. रात्री ते तिथेच झोपले असता त्या वृक्षावर वसती करून असणारे

पाच यक्ष आपसात चर्चा करू लागले. एक म्हणाला, "हा या वृक्षाखाली निजलेला राजा जयशंकर जयखंड नगरातून येथपर्यंत आला आहे. तो पाहिलात का? त्याची पत्नीही त्याच्याबरोबर आहे. भद्रावतीचा राजा निधन पावला आहे. ते राज्य याला मिळाले तर याचे भाग्य उजळेल, पण ते कसे घडावे? उद्या नगरात हत्तीण सोंडेत माळ घेऊन फिरेल, तेव्हा तिला आपण प्रेरणा देऊ की, याच्याच गळ्यात ती माळ घालील."

दुसरा यक्ष म्हणाला, "हा सकाळी उठला की यालाही आपण नगरात प्रवेश करण्याची प्रेरणा देऊ."

सकाळ झाली. राजाराणी उठून आपली आन्हिके जवळच्याच नदीवर उरकून आता कोठे जावे असा विचार करू लागले. तोच 'आता भद्रावती नगरात जा' असे आपल्याला कोणीतरी सांगत आहे असा राजाला भास झाला.

तेच मनात धरून तो राणीसह नगरात शिरला. नवीन राजाची निवड करण्यासाठी सोंडेत माळ देऊन एक हत्तीण प्रधानाने नगरात चालविली होती. तिने या राजाच्या गळ्यातच माळ घातली! कारण हत्तिणीला यक्षांनी प्रेरणा दिली होती. राजाचे भव्य स्वागत करण्यात आले. त्याला भद्रावतीचे राज्य देण्यात आले. नंतर नागरिकांना कळले की, जयखंड नगराचा राजा जयशंकर व त्याची राणी, यांचीच भद्रावतीच्या राजपदावर निवड झाली आहे!

जयशंकर तिथे राज्य करीत असता शत्रूने नगराला वेढा घातला, पण राजा अगदी शांत होता. राणीने विचारले, " आपण एवढे शांत कसे?"

राजा म्हणाला, "पूर्वी जयखंडाचे राज्य गेले त्याला आपला उपाय नव्हता. हे राज्य मिळाले तेही दैवी कृपेनेच. जो राज्यावर बसवितो तोच रक्षण करील. मी कशाला काळजी करूं?" राणीला चिंता पडली.

तशीच पाचही यक्षांनाही चिंता पडली. 'आतां हा राजा देवावर श्रद्धा ठेवून बसला आहे. आपणच याला राज्यावर बसविले. आपणच आता त्याचे रक्षण केले पाहिजे.' असा विचार करून त्यांनी आपल्या मायाशक्तीने, वेढा दिलेल्या सैन्यावर आकाशातून बाणांची अक्षरश: बरसात केली! शत्रुसैन्य हा हा म्हणता पळून गेले.

इकडे राणीला हे वृत्त कळले. तिला वाटले, आपल्या रक्षणासाठी यक्ष, गंधर्व, देवता, यांचेच कोणाचे तरी हे उपकार आहेत. पण असे उपकार आपल्यावर हे लोक का करतात?

तिने मनोमन विचारलेला प्रश्न यक्षांना कळला. तेव्हा ते तिच्यासमोर प्रगट झाले. त्यातील एक यक्ष म्हणाला, "राणी, आम्ही बाणवर्षाव करून शत्रूला पळवून लावले व तुमचे राज्य व प्राण रक्षण केले. याला कारण जयखंडाने पूर्वजन्मी आमच्यावर उपकार केले होते, त्या जन्मी आम्ही शापामुळे मासे होऊन जलाशयात राहू लागलो. त्याचे पाणी आटून आम्ही मरणार होतो. त्यावेळी जयखंडाने आम्हाला मोठ्या जलाशयात नेऊन आमचे प्राण वाचविले. त्याच्या राज्याचे रक्षण करणे आमचे कर्तव्यच आहे म्हणून आम्ही शत्रूला पळवून लावले."

विक्रम म्हणाला, "साधू महाराज, देवावर माझीही अशीच श्रद्धा आहे. म्हणून मी राज्य मागे ठेवून येथे आलो आहे."

साधूने राजावर प्रसन्न होऊन स्वत:जवळ फार पूर्वीपासून असलेले अमूल्य व शुभप्रद चिंतामणी रत्न विक्रमाला दिले. राजा साधूला प्रणाम करून अवंतीस येण्यास निघाला. वाटेत एक ब्राह्मण त्याच्यासमोर येऊन म्हणू लागला, "महाराज! मी दरिद्री आहे. माझी उपासमार होत आहे. माझे दारिद्र्य आपणाशिवाय कोण दूर करणार?"

विक्रमाने आपल्याजवळचे ते रत्न त्या ब्राह्मणाला दिले व त्याला घेऊन तो नगरात आला. अवंती नगरात त्याची त्याने सोय केली आणि त्याची उपजीविका चालेल अशीही व्यवस्था केली.

परी राजाला म्हणाली, "राजा भोज, तुझी ईश्वरावर अशी श्रद्धा आहे का? आणि चिंतामणीही देऊन टाकण्याइतके औदार्य आहे का?"

राजा काहीही न बोलता परत गेला व ती परीही सिंहासनाला बसविलेली पंधरावी मूर्ती दिसू लागली!

कथा सोळावी

मित्रासाठी उकळत्या तेलात उडी!

राजा भोज सोळाव्या दिवशी सिंहासनाजवळ गेला आणि सोळाव्या मूर्तीला त्याने स्पर्श केला. ती मूर्ती अदृश्य झाली. राजासमोर एक दिव्यांगना प्रगट झाली. ती म्हणाली, "राजा, विक्रमाचे सामर्थ्य तुझ्या अंगी आहे का? तो फार समर्थ होता ;तसाच मित्रासाठी वाटेल ते कार्य करणारा होता. त्याची कथाच मी तुला सांगते. माझे नाव प्रेमावती आहे.

विक्रमाचा सुमती नावाचा एक मित्र होता. त्याच्यासाठी विक्रमाने केवढे साहस केले ते ऐक. हा सुमती काशीयात्रेला गेला होता. येताना तो एका नगरात वस्तीला होता. त्या नगरात एक मध्यवर्ती देवालय होते. तो तिथे गेला. तिथे पुष्कळ लोक जमले होते. मंदिरात एका मोठ्या चुल्यात जाळ करून त्यावर एका मोठ्या कढईत तेल उकळत होते.

त्याने चौकशी केली तेव्हा लोकांनी सांगितले, "पांथस्था! या नगराची राजकन्या मदनमंजिरी हिने स्वयंवर मांडले आहे. 'जो या उकळत्या तेलात उडी मारील व कोणतीही इजा न होता बाहेर येईल त्याला पती म्हणून वरमाला घालीन.' असा पण तिने लाविला आहे. तिच्या सौंदर्याला तुलनाच नाही. त्यामुळे अनेक राजपुत्रांनी व शूर तरुणांनी तेलात स्वतःला भाजून घेतले आहे व मरण पत्करले आहे."

लोक असे सांगत होते तोच राजकन्येचे वाजतगाजत तिथे आगमन झाले. सर्वजण तिच्याकडे पाहू लागले.

तिचे लावण्य पाहून सुमतीचे मन थाऱ्यावर राहिले नाही. तेलात उडी घेण्याचा वेडेपणाही त्याला करवेना. तिचे रूप मनात घोळवीत तो खिन्न मनाने अवंतीला परत आला. काही दिवसांतच तो विरहाने खंगला.

सुमती जेव्हा विक्रमाला भेटला तेव्हा त्याने विक्रमाला आपली यात्रा कशी झाली ते वर्णन करून सांगितले! पण तो शरीराने कृश झालेला पाहून विक्रमाने त्याला कारण विचारले, तेव्हा सुमतीने मंदिरातील प्रकाराचे वर्णन केले.

राजा म्हणाला, "तू तिच्यासाठी झुरत आहेस होय? काही काळजी करू नको. मित्रासाठी मी काहीही करायला तयार आहे. ती राजकन्या मी तुला प्राप्त करून देतो. चिंता करू नको. चल आपण त्या नगरीला जाऊ या."

ते दोघे त्या नगरात गेले. मंदिरात मदनमंजिरी आधीच आलेली होती. विक्रम व सुमती हे मंदिरात शिरले तेव्हा विक्रमाचे रूप पाहून राजकन्येला वाटले, ह्या पुरुषालाच वरमाला घालावी, मी उगाच एवढा कठीण पण लावला. ती स्वतःच विक्रमाजवळ आली आणि म्हणाली,

"हे पुरुष श्रेष्ठा! मनपसंत व धाडसी वीर पती म्हणून मिळावा म्हणून मी ही अवघड अट घातली होती. आपल्याला पाहून मी माझा पण मागे घेते. आपण माझा स्वीकार कराल का? तेलात भाजून आपण मरावे हे योग्य नाही."



विक्रम म्हणाला, "नाही! 'पण' मागे घेऊ नकोस. ते आपल्या दोघांनाही शोभणार नाही. दोघांचीही निंदा होईल. तुला काही काळजी वाटायला नको. मी पण जिंकतोच. माझे

एक म्हणण मात्र तू मान्य केले पाहिजेस. मी तेलातून जिवंत बाहेर आलो तर मी सांगेन ते तू मान्य केले पाहिजेस." मदनमंजिरीने ते म्हणणे मान्य केले.

राजाने गुप्तपणे वेताळाला आवाहन केले. वेताळाने कोणालाही नकळत मायाशक्तीने तेल थंड केले.

राजाने कढईत उडी मारली आणि तो लगेच बाहेर आला. सर्वत्र जयजयकार झाला.

मदनमंजिरी म्हणाली, "महाराज, आपला हा पराक्रम पाहून मला एक सुभाषित आठवते.

ये दीनेषु दयालवः स्पृशति यानल्पो ऽपि न श्रीमदो ।
व्यग्रा ये च परोपकारकरणे तुष्यंति ये याचिताः ॥
स्वस्थाः सन्ति च यौवनोन्मदमहाव्याधिप्रकोपे ऽपि ये ।
तैस्तंभैरिव सुस्थिरैः किल भराक्रान्ता धरा धार्यते ॥

अर्थ :– दीनांवर जे दया करतात, ज्यांना संपत्तीचा गर्व किंचितही स्पर्श करीत नाही, जे सतत दुसऱ्यांचे भले करण्यात गुंतलेले असतात, कोणी याचना केली तर ज्यांना आनंद होतो, तारुण्याचा उन्माद हीच एक व्याधी असते तिचीही बाधा होऊन ज्यांचे मन चंचल होत नाही असे लोकच सर्व भार सहन करणाऱ्या या पृथ्वीचे स्थिर असे आधारस्तंभ होत.

मदनमंजिरीने आपला स्वीकार करण्याची विनंती केली तेव्हा राजा म्हणाला, "तू वचन दिले आहेस त्याप्रमाणे आता माझे म्हणणे ऐक. माझ्याऐवजी हा माझा मित्र सुमती याला तू वरमाला घाल.

राजकन्या उदास झाली, पण उमद्या सुमतीकडे पाहून निराश झाली नाही. तिला आपले वचन पाळणे भाग पडले. ती एकुलती एक राजकन्या असल्यामुळे सुमती तिच्याशी विवाह करून तेथील राजा झाला. सुमतीला अशा प्रकारे इष्ट ते देऊन राजा अवंतीला परत आला.

अशी गोष्ट सांगून 'प्रेमावती' म्हणाली, "विक्रमासारखे तुझे मित्रप्रेम व साहस असेल तरच तू या सिंहासनावर बैस." भोजराजा काही न बोलता महालात निघून गेला आणि ती परी मूर्तिरूप झाली.

कथा सतरावी

विक्रमाचे भाग्य व औदार्य

दुसऱ्या दिवशी राजा सिंहासनाजवळ गेला आणि त्याने सतराव्या मूर्तीला हात लावताच तिथे 'सुलभा' नावाची देवकन्या प्रगट झाली व भोजराजाला म्हणाली, "विक्रमासारखा तू निर्लोभी व भाग्यवान आहेस का? त्याची एक गोष्ट ऐक –

विक्रमादित्य मृगया करण्यासाठी एकदा अरण्यात गेला होता. त्याला एक वाघ दिसला. त्याने त्याला काही बाण मारले. वाघ घायाळ झाला आणि तशाच अवस्थेत एका गुहेत शिरला. विक्रमही त्याच्या मागोमाग गुहेत खूप आत गेला तरी वाघाचा पत्ता लागला नाही. विक्रम तसाच पुढे जात राहिला, तो रस्ता खोल खोल जाऊ लागला. विक्रम धैर्याने तसाच पुढे गेला, तो पाताळात शिरला!

पुढे जातो तो त्याला बळीचा प्रासाद लागला. बळी राजाला विष्णूने वामन अवतारात पाताळात पाठविले होते आणि स्वतः तो द्वारपाल बनला होता. विक्रमाला तेथे विष्णूचे दर्शन घडले. विष्णूला त्याने नमस्कार केला. त्याने आशीर्वाद दिला मग तो बळी राजाला भेटण्यास गेला. बळीराजाने त्याचे स्वागत केले. राज्य कसे करावे यासंबंधी बळीने त्याला उपदेश केला. शेवटी बळी म्हणाला, "माझ्या राज्यातील तुला काय हवे आहे?"

विक्रम म्हणाला, "आपले दर्शन झाले.विष्णूचेही दर्शन झाले;हेच माझे भाग्य. आपण मला उपदेशही केला. आणखी मी काय मागू?"

तरी बळीने त्याला फारच आग्रह केला आणि म्हटले, "माझी आठवण म्हणून, मित्रप्रेम म्हणून मी तुला एक बहुमोल दिव्य मणी देतो. यासंबंधी एक श्लोक ऐक –

> ददाति पतिगृह्णाति गुह्यमारख्याति पृच्छति ॥
> भुंक्ते भोजयते चैव षड्विधं प्रीतिलक्षणाम् ॥

अर्थ:– मित्रप्रेमाची सहा लक्षणे आहेत. मित्र मित्राला आपल्याजवळची वस्तू देतो व त्याने दिली तर घेतो. आपली रहस्ये त्याला सांगतो. मित्राने सांगितलेली गुप्त गोष्ट ऐकून घेतो. त्याच्याकडे जेवायला जातो आणि त्याला जेवायला बोलावतो.

बळीने सर्पाच्या मस्तकावरील एक मणी विक्रमाला दिला. गेल्या वाटेने विक्रम पुन्हा अरण्यात आला. अवंतीच्या वाटेने तो येत असता एका विप्राने त्याच्याजवळ भिक्षा मागितली. विक्रमाने त्याला तो मणी दिला! विप्र संतुष्ट झाला व आशीर्वाद देऊन निघून गेला.

काही झालेच नाही अशा निर्विकार मनाने राजा अवंतीस परत आला.

'सुलभा' भोजराजाला म्हणाली, "राजा, सहजासहजी तुला विष्णूचे दर्शन घडेल का? तू इतका निर्लोभी आहेस का की, बळीने दिलेला दिव्य मणी दान देऊन टाकशील?"

राजा काहीच बोलला नाही. ती देवकन्या मूर्तिरूप झाली. राजा आपल्या महालाकडे परत आला.

कथा अठरावी

चंद्रसेन राजावर उपकार

अठराव्या दिवशी त्या रत्नजडित सिंहासनाची दीप्ती पाहात राजा उभाच राहिला. त्याचे निरीक्षण करू लागला. आदराने व प्रेमाने त्या सिंहासनावर हात फिरवू लागला. तेव्हा अठरावी दिव्यांगना प्रगट झाली व म्हणाली, "राजा विक्रमाच्या आत्यंतिक परोपकारी स्वभावाची एक कथा मी तुला सांगते. माझे नाव कुरंगनयना आहे –

विक्रमाची वाखाणणी अनेक विप्र करीत असत. चंद्रसेन नावाच्या राजाजवळ एक विप्र म्हणाला, "महाराज, आपण किती उदार आहात! आपले औदार्य पाहून मला विक्रमाची आठवण येते. त्याच्या उदारपणाची रीतच वेगळी आहे. त्याची कोणाशी तुलनाच करता येत नाही."

चंद्रसेनाला विक्रमाची स्तुती आवडली नाही. त्याच्या मनात मत्सर निर्माण झाला. विक्रमापेक्षा आपण जास्त उदार व्हावे असे त्याला वाटले. तो देवीच्या एका मंदिरात गेला आणि देवीला प्रार्थना करून म्हणाला, "हे महालक्ष्मी, मी भरपूर द्रव्य मिळवण्याच्या हेतूने तप करणार आहे. ते द्रव्य पुढे दान करण्याची माझी इच्छा आहे. तू मजवर प्रसन्न हो आणि माझी इच्छा पूर्ण कर." असे म्हणून चंद्रसेन मंदिरात येऊन जप-तप करू लागला. देवी काही काळाने प्रसन्न झाली आणि म्हणाली, "तू येथे होमकुंड पेटव व त्यात उडी मार. तुला पुन्हा मी जिवंत करीन व तुझ्या भारंभार सोने देईन."

राजाची देवीवर श्रद्धा होती. त्याने वारंवार अग्निदिव्य केले. प्रत्येकवेळी तो जिवंत होत होता व सोन्याचा ढीग शेजारी पडत होता. अशा तऱ्हेने त्याने अगणित संपत्ती जमविली व दान करून टाकली.

लोकांकडून हे वृत्त विक्रमाला कळले. चंद्रसेनाला आपला हेवा वाटतो आणि तो उगाचच स्वतःला वारंवार जाळून घेतो हे ऐकून विक्रमाला त्याची दया आली. आपण देवीला प्रसन्न करून घ्यावे व चंद्रसेनाला अक्षयलक्ष्मी द्यावी असे त्याच्या मनात आले. तो देवीच्या मंदिरात गेला व होमकुंड पेटवून देवीला वंदन करून म्हणाला, "हे देवी,

माझ्याशी स्पर्धा करून चंद्रसेन व्यर्थ कष्ट करीत आहे. मी माझे प्राण अग्नीत अर्पण करतो. चंद्रसेनाला तू अक्षयलक्ष्मी दे आणि त्याचे समाधान कर."

तो होमकुंडात उडी मारणार तोच देवीने त्याला थांबविले आणि म्हटले, "विक्रमा तुझा मत्सर करणाऱ्यासाठीही तू आपले प्राण द्यायला निघालास, धन्य आहे तुझी त्यागबुद्धी! तुझ्याएवढा परोपकारी दुसरा कुणीही नाही." देवीने चंद्रसेन राजाला अक्षयलक्ष्मी दिली.

चंद्रसेन अखंड दान करीत होता, पण ती संपत नव्हती. त्याला फार आनंद झाला. आता आपण विक्रमापेक्षा दानशूर आहोत असे त्याला वाटले;पण त्याला पुढे कळले की, विक्रमाने प्राणार्पण करण्याची तयारी करून आपल्यावर हे उपकार केले आहेत. तेव्हा त्याच्या मनातील मत्सर नष्ट झाला. तो विक्रमाला भेटायला आला व आपली चूक कबूल करून त्याला शरण गेला.

कुरंगनयना परी भोजराजाला म्हणाली, "विक्रमाइतका तू परोपकारी आहेस का?" राजा म्हणाला, "शत्रूवरही प्रेम करण्याची विशाल बुद्धी मजजवळ नाही." राजा परत महालात गेला आणि ती परी मूर्तिरूप झाली.

कथा एकोणिसावी

सूर्याने कुंडले दिली

एकोणिसाव्या दिवशी 'चंद्रज्योति' नावाची परी, भोजराजाने सिंहासनाला स्पर्श करताच प्रगटली आणि म्हणाली, "राजा भोज, विक्रमादित्य अत्यंत दुष्कर कामही न डगमगता करीत असे. तुला आहे का तेवढे साहस, तेवढी चिकाटी?"

राजा म्हणाला, "तू मला त्याचे उदाहरण सांग म्हणजे मला फार आनंद होईल."

चंद्रज्योती म्हणाली, "विंध्य पर्वताच्या प्रदेशातून आलेल्या एका ब्राह्मणाने विक्रमाला, त्याने पाहिलेला एक मोठा चमत्कार वर्णन करून सांगितला."

ब्राह्मण म्हणाला, "विंध्य पर्वत-राजीमध्ये एक मोठे सरोवर आहे. पर्यटन करीत असता मी तिथे गेलो होतो. त्या सरोवरात एक रत्नजडित असा विलक्षण स्तंभ आहे. त्याचे वैशिष्ट्य असे की, सकाळपासून सूर्य जसजसा आकाशात डोक्यावर येतो तसतशी त्या स्तंभाची उंची वाढत जाते. त्या स्तंभावर एक सुंदर सिंहासन आहे. सूर्य माध्यान्हीं आला की, त्या सिंहासनावर बसून अमृतपान करतो. दुपारनंतर सूर्य पश्चिमेकडे कलला की, स्तंभाची उंचीही कमी होऊ लागते. सूर्यास्त झाला की, तो स्तंभ दिसेनासा होतो. त्या सरोवराच्या पाण्यात स्नान करण्यासाठी पुष्कळ लोक येत असतात, कारण त्यामुळे पापक्षालन होते अशी ख्याती आहे."

राजाने विचारले, "आपण स्वतः हे सारे पाहून सांगता की ऐकलेले?"

ब्राह्मण म्हणाला, "महाराज, मी स्वतः पाहिले आहे." त्यानंतर ब्राह्मणाने त्या सरोवराचे स्थान सांगितले. अनेक अद्‌भुत स्थानांचे वर्णन करून ब्राह्मण निघाला. विक्रमाने त्याला भरपूर दक्षिणा दिली व आशीर्वाद घेतला.

विक्रमाने प्रधानाला बोलावून काही दिवस राज्य सांभाळण्यास सांगितले व तो विंध्याद्रीमधील त्या सरोवराकडे सूर्याचे जवळून दर्शन घेण्यासाठी गेला. विक्रमाला वेताळ प्रसन्न असल्यामुळे त्याला प्रवास लवकर करता आला.

सरोवरात एक रत्नांकित स्तंभ होता. सकाळच्या वेळातच विक्रमाने सरोवरात उडी मारली. पोहत जाऊन त्या स्तंभावर चढून, त्याच्यावर असलेल्या सिंहासनाच्या बाजूस तो

गायत्री मंत्राचा जप करीत बसला. सूर्य आकाशात वरवर चढू लागला तसतसे विक्रमाला कडक ऊन सहन होईनासे झाले, पण विक्रम सूर्याचीच प्रार्थना करीत होता.

मध्यान्ह झाला. सूर्य आकाशात डोक्यावर आला आणि तेथून खाली उतरून स्तंभावरील सिंहासनावर बसून तो अमृत प्राशन करू लागला. इकडे उष्णतेने राजा बेशुद्ध झाला होता. सूर्य अमृत प्राशन करू लागला. त्याच्या संपर्काने विक्रम सावध झाला. त्याने सूर्याचे दर्शन होताच त्याची स्तुती करण्यास सुरुवात केली. तेव्हा सूर्याने त्याला वर देऊ केला.

विक्रम म्हणाला, "सूर्यनारायणा, आपले दर्शन झाले हेच वरदान. आणखी वरदान ते काय मागू? आपली मजवर कृपा असू द्यावी एवढेच."



सूर्य म्हणाला, "देवतांचे दर्शन विफल होत नसते, म्हणून तुला मी ही कुंडले देतो." कुंडले देऊन सूर्य म्हणाला, "या कुंडलामधून प्रतिदिनी तुला एक भार सोने मिळेल."

विक्रमाने ती कुंडले घेतली. सूर्य पश्चिमेकडे कलला. स्तंभाची उंची कमी होऊ लागली. विक्रम सरोवरात उतरला व अवंतीस परत जाऊ लागला. वाटेत एका नगरात तो एका ब्राह्मणाच्या घरी उतरला. विक्रमाने अगदी साध्या माणसाचा वेष केला होता. ब्राह्मणाच्या घरी तो एक पांथस्थ म्हणून राहिला होता. ब्राह्मण दरिद्री होता. त्याला मुले

पुष्कळ होती. विक्रमाला त्याची दया आली. त्याने ब्राह्मणाला ती कुंडले दिली व म्हटले, "या कुंडलातून आपल्याला रोज एक भार सुवर्ण मिळेल. त्यावर आपण चरितार्थ चालवू शकाल."

ब्राह्मण आनंदित झाला. सूर्याकडून ती कुंडले मिळाल्याचे विक्रमाने त्याला सांगितले. त्या दिवशी एक भार सुवर्ण प्रत्यक्ष मिळाले ते पाहून ब्राह्मण आनंदाने नाचू लागला. घरात आनंदीआनंद झाला. विक्रम तेथून अवंतीस परत आला.

'चंद्रज्योती' राजाला म्हणाली, "प्रत्यक्ष सूर्यदेवाला भेटण्याइतके दुष्कर कार्य तू करू शकशील का? आणि सूर्याकडून मिळालेली कुंडले तू अशी एखाद्या ब्राह्मणाला देशील का?"

भोजराजा खाली मान घालून आपल्या महालात परतला. ती परी मूर्तिरूप झाली.

कथा विसावी

माधव आणि कामकन्दला

विसाव्या दिवशी जेव्हा राजाने सिंहासनाला स्पर्श केला तेव्हा 'चंद्रकांती' नावाची देवकन्या प्रगट झाली आणि म्हणाली, "राजा, तू विक्रमासारखा साहसी आहेस का?"

भोज राजा विक्रमाच्या गोष्टी ऐकण्यास उत्सुक होता, तो म्हणाला, "मी साहसी आहे पण विक्रमाचे साहस ऐकल्यावरच मी काय ते उत्तर देईन."

देवकन्या म्हणाली, "मी गोष्ट सांगते ती ऐक –

विक्रमादित्याच्या काळात माधव नावाचा एक हुषार ब्राह्मण गायक होता. त्याचे सौंदर्य अलौकिक होते. ते सौंदर्यच त्याच्या उपजीविकेच्या आड येत होते. तो जिथे नोकरी मागायला जात असे तिथे राजे, मंत्री इत्यादी लोक त्याच्या सौंदर्याचा मत्सर करीत. आपल्या घरातील स्त्रिया त्याच्यावर भुलतील असे भय वाटून ते त्याला परत पाठवीत. सर्वत्र निराश होऊन तो कामसेन नावाच्या राजाच्या दरबारात गेला. त्यावेळी तिथे नृत्य चालले होते. दरबारातील लोक नृत्य व गायन ऐकण्यात तल्लीन झाले होते. कामकंदला नावाची नर्तिका गात होती आणि नृत्य करीत होती. मृदंग वाजत होता. लोक डोलत होते,

पण माधव मध्येच म्हणाला, "नर्तिका अत्यंत निपुण आहे, पण श्रोत्यांना काही कळत नाही. त्यांना तालासुरांचे ज्ञान नाही."

हे त्याचे बोलणे राजाच्या कानावर गेले. परदेशी माणसाने असा शेरा मारावा ह्याचे राजाला नवल वाटले. "नृत्य थांबवा" अशी आज्ञा राजाने केली. माधवला विचारले, "कोणाचे काय चुकले ते सांगा."

माधव म्हणाला, "मृदंग वाजविणाऱ्या माणसाला अंगठा नाही त्यामुळे मृदंगाचा आवाज बरोबर येत नाही."

मृदंग-वादकाला राजाने जवळ बोलाविले. पाहातो तो खरोखरच त्याच्या एका हाताला अंगठा नव्हता. राजाने पुष्कळ धन देऊन माधवाचा मोठा सन्मान केला व त्याला आपल्या जवळ बसविले. त्याच्यासमोर त्याने कामकंदलेला पुन्हा आपली नृत्यकला दाखविण्यास सांगितले. कामकंदलेचे उत्तम नृत्य पाहून माधव एवढा खूष झाला की, राजाने दिलेले धन त्याने तिलाच देऊन टाकले. ही गोष्ट राजाला आवडली नाही. त्याने माधवाला रागाच्या भरात नगराबाहेर घालविले. माधवाला पाहाताच कामकंदला त्याच्यावर व त्याच्या गुणांवर भाळली व तो पुन्हा भेटावा असे तिला वाटू लागले.

इकडे माधव मनाशी म्हणाला,

माता यदि विषं दद्याद्विक्रीणाति पिता सुतम् ।
राजा हरति सर्वस्वं तत्र का परिदेवना ॥

अर्थः– पालनपोषण करणाऱ्या आईने जर स्वतः मुलाला विष दिले तर किंवा बापाने मुलाला विकले आणि राजाने आपले सर्वस्व काढून घेतले तर शोक काय करणार?

अशा तऱ्हेचे विचार करीत तो निराशेने बसला असता एक-दोन माणसे त्याला नगरात नेण्यासाठी आली. त्यातील एक म्हणाला, "आपण जिचे नृत्य पाहिले व गायन ऐकले तिने आपल्याला बोलाविले आहे. आपण कृपा करून चलावे."

माधव उठला व त्यांच्याबरोबर कामकंदलेच्या घरी गेला. गाण्याचा खरा रसिक भेटल्यामुळे तिला फार आनंद झाला होता. ती म्हणाली, "आपल्यावर राजाचा रोष झाला आहे, पण आपण एक रात्र आनंदात घालवू या." तिने माधवाला अनेक गाणी म्हणून दाखविली. त्यानेही केवळ तिच्यासाठी काही अवघड राग म्हणून दाखविले त्यामुळे तिचा अभिमानही गळून गेला.

त्या दोघांचे एकमेकांवर मन बसले. सकाळी माधव जायला निघाला तेव्हा ती त्याच्याबरोबर, 'अरसिकांचे' नगर सोडून जायला निघाली. माधव म्हणाला, "अजून माझा कुठेही जम बसलेला नाही. तू मजबरोबर येऊ नकोस. मी शक्यतो लवकर परत येऊन तुला घेऊन जाईन."

नाइलाजाने कामकंदला घरी राहिली. माधव लगबगीने नगर सोडून निघाला खरा पण त्याला तिच्या फार आठवणी येत होत्या. त्याला वारंवार विरहामुळे दुःखाचा उमाळा येत होता.

असाच प्रवास करीत असता तो अवंती नगरात आला. तिथे एका मंदिरात जाऊन बसला असता त्याला आपले अश्रू आवरेनात. तो रडू लागला. तिचे नाव घेऊन आठवणी काढू लागला.

त्यावेळी राजा विक्रम देवाच्या दर्शनासाठी तेथे आला होता. हा अत्यंत देखणा ब्राह्मण का रडतो, असे राजाला कुतूहल वाटले. त्याने माधवाची विचारपूस केली. एका वेश्येसाठी हा रडत आहे हे पाहाताच राजा म्हणाला, "अरे वेड्या, ह्या गणिकांचे प्रेम माणसांवर नसून त्यांच्या पैशांवर असते. तू असा फसू नकोस. तिचा नाद सोडून दे."

माधव म्हणाला, "इतर वेश्यांच्या बाबतीत आपण म्हणता ते खरे असेल पण कामकंदलेचे मजवर खरे प्रेम आहे आणि माझेही तिच्यावर प्रेम आहे. तिच्याशिवाय मला जगणे अशक्य आहे."

विक्रमाला जरा विचार पडला. माधवाचे लक्ष दुसरीकडे लागले तर कदाचित् हा सावरेल असे वाटून माधवाला त्याने प्रासादात नेले आणि नृत्य आणि गायन यात कसलेल्या अनेक सुंदर तरुण स्त्रियांचे त्याच्यासमोर कार्यक्रम ठरविले ;पण तो राजाला म्हणाला, "महाराज कशाला माझा अंत पाहाता ? मी जगावेसे वाटत असेल तर माझी व तिची भेट घालून द्या."

आता मात्र राजाला माधवासाठी काहीतरी करावेसे वाटू लागले. त्याने कामसेनाच्या राज्याला आपल्या सैन्याचा वेढा घातला आणि कामसेनाला निरोप पाठविला, "बऱ्याबोलाने कामकंदलेला आमच्या स्वाधीन करा नाहीतर दोन दिवसांत युद्धाला तयार व्हा."

विक्रमासारखा राजा एवढ्या साध्या कारणासाठी वेढा घालतो हे पाहून कामसेन घाबरला होता तरी क्षत्रिय धर्मानुसार त्याने नकारात्मक जबाब पाठविला.

इकडे, आपण ज्या स्त्रीसाठी एवढा खटाटोप करीत आहोत तिचे मन कसे आहे त पाहावे म्हणून राजाने एका वैद्याचा वेष करून गुप्तपणे नगरात प्रवेश केला आणि गुप्तपणे चौकशी करून कामकंदलेचे घर शोधून काढले. "कामकंदलेची भेट हवी आहे" असे त्याने दासींना सांगितले. तिची भेट मिळाली. राजाने आपला परिचय एक वैद्य म्हणून करून दिलाच होता.

कामकंदला अगदी वाळून गेली होती. तिला पाहून राजाने खडा टाकून पाहिला, "आपल्याला जी व्यथा आहे ती प्रियकराच्या विरहाची आहे होय, ना ?" कामकंदलेला बोलल्याशिवाय राहावेना. तिने आपली मनःस्थिती त्याच्याजवळ उघड केली.

"वैद्यराज, माधव नावाच्या एका गायक तरुणावर माझे प्रेम बसले. लवकर येण्याचा वायदा करून तो गेला आहे. मी त्याची वाट पाहात आहे. त्याच्याशिवाय मला चैन पडत नाही."

राजा म्हणाला," अरेरे! काय दैवदुर्विलास हा! तोच माधव परवाच आपली आठवण काढीत काढीत माझ्यादेखत मरण पावला!आता आम्ही काय करू शकतो!" राजाचे बोलणे ऐकताच ती गणिका बेशुद्ध पडली. राजा चरकला. हिच्या भावनांशी आपण व्यर्थ

खेळलो असे त्याला वाटले. तोच त्या गणिकेने प्राण सोडले. दासदासी हाहाकार करू लागल्या. 'ती मूर्च्छित पडली आहे, मी औषध घेऊन येतो' असे सांगून वैद्य तेथून लगेच पसार झाला. वेढा घातलेल्या सैन्यात जाऊन तो माधवाला भेटला. "माधवा, सारे श्रम व्यर्थ गेले. मी नगरात जाऊन पाहिले तो, कामकंदला मरण पावल्याचे मला कळले!"

माधवाला हा आघात सहन झाला नाही. तो तत्काळ तडफडून मरण पावला! राजा हबकला. आपल्या हातून हे मोठे पाप घडले असे त्याला वाटू लागले. आपण देहान्त प्रायश्चित्त घेतल्याशिवाय याचे निराकरण होणार नाही असे त्याला वाटू लागले.

त्याने चिता पेटविली व अग्नीत उडी घालण्याची तयारी केली, तेवढ्यात वेताळ तेथे प्रगट झाला व त्याने राजाला थांबविले. तो म्हणाला, "राजा, कामकंदला व माधव यांना जिवंत करण्यासाठी मी एक औषध देतो ते तू दोघांच्या मुखात घाल." वेताळाने दिलेले औषध राजाने माधवाच्या तोंडात घातले. तो जिवंत झाला. लगेच राजा गुप्तपणे नगरात गेला आणि त्याने कामकंदलेलाही जिवंत केले.

नंतर त्याने कामसेनावर युद्धात विजय मिळविला. त्याला पदच्युत केले आणि त्याचे राज्य माधवाला दिले.

"एका दु:खी तरुणासाठी विक्रमाने जसे कार्य केले तसे हे भोजराजा तू करशील का?" असे चंद्रकांती परीने भोजराजाला विचारले.

राजा म्हणाला, "एवढे साहस माझ्या हातून होणार नाही. विक्रमाचे एक-एक गुण आठवून मला त्याच्याबद्दल नितांत आदर वाटू लागला आहे. मी परत जातो." चंद्रकांती अदृश्य झाली आणि तिचे पुन्हा मूर्तीत रूपांतर झाले.

कथा एकविसावी

सत्यशोधनासाठी बारा वर्षांचा प्रयोग

भोज राजाने एकविसाव्या दिवशी सिंहासनाला पुन्हा स्पर्श केला तेव्हा 'सौभाग्य-मंजिरी' नावाची परी प्रगट होऊन त्याला म्हणाली, "राजा, विक्रमासारखा सत्यासत्याचा निर्णय तुला करता येत असेल तरच तू सिंहासनावर बसण्याची मनीषा धर."

राजाने विचारले, "राजा विक्रमादित्याचे न्यायचातुर्य कसे होते ते मला सांग."

सौभाग्यमंजिरी परी म्हणाली, "भोजराजा, ऐक –

एकदा विक्रम व प्रधान बोलत बसले असता, त्याने प्रधानाला विचारले, "प्रधानजी, माणसाला बुद्धी पूर्वकर्माने मिळते की, त्याच्यावर होणाऱ्या आई-वडिलांच्या व गुरूच्या संस्कारांमुळे?"

प्रधान म्हणाला, "बुद्धी ही जन्मतःच असते. शिकविण्याने येत नाही. कितीतरी मूर्ख लोक जगात आहेत, त्यांना शिकवूनही ते तसेच राहातात. विद्वत्ता शिकून येत नसते."

विक्रमाने विचारले, "मग आईवडील व गुरू मुलांना शिक्षण देण्यासाठी का धडपडत असतात?"

प्रधान म्हणाला, "बुद्धी उपजत असली तरी व्यवहारात जरूरी असणारे ज्ञान व माहिती शिक्षणामुळे मिळू शकते; अनुभवातून व शिक्षणातून मिळणारे ज्ञान वेगळे व मूळ स्वभाव आणि सद्‌बुद्धी, कुबुद्धी, वगैरे उपजत असतात त्या वेगळ्या. पूर्वकर्माप्रमाणे स्वभाव आणि दैव बनते. उद्योगाद्वारा माणसाला शिक्षण मिळत असते.

> उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ।
> दैवं प्रधानमिति कापुरुषा वदन्ति ॥
> दैवं विहाय कुरु पौरुषमात्मशक्त्या ।
> यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः ॥

अर्थः– प्रयत्न करणाऱ्या वीर पुरुषाला लक्ष्मी मिळते. दैव हेच लक्ष्मी मिळण्याचे मुख्य कारण आहे असे दुबळे लोकच म्हणतात. दैव बाजूस ठेव, स्वतःच्या शक्तीप्रमाणे प्रयत्नाने, पराक्रम करीत राहा, प्रयत्न करूनही जर यश न मिळाले तर त्यात आपला काय दोष?

राजा म्हणाला, "आपण प्रत्यक्ष प्रयोग करू या. अरण्यात एक मोठा प्रासाद बांधू या. त्यात माझा मुलगा, तुमचा मुलगा, कोतवालाचा मुलगा व एका ब्राह्मणाचा मुलगा, असे चार मुलगे, अगदी लहान वयाचे ठेवू या. त्यांचा इतरांशी संपर्क येणार नाही अशी व्यवस्था करू या." प्रधान तयार झाला. कोतवाल व एक ब्राह्मणही तयार झाला.

सर्वांचे मुलगे एकदोन वर्षांचेच होते.

अरण्यात प्रासाद बांधून तेथे मुक्या दासदासींच्या सान्निध्यात चारी मुलांना ठेवण्यात आले. मनुष्याचा शब्द त्यांच्या कानावर येणारच नाही असा बंदोबस्त ठेवण्यात आला

होता; पण तीन चार वर्षांनी कोणालाही न कळता एक दिव्य पुरुष तिथे आला आणि मुलांना भाषा शिकवून अदृश्य झाला.

बारा वर्षांनी चारी मुलांना राजाकडे नेले. राजाने चौघांना "तू सुखी आहेस ना?" असा एकच प्रश्न विचारला. त्या प्रश्नाला प्रत्येकाचे उत्तर मात्र वेगवेगळे आले.

राजपुत्र म्हणाला, "आपल्या पुण्याईने सुखी आहे."

प्रधानपुत्र म्हणाला, "आपल्या कृपेने खुशाल आहे."

कोतवालपुत्र म्हणाला, "महाराज, गुन्हेगारांना शिक्षा झाली पाहिजे; ती कशी होते याची मला चिंता वाटत आहे."

ब्राह्मणपुत्र म्हणाला, "महाराज, आपले भले होवो. सुखी फक्त देवच. प्रत्येक माणसाला कसले तरी दु:ख, चिंता, ही असतेच."

राजा म्हणाला, "मुलांनो, तुम्हाला भाषा बोलण्याचे शिक्षण कोणी दिले?"

मुलगे म्हणाले, "एका दिव्य पुरुषाने शिक्षण दिले. 'दैव' असे त्याने आपले नाव सांगितले."

राजा प्रधानाला म्हणाला, "प्रत्येक मुलाने उत्तर वेगवेगळे दिले आणि त्यांतही विशेष गुण आहेत. माझा मुलगा माझी पुण्याई आठवतो, तुमचा मुलगा माझी कृपा आठवतो, कोतवालाचा मुलगा गुन्हेगारांचा विचार करतो व विप्रपुत्र देवाची आठवण काढतो.

प्रधानजी, ह्या मुलांचे मूळ स्वभाव वेगळे आहेत व पूर्वकर्मरूपी दैवाने ते उपजतच ठरले आहेत."

परी म्हणाली, "राजा भोज, विक्रमाने सत्य शोधण्यासाठी केवढी व्यवस्था केली! तू असे कष्ट घेशील का?"

भोजराजा निरुत्तर झाला. परी मूर्तिरूप झाली व तोही आपल्या महालात निघून गेला.

कथा बाविसावी

रक्ताचे फूल कसे होते?

बाविसाव्या दिवशी सिंहासनाला स्पर्श करताच राजाला 'लावण्यवती' नावाची दिव्य स्त्री, मूर्तीच्या ठिकाणी दिसू लागली व म्हणाली, "राजा, तू विक्रमाइतका पुण्यवंत आहेस का? असलास तरच या सिंहासनावर बस."

भोज म्हणाला, "विक्रम कसा पुण्यवंत होता ते तू मला सांग." ती गोष्ट सांगू लागली–

शंखचूडाचे कपट हाणून पाडून विक्रमाने आपला जीव वाचविला व त्याचाच वध केला ही कथा तू पूर्वी ऐकलीस. त्या शंखचूडाचा प्रधान पदच्युत झाला होता. त्याला आशा होती की नव्या कारभारात आपल्याला कोणते तरी मानाचे स्थान मिळेल.

एकदा काय झाले, तो नदीत स्नान करीत होता तेव्हा त्याला प्रवाहातून वाहात येत असलेले एक विचित्र फूल दिसले. ते त्याने घेतले. त्याच्या मनात विचार आला, 'जर हे स्वर्गीय पुष्प आपण विक्रमाला नेऊन दिले तर तो प्रसन्न होऊन आपल्याला एखादी मानाची, सत्तेची जागा देईल. कारण हे पुष्प जगात केवळ अद्वितीय आहे. याचा सुगंध अलौकिक आहे.'

त्याने विक्रमाला ते दिव्य फूल दिले तेव्हा विक्रमाला पूर्वजन्मीची आठवण झाली आणि त्याने त्या प्रधानाला म्हटले, "मी जर तुजवर प्रसन्न व्हावे असे तुला वाटत असेल तर हे फूल ज्या वृक्षाचे आहे तो वृक्ष तू मला आणून दे. नाहीतर तुझे घरदारही घेईन व तुला हद्दपार करीन."

करायला गेलो एक आणि झाले भलतेच असे त्या शंखचूडाच्या प्रधानाला वाटू लागले. "वृक्षाचा शोध घेण्यासाठी गेलो नाही तर आपला नाश होईल आणि जावे म्हटले तर किती दूर? त्यातही संकट आले तर प्राण जाणार!पण प्रयत्न तरी करू या." असा विचार करून तो एकदोन नावाड्यांसह नौकेने नदीच्या उगमाकडे जाऊ लागला. वर जावे तो तो दोन्ही काठांना भयानक अरण्य लागले. वाघसिंहांच्या डरकाळ्या ऐकू येऊ लागल्या. प्रधानाला भय वाटू लागले. तोच त्याला प्रवाहाबरोबर आणखी एक तशाच प्रकारचे फूल वाहात येताना दिसले. "हां!आता काहीतरी आशा आहे!" असे मनाशी म्हणत तो आणखी पुढे गेला. पुष्कळ पुढे गेल्यावर पाण्याच्या वेगामुळे त्याला नौका काठाकडे घ्यावी लागली.

तिथे त्याला आगळेच दृश्य दिसले. एका वृक्षावर एक मांसाचा गोळा लटकत होता. त्यातून रक्ताचे थेंब मधून मधून पाण्यात पडत होते आणि लगेच त्यांचे फूल बनत होते. त्याच वृक्षाच्या आणखी वरच्या फांदीवर आणखी एक मांसपिंड होता. त्यातून मात्र रक्त पडत नव्हते.

प्रधानाने परत येऊन विक्रमाला हा सारा वृत्तान्त सांगितला. विक्रम म्हणाला, "ज्या मांसपिंडातून रक्तबिंदू पडून फुले होतात ते माझे शरीर आहे आणि ज्या पिंडातून थेंब

पडत नाहीत ती इतरांच्या शरीरांची प्रतिमा आहे. पूर्वी मी तप केले व त्यांनीही तप केले, त्यामुळे आम्ही या जन्मी सत्ता भोगतो. तू जर उत्तम कर्म करशील तर तुलाही चांगले फळ मिळेल."

विक्रमाला तो वृक्ष नकोच होता. प्रधानाला फक्त त्याने हे शिकविले की तपस्वी लोकांच्या रक्ताचा बिंदूही दिव्यपुष्पासारखा पवित्र असतो.

राजाने त्याला आपला एक मंत्री नेमले व पुढे त्याला प्रधानही केले.

परी म्हणाली, "राजा भोज, विक्रमासारखी तुझी पूर्वपुण्याई आहे का?"

राजा मुकाट्याने आपल्या महालात गेला. 'लावण्यवती' हसत हसत गुप्त झाली आणि तिचे पुन्हा मूर्तीत रूपांतर झाले.

कथा तेविसावी

जादूचा लाकडी घोडा व अभागी स्त्रीची सुटका

तेविसाव्या दिवशी राजाने सिंहासनाला पुन्हा हात लावला तेव्हा एक मूर्ती सजीव झाली आणि भोज राजाला म्हणाली, "राजा, तू विक्रमासारखा दयाळू आहेस का?" त्याच्या दयाळूपणाची मी एक कथा सांगते –

राजा म्हणाला, "विक्रमाच्या गोष्टी एकापेक्षा एक अद्‌भुत आहेत. त्या किती ऐकल्या तरी माझे समाधान होत नाही. तुझे नाव काय?"

ती दिव्य स्त्री म्हणाली, "माझे नाव 'कर्णावती'. विक्रमाच्या दरबारात एका सुताराने एक लाकडी घोडा बनवून आणला आणि तो म्हणाला, "महाराज, हा एक विलक्षण घोडा आहे. जिवंत घोड्यासारखा हा पळतो. त्यावर बसायचे आणि विशिष्ट कळ दाबायची म्हणजे झाले." राजाच्या सांगण्यावरून त्याने पटांगणात घोडा पळवून दाखवला. राजाला तो घोडा आवडला.

सुतार म्हणाला, "ह्या घोड्यावर बसले असता इतर घोड्यांसारखी ह्याला टाच मारली तर हा घोडा बेफाम होईल. एवढी गोष्ट लक्षात ठेवावी."

राजाने त्याला एक लक्ष सुवर्ण मुद्रा दिल्या आणि घोडा आपल्या पागेत ठेवला. पागेदाराला त्याने त्या घोड्याची काळजी घेण्यास सांगितले.

काही दिवसांनी तो पागेत गेला. त्याला त्या घोड्याची आठवण झाली. आपल्या सरदारांना त्याने विचारले, "तुम्ही या लाकडी घोड्यावर बसून दाखवता का ?" कोणीही तयार होईना. सरदार म्हणाले, "घोड्यावर बसल्यावर टाच मारली की, घोडा बेफाम होतो. तो धोका कोण पत्करणार ?"

राजा म्हणाला, "तुम्ही घाबरता ? मग मीच परीक्षा पाहातो." असे म्हणून त्याने घोडा बाहेर काढला व तो घोडा चालवू लागला. भान न राहून त्याने घोड्याला टाच मारली. तेव्हा घोडा आकाशात उडून दूर दूर जाऊ लागला!

खूप दूर एका अरण्यात घोडा आपल्याआपण खाली उतरला. राजाला एक छोटेसे घर दिसले. घराजवळ दोन विहिरी होत्या. आसपास कुणीच नव्हते. राजाने खिडकीतून डोकावून घरात पाहिले. तेथे एका मंचकावर एक माकडीण बसली होती. तिला बांधून ठेवलेले होते.

आत न जाता विक्रम राजाने आपला घोडा दूर लपवून ठेवला आणि तो एका झाडावर लपून बसला. संध्याकाळ झाली तेव्हा तिथे एक यती आला. त्याने डावीकडील विहिरीतून पाणी काढले व त्या वानरीच्या अंगावर ते शिंपडताच तिचे एका तरुण सुंदर स्त्रीमध्ये रूपांतर झाले. यतीने घर बंद करून घेतले. विक्रम रात्रभर बाहेरच बसून राहिला.

सकाळी यती उठला त्याने दुसऱ्या विहिरीतील पाणी काढले आणि तो घरात गेला. त्या स्त्रीच्या अंगावर त्याने ते पाणी शिंपडले तेव्हा ती पुन्हा वानरी झाली. वानरीचे स्त्रीत रूपांतर झालेले विक्रमाने पाहिले होते. सकाळी यती निघून गेल्यानंतर विक्रम पुन्हा घरात शिरला. पुन्हा त्याला ती बांधून ठेवलेली वानरी दिसली. तेव्हा विहिरीतील पाण्याचा हा प्रभाव आहे हे त्याने ओळखले. त्याला पाहाताच वानरी आनंदाने उड्या मारू लागली. तिने केविलवाणा चेहरा केला. विक्रमाने युक्ती केली. तो बाहेर गेला. त्याने पहिल्या विहिरीचे पाणी काढले आणि वानरीच्या अंगावर शिंपडले. तेव्हा तिथे तरुणी प्रगट झाली. ती रडू लागली. ती म्हणाली, "मला सोडवा हो सोडवा ! या यतीपासून मला सोडवा ! हा माझे फार हाल करतो !" विक्रमाने तिला बंधमुक्त केले, तेव्हा ती विक्रमाच्या पाया पडून गयावया करू लागली.

विक्रमाने विचारले, "असे कसे झाले ?" ती म्हणाली, "लहानपणी मी आईवडिलांचे ऐकले नाही म्हणून त्यांनी मला शिक्षा केली. माझे वर्तन सुधारावे म्हणून मला यतीच्या स्वाधीन केले, पण त्याने माझी अशी स्थिती केली ! मी आता कुठे जाऊ ? आईवडील व इतर नातलग मला आता घरात घेणार नाहीत."

विक्रम म्हणाला, "तुझी काय इच्छा आहे ?"

ती म्हणाली, "मी आतां संसार करू शकणारच नाही. एकटी राहून मी देवाची भक्ती करीन."

तेव्हा विक्रमाने तिला लाकडी घोड्यावर बसविले व तो अवंती नगरीस आला. त्या स्त्रीला त्याने निवान्त जागी एक घर बांधून दिले. तिला आपली भगिनी मानले. ती पुढे देवभक्तीत आपले उरलेले आयुष्य घालवू लागली.

नंतर विक्रमाने वेताळाला बोलाविले. यती कोठे राहातो ते सांगून त्याला यतीकडे पाठविले. यतीच्या दुष्ट सिद्धी वेताळाने काढून घेतल्या. वेताळाच्या भीतीने यती सन्मार्गाला लागला.

राजा, तू जर एवढा दयाळू असशील तर सिंहासनावर बैस." असे ती 'कर्णावती' नावाची परी म्हणाली. राजा म्हणाला "छे ! एवढी दयाबुद्धी मला नाही. राजा महालात परत गेला आणि त्या परीची पुन्हा मूर्ती झाली.

कथा चोविसावी

प्रजेच्या नीतिमत्तेची चिंता

चोविसाव्या दिवशी राजाने सिंहासनाला हात लावताच 'हंसगमना' नावाची देवकन्या प्रगट होऊन भोजराजाला म्हणाली, "विक्रमादित्याची दक्षता अलौकिक होती.

राजा विक्रमादित्य एकदा अवंती नगरीत गुप्तपणे फिरत होता. एक विवाहित स्त्री एका सावकार-पुत्राला "आज मध्यरात्री आमच्या घराच्या मागच्या बाजूस ये." अशी खूण करीत आहे असे त्याला दिसले. राजा चमकला. ही स्त्री व्यभिचारी आहे हे त्याने ओळखले. यावर काहीतरी उपाय केला पाहिजे व हा अधर्म माझ्या राज्यात घडू नये असा त्याने निश्चय केला. विचार करूनही त्याला युक्ती सुचेना. शेवटी एक युक्ती सुचली त्याप्रमाणे तो पाळत ठेवून त्या स्त्रीच्या मागोमाग गेला व तिचे घर त्याने पाहून ठेवले.

मध्यरात्री तो गुप्तपणे सावकार-पुत्राप्रमाणे वेष करून व तोंड लपवून त्या स्त्रीच्या घराच्या पिछाडीस गेला. त्याने अंदाजाने त्या स्त्रीच्या खोलीच्या खिडकीवर दुरून अगदी बारीक खडे मारले. आपला प्रियकर आला आहे असे वाटून तिने खिडकी उघडली.

आपला दागिन्यांचा डबा घेऊन ती खिडकीतून खाली उतरली. तिला वाटले, 'सावकार-पुत्रच आला,'' कारण राजाचे कपडेच तसे होते.

ती स्त्री त्याला म्हणाली, ''आपण हे नगर सोडून दूर कुठेतरी जाऊ आणि खूप आनंद लुटू.'' राजा काही न बोलता पुढे निघाला. ती मागोमाग जाऊ लागली. रात्र अंधारी होती. राजा नदीपर्यंत आला आणि त्याने आपला चेहरा तिला दाखविला. ती गडबडली, गोंधळली आणि रडू लागली. राजा म्हणाला, ''बाई, तू केवढे वाईट कर्म करणार होतीस ! पतीला सोडून परपुरुषाबरोबर आपले सर्वस्व घेऊन तू पळून जात होतीस. अशा पापाचे ऐहिक व पारलौकिक फळ फार वाईट मिळते.''

राजाने तिची खूप कानउघडणी केली. तिला फार अनुताप झाला. ती क्षमा मागू लागली. राजाने तिला तिच्या घरी पोचविले. कोणालाही नकळत ती आपल्या घरात शिरली आणि पुढे सन्मार्गाने वागू लागली.

'हंसगमना' भोज राजाला म्हणाली, ''राजा भोज! प्रजेच्या नीतीची विक्रमादित्य एवढी काळजी घेत असे. तुला अशी काळजी घेता येईल का?''

भोजराजा काय ते समजला व महालात निघून गेला. ती देवकन्या जडमूर्ती झाली.

कथा पंचविसावी

तपाचे फल इतरांना जिवंत करण्यासाठी!

पंचविसाव्या दिवशी जेव्हा भोज राजा सिंहासनाजवळ गेला आणि त्याने चौथ्या बाजूच्या सुंदर मूर्तीला स्पर्श केला तेव्हा तिथे विशेष लावण्यवती अशी एक तेजस्वी स्त्री प्रगट झाली. ती राजाला म्हणाली, ''विक्रमाच्या कथा ऐकून तुझे मन अजून तृप्त झालेले दिसत नाही. विक्रमाची परमेश्वरावर फार मोठी श्रद्धा होती. त्याची गोष्ट मी सांगते ऐक.'' राजा म्हणाला, ''सांग, लवकर सांग, कारण माझीही देवावर श्रद्धा आहे आणि अशा गोष्टी ऐकण्यात मला विशेष रस आहे ! पण मला आधी तुझे नाव सांग. तुम्हा सर्वांची नावे इतकी सुंदर आहेत की ती ऐकूनही बरे वाटते.''

ती दिव्य स्त्री म्हणाली, ''माझे नाव 'रूपकांता' असे आहे. गोष्ट सांगते ती ऐक –

राजा विक्रम शिवभक्त होता. तो रोज शंकराची पूजा करीत असे. एकदा रंगमहालात बसून तो नृत्य पाहाण्यात मग्न झाला होता. त्यामुळे त्याला शिवपूजेचे भान राहिले नाही. वेळ टळून गेली. त्याला वाईट वाटले. तो स्वतःचा धिक्कार करू लागला. तो मनाशी म्हणाला, 'माझ्या रसिकतेमुळे माझ्या व्रताचा भंग झाला. मला योग्य स्मरण कसे राहिले नाही? आता मी पुन्हा कडक तपश्चर्या करतो. शंकराला प्रसन्न करून घेतो.'

त्याने राज्याची व्यवस्था लावली. मंत्र्यांना कामे वाटून दिली आणि तो नर्मदातीरावर एका अरण्यात गेला. तिथे त्याने तपस्व्यांचे अनेक आश्रम पाहिले. अनेक तपस्वी पाहिले. ते अनेक प्रकारे साधना करीत होते.

राजाने स्वतःसाठी एक पर्णकुटी बांधून घेतली. तिथे राहून रोज नर्मदा नदीत स्नान करावे आणि अखंड शिवनामाचा जप करावा असे व्रत त्याने सुरू केले. 'ॐ नमः शिवाय।' या मंत्राचा त्याने पाच कोटी जप केला. तीन वर्षे शिवध्यानात घालविली.

त्याच्या तपाने शिवशंकर प्रसन्न झाला. त्याने विक्रमाला वर मागण्यास सांगितले. विक्रमाला फार आनंद झाला. तो म्हणाला,

"कैलासनाथ ! माझ्या हातून एक दिवस आपली पूजा करणे राहून गेले. त्याची खंत मला लागून राहिली आहे. मला क्षमा करावी."

शिव म्हणाला, "तुला क्षमा केली आहे. आणखी काही माग."

राजा म्हणाला, "महादेवा, आपली उपासना करतांना ज्यांना येथे अपमृत्यू आले असतील त्यांना आपण अमृताने संजीवन देऊन त्यांचा उद्धार करावा आणि माझ्या उपासनेत खंड पडणार नाही असा वर द्यावा."

तिथे कित्येक तपस्व्यांनी शिव प्रसन्न होत नाही म्हणून निराशेने देह ठेवले होते. शंकराने अमृतदृष्टीने त्यांना जिवंत केले, दर्शन दिले व उत्तम साधनामार्ग सांगितला. विक्रमाने आपल्या तपाचे फळ शिवभक्तांसाठी दिले!

शंकराने विक्रमाला एक दिव्य कमळ दिले व म्हटले, "राजा, हे कमळ सहसा कोमेजणार नाही, पण जेव्हा तुझ्या आयुष्याचे फक्त सहा महिने राहातील तेव्हा हे कोमेजू लागेल. त्यावेळी तू माझ्या सन्निध येशील. तोपर्यंत सुखाने परोपकार करण्यासाठी राज्य कर."

शंकर अंतर्धान पावला. सर्व तपस्व्यांनी विक्रमाचा जयजयकार केला. विक्रम अवंतीस परत आला. तेव्हापासून त्याने शिवपूजेत कोणत्याही कारणाने खंड पडू दिला नाही.

रूपकांता भोजराजाला म्हणाली, "राजा, तुझी देवावर अशी श्रद्धा व परोपकारी वृत्ती आहे का? असेल तर या सिंहासनावर बैस."

राजा म्हणाला, "विक्रमादित्याशी माझी तुलनाच करता येत नाही–मी यःकश्चित् माणूस आहे."

परी पुन्हा मूर्तिरूप झाली आणि भोजराजा आपल्या महालात परत गेला.

कथा सव्विसावी

विक्रमाचे धर्मनीति-ज्ञान

'विक्रमाला शंकराने दर्शन दिले व राज्य करण्याचा उपदेश दिला. तो केवढा पुण्यवंत, श्रद्धावंत!' असा विचार करीत सव्विसाव्या दिवशीही भोजराजाने विक्रमाच्या सिंहासनाचे दर्शन केले व आदराने त्याला स्पर्श केला. तत्काळ सव्विसावी 'देवानंदा' नावाची परी प्रगट झाली.

राजा म्हणाला, "देवी, राजा विक्रमाच्या सद्‌गुणांची व पराक्रमाची आणखी एखादी कथा मला ऐकावीशी वाटते."

परी म्हणाली, "मी विक्रमादित्य किती ज्ञानवंतही होता तेच सांगणार आहे –

विक्रम व त्याचा प्रधान नेहमी राज्यकारभाराबद्दल बोलत असत. कार्यव्यवस्थेची चर्चा करीत असत. एक दिवस त्याला प्रधानाने विचारले, "महाराज, सुव्यवस्थित राज्य करण्याची तत्त्वे कोणती? सामान्य माणसाने उत्तम नीतीचे आचरण कोणते ठेवावे?

विक्रमाने प्रधानाला त्यावेळी अनेक नीतिधर्म सांगितले. राजा, त्यातील काही मी तुला सांगते – माता, पिता, गुरू व अतिथी हे देवरूपच मानून त्यांना वंदन करावे, त्यांची सेवा करावी. नुसते ज्ञान उपयोगाचे नाही, नुसते वैराग्य, नुसता योगाचार व्यर्थ आहे, ही तिन्ही हवीत व त्यांच्यासमवेत भक्तीही हवी.

अपराध नसताना राजाने कोणासही दंड देऊ नये. अपशब्द बोलू नये. भांडणे लावणारे, चोर, कपटी, तोंडावर गोड बोलणारे, व्यसनी, यांची संगत मुळीच धरू नये. आपण सत्य व हितकारक असेच भाषण करावे. सर्वांचे मन राखण्याचा प्रयत्न करावा. संकटात दुसऱ्यांना सहाय्य करून ते मग उच्चारून दाखवू नये. काळाला, प्रसंगाला, प्रदेशाला व आपल्या अधिकाराच्या मर्यादेला अनुसरून वर्तन ठेवावे, तरीही सत्य व धर्म

सोडू नये. शत्रूबद्दलही वैयक्तिक द्वेष मनात ठेवू नये. लक्ष्मीच काय, सर्वच काही चंचल असते, आजची स्थिती उद्या राहीलच असे नाही, तारुण्य, सौंदर्य, माता, पिता, पत्नी, संतान, घर, नातलग—सारे काही कायम नसते, हे लक्षात ठेवून कशावरही आसक्त असू नये. द्रव्यलोभाने किंवा कोणत्याही तात्पुरत्या फायद्यासाठी नीच कर्म करू नये. वचनभंग करू नये. उगीच प्रतिज्ञा व पैजा करू नयेत. कोणाचीही गुप्त, लज्जास्पद वर्माची गोष्ट माहीत असली तरी बोलू नये. स्त्रियांवर जास्त विश्वास टाकू नये. आपल्या वस्तूंस आपण जपावे. आपली गुप्त गोष्ट कोणासही सांगू नये. सत्पात्री दान करावे. दीन, दरिद्री, दुर्बळ, अज्ञ, संबंधीजन, याचक, रोगपीडित, संत, सज्जन, यांना दान करावे.

राजाने प्रजेच्या संरक्षणाची, सुखाची, हिताची, शिक्षणाची, अभ्युदयाची व परमार्थाची काळजी घ्यावी. विश्वासू मंत्री, विश्वासू सेना, सेनापती, सेवक व आप्तेष्ट, यांच्या सहाय्याने दक्षतेने राज्य चालवावे. संपत्तीने उन्मत्त होऊ नये, विपत्तीने विकल होऊ नये. पराक्रम करण्यास कचरू नये, आमरण विद्यार्जन करावे. दानधर्म आपल्या सामर्थ्याने व योग्य प्रसंग पाहून करावा. राजाने आपल्या लहरीप्रमाणे उलटेसुलटे वागू नये, आपण केलेले कायदे आपणही पाळले पाहिजेत. सत्कर्मासाठी धन खर्च करावे.

राजाने आपल्या जिवास कपटाने कोणीही धोका करील याबाबत फार सावध असावे. अत्यंत विश्वासू हेरांमार्फत सर्व बातम्या मिळवीत असावे. दुष्ट लोकांचा वेळीच नाश करावा. त्यांना डोईजड होऊ देऊ नये. चारी आश्रम, चारी वर्ण यांची व्यवस्था लावावी. भूतदया, अहिंसा, धर्म, नीती, सदाचार, यांचे शिक्षण देण्याची व्यवस्था करावी. ही कार्ये करणाऱ्यांच्या गरजा पूर्ण कराव्यात. तोंडावर स्तुती करणाऱ्यांपासून राजाने सावध असावे. आपली चूक कबूल करावी व सुधारावी. प्रजेचे सामर्थ्य राजापेक्षा जास्त असते, प्रजा राजाला दूर करू शकते हे लक्षात ठेवून नेहमी कर्तव्यदक्ष असावे. रस्ते, पाणी, अन्नधान्य, करमणुकीची साधने, सर्व गरजेच्या वस्तू व सोयी, ह्यांची पूर्ण व्यवस्था ठेवावी. स्वतःचे व स्वतःच्या कुटुंबाचे दुःख प्रजाजनांसमोर उघड करू नये. धाडस आणि विवेक यांची सांगड घालावी. आपले भाषण युक्तीला धरून, मधुर व प्रभाव पाडणारे असावे. राजाने प्रधानाजवळ स्वतःचे आचरण कसे असते ते सलगीने सांगितले.

परी म्हणाली, "राजा, आदर्श राजाच्या वर्णनाशी तुझे वर्तन जुळते का? तू विक्रमासारखा ज्ञानी आहेस का? तसे असेल तर या सिंहासनावर बैस."

सिंहासनाची ती सव्विसावी मूर्ती पुन्हा आपल्या जागी दिसू लागली.

कथा सत्ताविसावी

पर्जन्यासाठी यज्ञ

सत्ताविसाव्या दिवशी भोजराजा सिंहासनाजवळ गेला. त्याने सिंहासनाला स्पर्श केला, तेव्हा 'देवांगना' नावाची एक दिव्य स्त्री प्रगट झाली.

राजा म्हणाला, "देवी, विक्रमादित्याच्या कथा ऐकायला मिळतील या आशेने मी सिंहासनाला स्पर्श केला. तू त्याची काही वेगळी कथा सांगणार आहेस का?"

ती स्त्री म्हणाली, "माझे नाव देवांगना आहे. देवांची आणि विक्रमाची प्रत्यक्ष भेट झाली ती गोष्ट मी तुला सांगते –

एकदा विक्रम राजसभेत बसून राज्यकारभाराच्या गोष्टी करीत असता तिथे एक ज्योतिषी आला. राजाने त्याचे योग्य ते स्वागत केले आणि विचारले, "आपला विशेष गुण काय तो सांगा."

ज्योतिषी म्हणाला, "मी त्रिकालज्ञानी आहे. आपण मला भविष्य विचारा.

राजाला काळजी प्रजेच्या हिताची ! राजाने विचारले, "या देशात यावर्षी पाऊस किती पडेल?" ज्योतिषी म्हणाला, "यावर्षी पाऊस पडणार नाही."

> बुधशुक्रौ समीपस्थौ कुरुतः सजलां महीम् ।
> तयोरन्तर्गतो भानुः समुद्रपमि शोषयेत् ॥

अर्थः– आकाशात बुध आणि शुक्र हे जर एकमेकांच्या जवळ असतील तर पर्जन्यमान चांगले असते पण सूर्याच्या एका बाजूस बुध आणि विरुद्ध बाजूस शुक्र असे असेल तर समुद्रही आटेल इतके अवर्षण असते.

यंदा असेच आहे. त्यामुळे पाऊस नक्की पडणार नाही.

ज्योतिषाला काही द्रव्य देऊन राजाने निरोप दिला. राजाने नंतर काही शास्त्रज्ञ ब्राह्मणांना बोलाविले आणि विचारले,"योग्यवेळी पुरेसा पाऊस पडावा यासाठी काय उपाय करावा?" त्यांचा सल्ला मिळाला, 'यज्ञ करावा.'

राजाने यज्ञवेत्त्या ब्राह्मणांच्या सांगण्याप्रमाणे यज्ञ करण्याचे ठरविले. मोठा यज्ञमंडप उभारला गेला. सर्व सामग्री जमवली गेली. विविध ठिकाणचे विद्वान ब्राह्मण बोलावले

गेले. मुक्त हस्ताने दाने दिली गेली. यज्ञाचा धूर गगनात जाऊ लागला. समिधा, आज्य आणि हविष्यान्ने यांच्या आहुती पडू लागल्या. वातावरणात स्वाहाकाराचे ध्वनी दुमदुमू लागले. ब्राह्मणांना दक्षिणा दिल्या गेल्या. अतिथि-सत्कार, इच्छा-दान, इच्छाभोजन-कशातही न्यून नव्हते. यज्ञ-समाप्तीची वेळ आली त्यावेळी इंद्रासह सर्व देवता यज्ञ मंडपात प्रगट झाल्या आणि राजावर प्रसन्न होऊन त्यांनी त्याला वरदान देऊ केले.

राजा आनंदित झाला आणि म्हणाला, "ग्रहस्थितीप्रमाणे यावर्षी पाऊस पडणार नाही असे भविष्य आहे, तो ग्रहदोष दूर होऊन देशात योग्य तो पाऊस पडावा, प्रजा सुखी व्हावी आणि यापुढे कधीही या देशात दुष्काळ पडू नये अशी माझी प्रार्थना आहे."

इंद्राने "तथास्तु" म्हटले. वरुणाने पाऊस पाडण्याचे मान्य केले आणि सर्व देव स्वर्गात निघून गेले.

मालव देशात पाऊस पडला. नंतर दरवर्षी पुरेसा पाऊस पडू लागला!

भोजराजाला देवांगना म्हणाली, "राजा, साक्षात् इंद्र यज्ञासाठी भूलोकी आणण्याचे सामर्थ्य तुझ्याठिकाणी आहे का? तसे असेल तर या सिंहासनावर बैस."

भोजराजा मुकाट्याने महालात परत गेला आणि ती देवांगना मूर्तिरूप झाली.

कथा अठ्ठाविसावी

यमाने विक्रमाच्या धैर्याची परीक्षा घेतली

विक्रमाच्या सिंहासनाजवळ येऊन आपल्याला आज आणखी गोष्ट ऐकायला मिळेल अशा उत्कंठेने राजाने सिंहासनाला हात लावला.

तेथील एक मूर्ती अदृश्य होऊन एक देवकन्या दिसू लागली आणि राजाला म्हणू लागली, "राजा, विक्रम किती दयाळू आणि निरिच्छ होता त्याची मी एक कथा सांगते."

राजा म्हणाला, "विक्रमाच्या यज्ञासाठी प्रत्यक्ष इंद्र आल्याची कथा मी काल ऐकली. त्यावरून त्याच्या सामर्थ्याची मला कल्पना आली आहे. तुझे नाव काय ? तू कोणती गोष्ट सांगणार आहेस ती लवकर सांग; मला उत्कंठा लागली आहे."

ती म्हणाली, "माझे नाव 'चित्रिणी'. मीही आज तुला देवासंबंधीचीच गोष्ट सांगणार आहे –

विक्रमादित्याचे पराक्रम व सद्‌गुण पाहून यमाला वाटले, 'आपण याची थोडी कसोटी पाहू या.' त्याने वरुणाला बोलाविले आणि दोघांचा काहीएक विचार ठरला. वरुणाने

[illegible] गायीचे रूप घेतले, यमाने वाघाचे रूप घेतले. विक्रम अरण्यात शिकारीला गेला असता वरुण त्याच्यासमोर गायीच्या रूपात प्रगट झाला आणि यमाने असा देखावा निर्माण केला की, वाघ त्या गायीच्या मागे लागला आहे आणि गाय खूप घाबरली आहे.

ते खरे वाटून विक्रम तिच्या रक्षणासाठी धावला. तो गायीभोवती हातात खड्‌ग घेऊन फिरू लागला. तेवढ्यात वरुणाने अचानक पाऊस पाडण्यास सुरुवात केली. गाय [illegible] रतली. विक्रम वाघाला गायीवर हल्ला करु देत नव्हता. रात्र झाली. रात्रभर पाऊस पडत होता आणि रात्रभर विक्रम गायीजवळ रक्षणासाठी उभा होता.

सकाळ झाली तेव्हा गाय आणि वाघ दोघेही अदृश्य झाले आणि तिथे वरुण व यमधर्म हे दोन्ही देव प्रगट झाले. त्यांचे दर्शन होताच विक्रमाने त्यांना प्रणाम केला.

यम म्हणाला, "राजा मी तुझी परीक्षा पाहिली. तू खरोखरच दयाळू आहेस. तुला काय वर हवा आहे तो माग."

विक्रम म्हणाला, "आपल्या दर्शनाने मी धन्य झालो. आणखी काहीही वर नको. मी सुखी आहे." देवांनी त्याला आशीर्वाद दिला व ते अंतर्धान पावले.

चित्रिणी म्हणाली, "राजा विक्रमासारखा साहसी, दयाळू आणि देवांनी वर माग असे सांगितले असताही, न मागणारा तू आहेस का?"

राजा म्हणाला, "नाही. मी महालात परत जातो." चित्रिणी मूर्तिरूप झाली व राजा महालात परत गेला.

कथा एकोणतिसावी

ब्राह्मणाचा कर्मभोग विक्रमाने मागून घेतला

एकोणतिसाव्या दिवशी भोज राजा सिंहासनाजवळ आला व त्याने सिंहासनाला आदराने स्पर्श केला. तेव्हा एकोणतिसावी मूर्ती दिसेनाशी होऊन तिथे एक परी दिसू लागली. ती राजाला म्हणाली, "माझे नाव 'सुलोचना'. विक्रमाच्या सहनशक्तीची, परोपकाराची व गायनकलेची गोष्ट मी तुला सांगते –

विक्रम राजा रोज रात्री वेषांतर करून नगरात हिंडून लोकस्थिती जाणून घेत असे. तो एकदा एका गरीब ब्राह्मणाच्या घराशी अंधारात उभा राहिला. "राजाकडे जाऊन काहीतरी मागा, तो उदार आहे, पोटाची काहीतरी व्यवस्था तो करील." असे ब्राह्मणपत्नी आत ब्राह्मणाला सांगत होती. मात्र ब्राह्मण म्हणत होता– "माझा काळच फिरला आहे, तिथे राजा काय करणार? मला नुसते दान मागायलाही आवडत नाही."

राजाने दुसऱ्या दिवशी ब्राह्मणाला सभेत बोलावले व आत पाच अमूल्य रत्ने असलेला कोहळा त्याला दान दिला. ब्राह्मणाने घरी जाऊन कोहळा फोडला की, त्याला रत्ने मिळतील असे राजाला वाटले.

ब्राह्मण उदास मनाने परत गेला व वाटेत त्याच्या एका मित्राला त्याने कोहळा विकून टाकला. त्याचे पैसे घेऊन तो घरी गेला व पत्नीला म्हणाला, "पाहिलेस? राजाने एवढे मला बोलावून नेले आणि फक्त कोहळा दिला. तो मी विकला, त्याचे हे पैसे."

त्या दिवशी रात्री राजा पुन्हा ब्राह्मणाच्या घराशी लपून राहिला. ते दांपत्य कोहळा विकल्याच्याच गोष्टी बोलत होते. तेव्हा 'कोणी कोणाचे नशीब घेऊ शकत नाही' असा विचार करीत राजा पुढे निघाला.

तेवढ्यात ब्राह्मणाच्या घराकडे जाणारा एक काळाकभिन्न पुरुष राजाला दिसला. राजाने विचारले, "तू कोण आहेस? ब्राह्मणाकडे कशाला जातोस?" तो पुरुष म्हणाला, "मी ब्राह्मणाचा 'पडता काळ' आहे. एक वर्षपर्यंत ब्राह्मणाला मी पीडणार आहे."

राजाला दया आली. तो म्हणाला, "एक वर्षभर तू त्याच्याऐवजी मला छळ! काही हरकत आहे का?"

काळ म्हणाला, "राजा, तू जर विपत्ती मागून घेतोस, तर मी त्याला त्रास देत नाही."

असे म्हणून तो पुरुष गुप्त झाला. राजाला आपले मन अत्यंत खिन्न होत आहे असे वाटले. राजा राजवाड्याकडे गेला.

इकडे ब्राह्मणाचे नष्टचर्य संपले, त्यामुळे त्याच्या मित्राने, कोहळ्यात त्याला सापडलेली रत्ने ब्राह्मणाच्या घरी आणून दिली! ब्राह्मणाचे दारिद्र्य फिटले!

राजवाड्यात मात्र त्याच रात्री आग लागली. आणि सर्व वैभव जळून खाक झाले. विपरीत काळाचे हे कर्तृत्व आहे असे ओळखून राजा प्रधानावर कारभार सोपवून तीर्थयात्रेला दक्षिणेत गेला.

दक्षिणेस रामेश्वर मंदिरात तो जप करीत बसला असतां चंदावरचा राजा तिथे आला विक्रमाचे तेज वगैरे पाहून राजाला तो एकदम आवडला. विक्रमाला त्याने चंदावर येथे आपला मित्र म्हणून राजवाड्यात रहायला बोलावले. आपण उत्तरेकडील एक व्यापारी आहोत असे राजाला विक्रमाने सांगितले होते.

चंदावर येथे राजा, राणी व विक्रम गोष्टी बोलत बसले होते. थोड्या वेळाने राजा काही कामाला तिथून उठून गेला व राणीला स्नानासाठी दासीने बोलाविले म्हणून तीही आपल्या गळ्यातील मोत्यांचा हार तिथेच एका खुंटीवर लावून निघून गेली. त्या खुंटीवर हंसाचे एक चित्र टांगलेले होते. चमत्कार असा झाला की, तो हंस एकदम जिवंत झाला. त्याने तो मोत्यांचा हार गिळला ! लगेच ते चित्र पुन्हा निर्जीव झाले.

राणी परत आली. हार शोधू लागली. विक्रमाला तिने विचारले, तेव्हा त्याने जे पाहिले ते सांगितले, पण राणीला ते खरे वाटेना. राजाही तेवढ्यात तिथे आला. त्याचाही विक्रमाच्या सांगण्यावर विश्वास बसला नाही. विक्रमावर तो संतापला, त्याला चोर ठरवून त्याचे हातपाय तोडून राजाने त्याला रस्त्यात टाकून दिले ! दैवगती ! दुसरे काय !

एका तेल्याला मात्र त्याची दया आली. त्याने त्याला घरी नेले. त्याच्या जखमा बऱ्या केल्या व विक्रमाने त्याच्या तेलाच्या घाण्यावर बसून बैलाला हाकलण्याचे काम स्वीकारले. विक्रम गाणी गाऊन बैलाला इशाऱ्यानेच प्रेरणा देत होता. बैल चांगला चाले.

तेल जास्त येई. विक्रमामुळे धंदा तेजीत आला. त्याचे गायन ऐकायला रसिक लोक येऊ लागले. तेल्याने मोठा महाल बांधला. मोठ्या प्रमाणावर धंदा केला. विक्रमाला लोक गायनाचा आग्रह करीत.

एकदा विक्रमाने दीप राग म्हणण्यास सुरुवात केली. नवल घडले. घरोघरी आपोआप दिवे लागले!

राजकन्येचा महाल जवळच होता. तिथेही दिवे लागले. तिने चौकशी केली. पित्याने हातपाय तोडून टाकलेला सज्जन मित्रच गात आहे व त्यामुळेच दिवे लागले हे कळताच तिने विक्रमाची भेट घेतली. त्याच्याशी विवाह करण्याचे ठरवून राजाच्या मनाविरुद्ध ती विक्रमाची पत्नी झाली. त्याची सेवा करू लागली. लोक आश्चर्य करू लागले.

पुढे असे झाले की, विलासपूरच्या राजाने एकसारख्या एक सुवर्णाच्या मूर्ती चंदावरला पाठविल्या व दूताकरवी निरोप पाठवला, "या मूर्तींची उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी श्रेणी जो सांगेल त्यालाच त्या मूर्ती बक्षीस देऊं."

त्याच दिवशी धर्म, लक्ष्मी, बुद्धी व काल हे चंदावरच्या राजाकडे मानवी रूपाने आले व विचारू लागले, "आम्हाला प्रत्येकाला वाटते की, आपणच इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत. तर राजा, आमच्यातील खरा श्रेष्ठ कोण ते तू सांग."

राजाला काही उत्तर सुचेना. त्याने काही दिवसांची मुदत मागितली.

राजकन्येने विक्रमाला ही हकीगत सांगितली. विक्रम म्हणाला, "तू राजाला असे सांग की, अजून तीन दिवसांनी मी या प्रश्नांची उत्तरे देईन. जिथे मोत्यांचा हार हरवला त्या दालनात मला नेऊन ठेवा." राजकन्येने त्याप्रमाणे पित्याला सांगितले. तीन दिवसानंतर विक्रमाला उचलून त्या दालनात नेऊन ठेवले.

तीन मूर्ती त्याच्यासमोर ठेवल्या. लोक पाहायला जमले होते. विक्रमाने राजकन्येला सांगितले, "एक लवचीक तार घे व प्रत्येक मूर्तीच्या कानात घाल." तिने तसे केले तेव्हा ती तार एका मूर्तीच्या तोंडातून बाहेर आली, दुसरीच्या कानातून बाहेर आली व तिसऱ्या मूर्तीच्या पोटात गेली. विक्रम म्हणाला,

"हे कोडे सुटले. पहिली मूर्ती कनिष्ठ आहे कारण ती गुप्त गोष्ट ऐकताच बोलून टाकील. दुसरी मध्यम, कारण ती ऐकलेली गोष्ट सोडून देईल. तिसरी श्रेष्ठ कारण तिने ऐकलेली गोष्ट गुप्तच राहील." विलासपूरच्या राजाचा दूत आला होता. त्याने म्हटले, "हे उत्तर बरोबर आहे. या मूर्ती या माणसाच्या झाल्या."

त्याचवेळी धर्म, लक्ष्मी, बुद्धी व काल हे मूर्तिमंत होऊन राजासमोर उभे राहिले. विक्रम म्हणाला, "राजा, मी यांना उत्तर देतो." तो म्हणाला, "काळच सर्वांत श्रेष्ठ आहे. तो फिरला तर माणूस धार्मिक असो, श्रीमंत असो, बुद्धिमान् असो, त्यांचा काही उपयोग न होता माणसाची दुर्दशा होते ! मी अवंतीचा राजा विक्रम आहे. माझेच उदाहरण पुरेसे आहे!"

तत्काळ धर्म, लक्ष्मी व बुद्धी अदृश्य होऊन काळ तेवढाच राहिला. विक्रमाच्या अंगावरून त्याने हात फिरविला तेव्हा विक्रमाला हातपाय पुन्हा आले व तो जास्तच तेजस्वी दिसू लागला !

चंदावरचा राजा, राजकन्या व इतर सारे पाहातच राहिले ! तोच आणखी एक चमत्कार घडला. खुंटीवरचे हंसाचे चित्र सजीव झाले व त्याने मोत्यांचा हार चोचींतून बाहेर काढला आणि खुंटीवर ठेवला ! चित्र पुन्हा निर्जीव झाले !

सारेजण थक्क झाले. राजा तर विक्रमाच्या पाया पडला. काळपुरुषाला विक्रम म्हणाला, "ब्राह्मणावर दया करून मी तुझी पीडा वर्षभर सहन केली. आज मुदत संपली." काळ म्हणाला, "विक्रमा, तुझी सहनशक्ती, तुझे औदार्य यांची कीर्ती निरंतर अजरामर राहील, मी आता जातो." काळ अदृश्य झाला.

चंदावरच्या राजाने आपले राज्यच विक्रमाला दिले, पण विक्रमाने ते तेल्याला दिले व राजकन्येसह तो अवंतीस परत आला.

एवढी गोष्ट सांगून 'सुलोचना' म्हणाली, "राजा, विक्रमाचे हे गुण तुझ्या अंगी असतील तर तू या सिंहासनावर बैस."

भोज राजा निरुत्तर होऊन महालात परत गेला व सुलोचना जड-मूर्ती झाली.

कथा तिसावी

जादूगार गारुड्याचा सन्मान

राजा भोज गोष्ट ऐकण्याच्या उत्कंठेनेच सिंहासनाजवळ आला व त्याने सिंहासनाला स्पर्श केला. त्याबरोबर तिसावी देवकन्या प्रगटली आणि राजाला विक्रमाची कथा सांगू लागली –

"राजा, माझे नाव 'प्रभावती'. विक्रमाची आणखी एक गोष्ट मी तुला सांगते –

विक्रम राज्य करीत होता त्यावेळी कपिलाषष्ठी आली. प्रधान व काही परिवार घेऊन राजा गंगेवर स्नान करण्यासाठी गेला. तिथे आलेल्या तपस्व्यांना, ब्राह्मणांना व दीनदुबळ्यांना त्याने द्रव्यादी दाने देऊन संतुष्ट केले. तो मनाशी म्हणाला –

अस्थिरं जीवितं लोके अस्थिरे धनयौवने ।
अस्थिराः पुत्रदाराश्च धर्मकीर्तिद्वयं स्थिरम् ॥

अर्थः– या लोकात आपले आयुष्य, आपली संपत्ती, आपले तारुण्य, सर्व अनिश्चित, चंचल असून बायकामुलेही चिरस्थायी नाहीत. फक्त धर्म व कीर्ती याच गोष्टी स्थिर, टिकणाऱ्या आहेत.

त्या मेळाव्यात एक गारुडी राजासमोर आला. तो म्हणाला, "राजाधिराज, मी आपल्याला मोठा विलक्षण जादूचा प्रयोग करून दाखविणार आहे. तो जर आपल्याला उत्तम वाटला तरच मला बक्षीस द्या."

राजा म्हणाला, "दाखव तुझा प्रयोग !"

तेव्हा "मी प्रयोगासाठी लागणारे सामान घेऊन येतो. आपण थोडा वेळ थांबावे." असे म्हणून गारुडी निघून गेला. जादू पाहाण्यासाठी तिथे पुष्कळ लोक जमले.

थोड्याच वेळात तिथे एक अश्वारूढ तेजस्वी पुरुष आला. घोड्यावर त्याने एका सुंदर स्त्रीला बसविले होते. तो खाली उतरला व तिलाही त्याने खाली उतरविले. राजा व प्रधान यांच्या समोर तो प्रणाम करून म्हणाला,

"महाराज, मी इंद्राचा सेवक आहे. ही माझी पत्नी आहे. माझा एक अपराध झाला म्हणून इंद्राने मला काही दिवस भूलोकी राहाण्याची शिक्षा दिली आहे. पण स्वर्गात आता

राक्षस व देव यांचे युद्ध होणार आहे त्यासाठी मात्र इंद्राने मला बोलावले आहे, मी युद्धासाठी जातो तोपर्यंत ही माझी स्त्री आपल्या आश्रयाला ठेवावी. आपल्याइतका विश्वासार्ह राजा दुसरा कोण आहे? आपण कन्येप्रमाणेच हिला सांभाळावी."

विक्रमाने प्रधानाच्या सल्ल्याने, तिला सांभाळण्याचे ठरविले. तो स्वार त्वरेने गगनात गेला व दिसेनासा झाला.

काही वेळाने आकाशातून एक तुटका हात खाली पडला. तो पाहाताच त्या स्त्रीने किंकाळी फोडली ! त्या स्वाराचाच तो हात आहे हे सर्वांनी ओळखले. ती स्त्री रडत म्हणाली, "माझे पती देवासुर युद्धात मरण पावले ! मी या त्यांच्या हाताबरोबर सती जाणार ! त्यांच्या देहाचे आणखी तुकडे कुठे पडलेले असतील देव जाणे !"

राजा पेचात सापडला. तो म्हणाला, "बाई, तुला काय हवे ते माग, पण सती जाऊ नकोस."

त्या स्त्रीने कोणाचेच ऐकले नाही. विक्रमाकडून तिने पतीच्या नावे दाने देवविली आणि चिता पेटवून ती शेवटी त्या तुटक्या हाताबरोबर सती गेली.

लोक हळहळले. तेवढ्यात गगनातून तो घोडेस्वार खाली आला ! त्याने म्हटले, "महाराज ! देवांचा जय झाला ! युद्धात माझा फक्त एक हात तुटला. इंद्राने माझ्या पराक्रमामुळे मला क्षमा केली आहे. मी पत्नीला घेऊन इंद्राकडे जातो !

राजा म्हणाला, "अरेरे! तुझा हात इथे पडला, तुझ्या पत्नीला वाटले की तू मरण पावलास. तिने दुःखाने तुझ्या तुटक्या हाताबरोबरच चितेत उडी घेतली! पाहा! अजून चिता पेटत आहे !"

घोडेस्वार राजाला दोष देऊ लागला. राजाला फार लज्जा वाटली. आपली मोठी चूक झाली, आता काय करावे, असा विचार करीत असता त्याला तो गारुडी एकदम गर्दीतून पुढे येताना दिसला.

राजाला प्रणाम करून तो म्हणाला, "महाराज !हाच माझा जादूचा प्रयोग आहे. आता पाहा! म्हणून त्याने चितेकडे तोंड करून काही शब्द पुटपुटून हातातील कांडी फिरविली—तात्काळ त्या चितेतून ती स्त्री बाहेर आली व गारुड्यासमोर हात जोडून उभी राहिली.

गारुडी, ती स्त्री व घोडेस्वार—तिघांनीही राजाला नमस्कार केला.

राजासह सर्व लोक आश्चर्य करू लागले !राजाने गारुड्याला पाच लक्ष सुवर्णमुद्रा दिल्या व पाच गाव वतन म्हणून दिले. गारुड्याने त्याच ठिकाणी तो घोडेस्वार व ती स्त्री अदृश्य केली ! स्वतः मात्र वंदन करून निघून गेला !

गोष्ट सांगून 'प्रभावती' म्हणाली, "राजा भोज, कलागुणांची अशी रसिकता व असा मान तू करीत असतोस का?"

राजा म्हणाला, "नाही, असा उदार मी नाही."

तेव्हा प्रभावती अदृश्य झाली आणि तिसावी मूर्ती दिसू लागली. राजा महालात गेला.

कथा एकतिसावी

स्वतःच्या पुण्याईने ब्राह्मणाला मुक्ती दिली

दिवस उजाडताच भोज राजा सिंहासनाजवळ गेला. त्याने मोठ्या आदराने सिंहासनाला वंदन केले व त्याला दोन्ही हातांनी स्पर्श केला. एकतिसावी मूर्ती सजीव झाली. ती देवकन्या 'गुणप्रिया' नावाची होती. तिने आपले नाव सांगून विक्रमाची कथा सांगण्यास प्रारंभ केला –

"राजा, शंकराने विक्रमाला एक कमलपुष्प दिले होते ते कोमेजू लागले. आपले मरण सहा महिन्यांवर आले आहे असे विक्रमाने ओळखले. त्याने प्रधानाला व इतर मंत्र्यांना बोलावून राज्याची उत्तम व्यवस्था करण्यास सांगितले. स्वतः वाईक्षेत्रात जाऊन राहाण्याचा बेत केला. 'याचकांनी वाईक्षेत्रात यावे. दानधर्म तिथून होईल' असे राजाने जाहीर केले व तो वाईक्षेत्रात गेला. अनेक याचक तिथे गेले. विक्रमाने सर्वांना संतुष्ट केले. पंडित, ब्राह्मण, अपंग, रोगी, दरिद्री, कलावंत, संकटग्रस्त, असे अनेक लोक त्याच्याकडे आले व विक्रमाने सर्वांना सहाय्य केले.

त्याची कीर्ती देवांपर्यंत गेली. देवांनी अनेक रूपांत येऊन कसोटी म्हणून दुष्कर कामे त्याच्याकडून करून घेतली व जे देणे अवघड तेही मागितले, पण विक्रम कोठेही कमी पडला नाही.तेव्हा देव तिथे प्रगट झाले. त्यांनी विक्रमाची प्रशंसा केली. "हरिश्चंद, बळी, युधिष्ठिर ह्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ दानी असा तू कलियुगातील अद्वितीय राजा आहेस. तुझी कीर्ती लोकांना उत्तम प्रेरणा देत राहील." असा त्यांनी आशीर्वाद दिला व ते स्वर्गात परत गेले. वेताळही त्याच्या आज्ञेने त्याला सोडून गेला. विक्रम आता परमेश्वर चिंतनात गढून गेला. एकदा कृष्णा नदीच्या तीरावर तो ईश्वराचे ध्यान करीत बसला असता त्याला आपल्याला जवळूनच कोणीतरी हाक मारीत आहे असे वाटले. त्याने आसपास पाहिले तो एक सुंदर हरीण समोर उभा होता. तो मनुष्यवाणीने एकदम बोलू लागला.

राजाला नवल वाटले. तो ऐकू लागला,

"विक्रमादित्य महाराज, माझी कहाणी ऐका व मला मदत करा. पूर्वी मी एक ब्राह्मण होतो. मला एकदा खूप भूक लागली होती. मी व्याकुळ झालो होतो. त्यावेळी एक सिद्ध मला भेटला व मला काय हवे ते देण्यास तयार झाला. मी म्हटले, "मी भुकेने एवढा व्याकुळ झालो आहे की यापेक्षा मरण बरे." सिद्धाने पाणी शिंपडून मला एकदम हरीण केले व म्हटले, "पुढे जेव्हा अवंतीचा राजा इथे येईल व तुझी जन्मकहाणी तू त्याला सांगशील तेव्हा तुझी हरिणातून सुटका होईल व त्याच्या पुण्याईने तू स्वर्गात जाशील."

"महाराज, आज तुम्हाला माझी जन्मकहाणी मी सांगितली. आता मी सुटलो." असे म्हणतच तो हरिण निष्प्राण झाला.

विक्रमाने हरिणाच्या शरीराचे दहन केले. ब्राह्मणाचा दिव्य देह समोर प्रगट झाला. त्याच्या नावाने विक्रमाने यज्ञ केला आणि आपले पुण्य दान केले.तेव्हा तो दिव्य पुरुष स्वर्गलोकात गेला.

"विक्रमाने ज्याप्रमाणे आपली पुण्याई खर्च करून दुसऱ्याचा उद्धार केला त्याप्रमाणे तू करशील का?"– असे त्या गुणप्रिया नावाच्या देवकन्येने भोजराजाला विचारले.

राजा म्हणाला, "एवढे औदार्य माझ्या अंगी नाही."

तेव्हा गुणप्रिया म्हणाली, "उद्या जर तू सिंहासनाला स्पर्श केलास तर 'चित्रकला' ही माझी सखी तुला विक्रमाचे वर्णन सांगेल ते नीट ऐक."

ती अदृश्य होऊन मूर्तिरूप झाली आणि भोजराजा पुन्हा आपल्या महालात गेला.

कथा बत्तिसावी

विक्रमाचे स्वर्ग-गमन – पऱ्यांची मुक्ती

राजा भोज आज मोठ्या उत्कंठेने सिंहासनाजवळ आला. आज तो राणीला घेऊनच आला होता. दोघांना कथेची उत्सुकता होती. राणीला चमत्कारही पाहायचा होता. राजाने आज सिंहासनाची पूजा केली. त्यावेळी 'चित्रकला' नावाची, बत्तिसावी मूर्ती सजीव होऊन बोलू लागली,

"राजा, मी आज विक्रमादित्याच्या स्वर्ग-गमनाची गोष्ट सांगणार आहे –

विक्रमाच्या आयुष्याची मर्यादा संपली व मरणकाळ जवळ आला, तेव्हा इंद्राने विक्रमाला स्वर्गात नेण्यासाठी विमान पाठविले. विक्रम विमानात बसून स्वर्गात गेला. अवंती नगरीत सर्वत्र शोक पसरला. विक्रम स्वर्गास जाताच त्याच्या स्त्रियांपैकी काहींनी प्राण सोडले. मंत्री, प्रधान, दरबारी सेवकवर्ग, परिवारातील लोक, 'आपला जन्म व्यर्थ' असे म्हणू लागले. 'धर्म, न्याय, नीती, दान, दयाळूपणा यांचा लोप झाला' असे उद्‌गार काढू लागले.

राजपुत्र जैत्रपाल यास राज्यावर बसविण्याचे ठरले. प्रधानाने तसे जाहीर केले. अभिषेकाचा दिवस ठरला. सभा भरली. विक्रमाच्या सिंहासनावर बसण्यासाठी जैत्रपाल जवळ आला. तो त्यावर बसणार तोच त्याला चक्कर आली व तो बेशुद्ध पडला.

काही वेळाने तो सावध झाला. प्रधानाला एक युक्ती सुचली. तो म्हणाला, "युवराज, आपण आपले पिता महाराज विक्रम यांनी स्वप्नात येऊन संदेश द्यावा, अशी मनोमन प्रार्थना करावी. आपण भूमिशयन करावे म्हणजे दृष्टान्त होईल."

जैत्रपाल त्याप्रमाणे निजला तेव्हा स्वप्नात विक्रमाने त्याला सांगितले, "मुला, उज्जयिनी व धारानगरी या दोन्ही नगरांत तू राहू नकोस. तू फक्त अवंती येथे राहा. माझे सिंहासन विशिष्ट गुणांचे आहे. त्यावर कोणीही बसू नका. ते भूमीत खोलवर पुरून ठेवा."

जैत्रपालाने प्रधानाला हा दृष्टान्त सांगितला. प्रधानाने व मंत्र्यांनी त्याप्रमाणे हे सिंहासन भूमीत खोल पुरून ठेवले. अवंती येथे जैत्रपाल राज्य करू लागला व त्याने उत्तम प्रकारे न्यायाने राज्य केले. ते हे सिंहासन तू खणून काढून इथे आणलेस.

चित्रकलेने एवढे सांगितले तेव्हा भोज राजाने त्या सिंहासनाला वंदन केले व सहजच उद्‌गार काढले, "धन्य तो विक्रमादित्य आणि धन्य त्याची प्रजा!"

त्यावेळी आणखी एक चमत्कार घडला. सिंहासनाला जडविलेल्या सगळ्या मूर्तीतून बत्तीस देवकन्या प्रगटल्या आणि आनंदाने राजासमोर उभ्या राहिल्या.

राजाने त्यांना विचारले, "आपण सांगितलेल्या सर्व कथा ऐकून, हे सिंहासन मजसाठी नाही हे मला कळले. पण आपल्याबद्दल मला अत्यंत जिज्ञासा लागून राहिली आहे. आपल्याला मूर्तीत कोणी अडकविले? आता सर्वजणी एकदम मुक्त कशा झालांत?"

चित्रकला म्हणाली, "राजा, पार्वती देवीच्या आम्ही मैत्रिणी. एकदा आम्ही सर्वजणी खेळत होतो. त्यावेळी शंकर तिथे आले. त्यांचे ते रुंडमाळा व नाग गळ्यात घातलेले, जटाभार वाढविलेले विचित्र रूप पाहून आम्ही स्त्रीस्वभावाप्रमाणे हसलो! पण त्याचा परिणाम मात्र भलताच झाला. शंकरांचा कोप अनावर झाला. त्यांनी आम्हाला शाप दिला, "अविचारी मुलींनो! तुम्ही मृत्युलोकात निर्जीव मूर्ती होऊन राहाल."



आम्ही फार घाबरलो, रडू लागलो. पार्वतीला आमची दया आली. तिने आमच्यासाठी उश्शाप मागितला. तेव्हा शंकर म्हणाले, "तुम्ही मृत्युलोकी जाल, पण देवराज इंद्र विक्रमादित्य राजासाठी जे दिव्य सिंहासन पाठवील त्याला जडविलेल्या बत्तीस मूर्ती होऊन तुम्ही राहाल. राजा विक्रमादित्य पुन्हा स्वर्गलोकी आल्यानंतर ते सिंहासन भूमीमध्ये खोल पुरून ठेवण्यात येईल. मग पुष्कळ वर्षांनी ते सिंहासन भूमीमधून खणून काढण्याचे काम भोज राजा करील. त्याची त्या सिंहासनावर बसण्याची योग्यता नसेल. तो त्यावर बसण्यासाठी येईल त्यावेळी रोज तुमच्यापैकी एकेकीने विक्रमाच्या सद्‌गुणांची कथा त्याला सांगावी. त्याचे चरित्र सांगून झाले की, तुम्ही दिव्य रूप धारण करून पुन्हा इथे याल."

असा उश्शाप आम्हाला मिळाला. इंद्राने पाठविलेल्या सिंहासनाला, 'मूर्ती' होऊन आम्ही जडविल्या गेलो. आता आम्ही शिवलोकात परत जातो."

असे सांगून चित्रकला सख्यांसह राजाचा निरोप घेत म्हणाली, "राजा, तुजवर आम्ही प्रसन्न आहोत कारण आमच्या मुक्तीला तू कारण झाला आहेस. तुला काय हवे ते माग."

भोज राजा म्हणाला, "मला असा वर द्या की, ही विक्रमाच्या पराक्रमांची गाथा जो लिहील, वाचील किंवा ऐकेल तो सुखी व्हावा, त्याचे कल्याण व्हावे."

तेव्हा 'तथाऽस्तु' असे म्हणून त्या बत्तीस देवकन्या शिवलोकाला गेल्या.

राजाराणीला फार नवल वाटले. त्यांनी सर्व मंत्र्यांची सभा भरवून सर्वांना ही कथा सांगितली. मग ते विक्रमाचे सिंहासन पाहाण्यास सर्वजण जमले. त्याला जडविलेल्या मूर्ती आता नाहीशा झाल्या होत्या.

भोज राजाने ते सिंहासन मूळच्या ठिकाणी पुरून ठेवले आणि विक्रमाचा आदर्श पुढे ठेवून तो राज्य करू लागला.

काही वर्षांनी तो म्हातारा झाला. त्याने राजपुत्राला राज्य दिले व तपश्चर्या करण्यासाठी वानप्रस्थ आश्रम स्वीकारला.

विक्रमादित्याचे पराक्रम व सद्‌गुण यांची कीर्ती मात्र अखंड राहिली.

बाल कुमार वाचकांसाठी पुस्तकेच पुस्तके.....

★ ★

छोट्यांसाठी मोठ्या टाइपाची सचित्र आणि सुंदर पुस्तके

बाल पंचतंत्र – थोरात, **छान गोष्टी** – मालतीबाई दांडेकर

गोष्टींचा तास – भा. म. वैद्य, **बालकल्पना रम्यकथा** – बाल लेखक

मनोरंजक नीतिपाठ – ग. म. वैद्य, **नवलकथा** – गो. वि. रानडे

मौजेच्या गोष्टी – भा. म. वैद्य, **बाल हितोपदेश** – दा. वि. मनोहर

कुमारांसाठी मनोरंजक व बोधप्रद पुस्तके

मनोरंजक सुबोध गोष्टी – पाटणकर, **सदाशिव शेलार** – इंगवले

सानेगुरुजींच्या गोड गोष्टी, दिन्या मिनीची धमाल – सौ. देशपांडे

गोष्टी – चिंगी – खडकावरला अंकुर – ना. धों. ताम्हनकर

गणितातील गमती – वा. मो. कोळेकर, **सिंहासन बत्तिशी** – घैसास

बालमनावर संस्कार घडविणारी उत्तमोत्तम चरित्रे

राष्ट्रगुरु समर्थ रामदास – महाजन, **अक्कलकोट स्वामी महाराज** – मालपाठक

शेगावचे गजानन महाराज – मालपाठक, **स्वामी स्वरूपानंद** – थत्ते

श्रीराम चरित्र – न. प. महाजन, **श्रीकृष्ण चरित्र** – न. प. महाजन

स्वामीनित्यानंद, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, जे. कृष्णमूर्ती

राजा शिवाजी – सरदेसाई, **राष्ट्रपिता महात्मा गांधी** – अभ्यंकर

पाश्चात्य वाङ्मयाचे मराठीत सुरेख रूपांतर

रॉबिनहुड आणि त्याचे रंगेल गडी – भागवत, **डॉन क्विक्झोट**, शिखरे

तीन शिलेदार – सौ. उषा आपटे, **वीस वर्षानंतर** – सौ. उषा आपटे

बाल अरेबियन नाइटस् – थोरात, **रॉबिन्सन क्रूसो** – सुखठणकर

सिंदबादच्या ७ सफरी – मराठे, **गलिव्हरचे प्रवास** – भा. म. गोरे

संपूर्ण यादी किमतीसह मागवावी. विनामूल्य पाठवू.

के शव भि का जी ढ व ळे

श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई ४०० ००४